पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, एप्रिल-मे-जून २०२५, खंड २४, अंक १-३, पृष्ठे ९२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ नव
८ ■ पर्व, पर्वणी आणि महाकुंभ
१६ ■ कुंभमेळा आणि सशस्त्र नागा साधू
२५ ■ चिनी विद्यापीठांचे नवे आव्हान
३० ■ कष्टकरी वृद्धांचा वाढता टक्का...
३५ ■ रक्तपुरवठा साखळीला हवामानबदलाचा फटका
३८ ■ 'रोबॉट'बरोबर आता 'कोबॉट'ही!
४३ ■ नागरी प्रशासनाचे जटिल वास्तव


**उजळणी**


५७ ■ (१) : बुद्धाला 'रिक्लेम' केले पाहिजे
६१ ■ (२) : आपल्या वाङ्‌मयतपाचा क्रियाकलाप


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक १-३)**
**एप्रिल-मे-जून २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# नव

एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांसाठीच्या या जोडअंकापासून 'अर्थबोधपत्रिके'च्या २४व्या खंडाचा आरंभ आपण करतो आहोत. म्हणजेच, या जोडअंकाबरोबर 'अर्थबोधपत्रिके'चा नवीन खंड सुरू होतो आहे. अलीकडील काही काळात आणि अधिक नेमकेपणाने सांगायचे झाले तर, 'कोरोना'चा फेरा उलटल्यानंतर 'अर्थबोधपत्रिका' जोडअंकांच्या स्वरूपात वाचकांच्या पुढ्यात सादर होते आहे. २०२० हे वर्ष भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे प्रवर्तक आणि संस्थापक-संचालक प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिशताब्दीचे वर्ष होते. प्रा. दांडेकर यांनी वेळोवेळी, कारणपरत्वे वृत्तपत्रादी नियतकालिकांमधून मराठीमध्ये केलेले विविधांगी विपुल लेखन, निवडक स्वरूपात, 'अर्थबोधपत्रिके'च्या अंकांमधून पुन:प्रकाशित करण्याच्या उपक्रमाद्वारे जोडअंकांची योजना पुढील काही काळ संस्थेने जारी राखली. त्यानंतरही, अधुनमधून जोडअंक वाचकांना सादर होत आलेले आहेत. तत्पूर्वी, काही वर्षांमागे, एखाद्या विशिष्ट विषयाला केंद्रस्थानी ठेवून निर्माण केलेल्या लेखनाला वाहिलेले विशेष अंक तयार करण्याचा पर्यायही हाताळून बघण्यात आलेला होता. एखादा मोठा विषय अथवा एखाद्या प्रथितयश हस्तीच्या भाषणाचा अथवा विचारविश्वाचा गोषवारा, अन्य विषयांची चर्चा करणाऱ्या लेखांच्या जोडीने, 'अर्थबोधपत्रिके'मध्ये सादर करावयाचा झाला तर जोडअंकांची रचना अधिक उपकारक व सोयीस्कर ठरते. या प्रक्रियेमध्ये, प्रसंगी, अंकाच्या प्रकाशनाला अंमळ विलंबदेखील होतो अथवा संभवतो. वाचकांच्या वाचनविषयक सवयी आणि आवडीनिवडी अतिशय वेगाने व अनंत दिशांनी बदलत असण्याच्या आजच्या काळात, गंभीर विषयांच्या माहितीस व विश्लेषणास वाहिलेले, बहिरंग रंगीबेरंगी नसलेले, अंतरंगातदेखील छायाचित्रे अथवा रेखांकने नसणारे नियतकालिक नेटाने प्रकाशित करत राहणे ही बाब दिवसेंदिवस अवघड बनत चाललेली आहे. त्यांतच, मतप्रगटनापेक्षा साधार, समधात, विश्लेषक माहिती, सर्वसामान्य जिज्ञासू वाचकांना रोचक वाटेल अशा शैलीमध्ये, सादर करणे ही तर त्याहीपेक्षा अधिक आव्हानात्मक बाब शाबीत होते. वाचकांना विचारप्रवृत्त करण्यापेक्षा त्यांना चटदिशी विकारवश करणाऱ्या तपशीलांनी नटलेल्या वाचनसाहित्याकडे वेगाने

आकर्षित होण्याची मानसिकता खूप मोठ्या प्रमाणावर आपल्या आजुबाजूला आज स्थिरावते आहे. दुसरीकडे शैक्षणिक, सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिकदृष्ट्या एकंदर समाजाचेच आणि साहजिकपणेच वाचकांचेदेखील स्तरीकरण आपल्याकडे प्रचंड प्रमाणात नांदताना दिसते. त्यांतच आताशा भर पडते आहे ती एखाद्या विशिष्ट धार्मिक आणि/अथवा राजकीय विचारप्रणालीशी बांधिलकी मानणाऱ्या मनोभूमिकेची. नाना प्रकारच्या वैचारिक भूमिकांच्या आक्रमक प्रचार-प्रसाराची कार्यपद्धती आपल्या आजुबाजूला आज जोमाने सक्रिय होताना आपण पाहतो आहोत त्यांमागील कारणही तेच होय. अशा सगळ्या वातावरणात वास्तवाचा एक तर सरासर अपलाप तरी घडून येतो अथवा त्याचे विकृतिकरण तरी झपाट्याने होत राहते. असा सगळा अस्थिर, अस्वस्थ माहौल आपल्या विचारविश्वाची अंतर्बाह्य घुसळण घडवून आणत असताना, कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी अथवा स्व-प्रतिमाप्रसार घडवून आणण्याच्या वाटेला न जाता 'अर्थबोधपत्रिका' १९९८ सालापासून आपली वाटचाल एकाकीपणे करत इथवर आलेली आहे. आपल्यासारख्या सुजाण, जिज्ञासू, चिकित्सक आणि तटस्थ वाचकांचे पाठबळ आणि विश्वास यांचे पाथेयच 'अर्थबोधपत्रिके'ला या

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

प्रवासादरम्यान ऊर्जा पुरवत आलेले आहे. आपल्या देशातील राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण या तीन व्यवहारप्रांतांतील प्रचलीत प्रवाह आणि आकारत असलेल्या घडामोडी यांबाबत सर्वसामान्य वाचकांना अवगत करत राहणे हा भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या कार्यप्रेरणेचा गाभा होय. 'अर्थबोधपत्रिके'चा उपक्रम हा त्याच गाभाप्रेरणेचा एक मुख्य आयाम ठरतो. वर्तमानपत्रादी माध्यमांद्वारे ज्या विषयांची तपशीलवार, साधार, तटस्थ आणि अभिनिवेशरहित चर्चा अगर चिकित्सा सहसा होत नाही अथवा केली जात नाही अशा विषयांसंदर्भात जिज्ञासू वाचकांना रोचक व उद्बोधक वाटेल असा मजकूर तयार करणे, हा 'अर्थबोधपत्रिके'च्या निर्मितीचा केंद्रबिंदू होय. 'अर्थबोधपत्रिका' हे नियतकालिक मतपत्र नसून माहितीपत्र ठरते ते नेमके त्याचमुळे. अंकातील मजकूर तयार करण्यासाठी आधार घेतलेल्या संदर्भसाहित्याची सूची दर अंकात साक्षेपाने सादर करण्यामागील हेतूदेखील तोच. त्याचसाठी, अंकातील लेखांचे लेखनश्रेय लेखकाला दिले जात नाही. इथे एक बाब आवर्जून नोंदवून ठेवावयास हवी. 'अर्थबोधपत्रिके'तील प्रत्येक लेख हा कोणत्या तरी इंग्रजी मूळ लेखाचा मुळाबरहुकूम केलेला अनुवाद नसतो. लेखगत मजकूर तयार करण्यासाठी नाना प्रकारचे संदर्भस्त्रोत धुंडाळून त्या आधारे एक नवीन, स्वतंत्र लेख तयार केला जातो. हे अर्थातच मेहेनतीचे काम शाबीत होते. त्या त्या विषयासंदर्भात प्रचलीत माध्यमांद्वारे समाजमानसाच्या पुढ्यात मांडल्या गेलेल्या तपशीलांव्यतिरिक्त अन्य माहिती संकलित करणे, ही खरी परीक्षा बघणारी गोष्ट ठरते. त्याच वेळी, संदर्भासाठी हाताशी असलेले साधनस्त्रोत अस्सल व वस्तुनिष्ठ माहिती देणारेच आहेत व असतील याबाबतही शक्य तेवढी दक्षता बाळगण्याचा प्रयत्न कसोशीने केला जातो. निवडलेल्या संदर्भसाहित्याच्या परिशीलनानंतर संबंधित विषयाचे विविध पैलू पुढ्यात मांडणारा स्वतंत्र लेख 'अर्थबोधपत्रिके'चा संपादकीय विभाग तयार करतो. त्यांमुळे, 'अर्थबोधपत्रिके'मध्ये जे लेखन सादर केले जाते त्याचे वर्णन 'अनुसर्जन' असे करणे उचित ठरते. कारण, तो स्वतंत्र लेख जसा नाही आणि नसतो त्याचप्रमाणे संदर्भासाठी वापरलेल्या मूळ लेखाचा तो शब्दश: अनुवाददेखील नसतो. आधारासाठी घेतलेल्या मूळ संदर्भानिशी 'अर्थबोधपत्रिके'च्या संपादकीय व्यवस्थेने तयार केलेले स्वतंत्र लेख दर अंकामध्ये सादर केलेले असतात. मात्र, अशा कोणत्याही लेखनामध्ये संपादकीय व्यवस्थेतील कोणाचीही मते कधीच व्यक्त केलेली अथवा झालेली नसतात. कारण, 'अर्थबोधपत्रिके'चा मुदलात तो हेतूच नाही. सुजाण वाचकांना, विविध विषयांबाबतची त्यांची त्यांची मते तारतम्याने स्वतंत्रपणे बनवता यावीत यासाठी विश्वसनीय स्त्रोतांद्वारे प्रकाशित केली जाणारी माहिती उपलब्ध करून देणे,

हा ‘अर्थबोधपत्रिके’च्या प्रकाशनामागील अगदी प्रारंभापासूनचा हेतू आहे. ‘अर्थबोधपत्रिके’च्या प्रत्येक अंकामधील संपादकियाच्या पानावर शीर्षस्थानी चौकटीमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जे वाक्य आवर्जून नमूद केलेले असते ते या उपक्रमाचे दिशादर्शक सूत्र. वर्तमानपत्रादी माध्यमांना शब्दसंख्येच्या मर्यादा पडतात. त्यांमुळे, प्रचलीत विषयांसंदर्भातील तात्कालिक जिज्ञासापूर्ती करण्यापलीकडे जाणे अन्य लोकमाध्यमांना बऱ्याच वेळा व्यवहारात शक्य बनत नसते. ‘अर्थबोधपत्रिके’ची भूमिका नेमक्या त्याच बिंदूवर महत्त्वाची ठरते. या सगळ्या प्रक्रियेमध्ये अंक प्रकाशित होण्याचे वेळापत्रक मागेपुढे होत राहते, त्यांबद्दल दिलगिरी व्यक्त केलीच पाहिजे. प्रस्तुत अंकामध्ये दोन लेख कुंभमेळ्यासंदर्भातील तपशीलाला वाहिलेले आहेत. कुंभमेळ्यातील नागा साधूंची उपस्थिती व त्यांचे मिरवणुकीने शाही स्नानासाठी संगमाकडे प्रयाण करणे, हा सगळ्यांच्याच कुतूहलाचा प्रांत होय. या साधूंच्या हातात नाना प्रकारची शस्त्रेही दिसतात. भगवी वस्त्रे परिधान केलेले साधू शस्त्रसज्ज कसे, हा प्रश्न आपल्यापैकी अनेकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविकच आहे. या प्रश्नाची काही एक उकल तिच्यामागील ऐतिहासिक कार्यकारणभावाद्वारे करण्याचा प्रयत्न या अंकात केलेला आहे. तंत्रज्ञानाची अपूर्व अशी घोडदौड, त्या क्षेत्रात सतत घडून येत असलेले गतिमान बदल यांद्वारे आपले जगणे जसे एकीकडे सुलभ बनते आहे तसेच तंत्रशास्त्रीय प्रगतीच्या कुशीतून नवनवीन आव्हानेदेखील जन्माला येत आहेत. भौतिक सुबत्तेवर लक्ष केंद्रित असलेल्या सर्वसाधारण मानसिकतेपायी निसर्गसिद्ध साधनसामग्रीचे मोल उचितपणे जाणून तिच्या संगोपनाची व संवर्धनाची योग्य ती बूज राखण्याबाबत आपल्या सगळ्यांकडूनच निबर बेपर्वाई दाखविली जाते आहे. त्यामुळे घडून येत असलेल्या अनेकानेक पर्यावरणीय बदलांचे पडसाद आपल्या जगण्याच्या विविध अंगांमध्ये आताशा ठसठशीतपणे उमटू लागलेले आपण अनुभवतो आहोत. पूर, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा, वादळे व वणव्यांची वाढती वारंवारता आणि तीव्रता, पावसाळ्यांदरम्यान मोठ्या शहरांमध्ये होणारे जलप्रलय... अशांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा अलीकडे वारंवार करावा लागत असलेला सामना हे पर्यावरणीय बदलांच्या परिणामांचे आपल्या परिचयाचे काही आयाम. परंतु, हे आता इतक्यावरच थांबत नाही. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे वाढते सरासरी तापमान आणि बेसुमार वाढते प्रदूषण यांपायी उद्‌भवणाऱ्या पर्यावरणीय प्रतिकूलतांचे फटके आताशा रक्तदान–रक्तसंकलन–रक्तसाठवण–रक्तवितरण या चतुष्कोणालादेखील बसू लागलेले आहेत. तिसरीकडे, वैद्यकशास्त्रातील प्रगतीपायी उंचावलेल्या सरासरी आयुर्मानाची एक परिणती वृद्धांना कराव्या लागत असलेल्या

जीवनसंघर्षाच्या माध्यमातून प्रकर्षाने आपल्या पुढ्यात उभी ठाकते आहे. अशा काही बदलांचा मागोवा घेण्याचा या अंकातील प्रयत्न वाचनीय ठरावा. जगभरात, भरधाव वेगाने नागरीकरण होत असलेल्या देशांमध्ये भारत आज आघाडीवर आहे. झपाट्याने हातपाय पसरणाऱ्या शहरीकरणाचे आपण सगळेच जसे लाभार्थी आहोत तसेच (आणि, त्याच वेळी) अस्ताव्यस्त व अनियंत्रित शहरी वाढीचे आपण बळीदेखील ठरतो आहोत. शहरांना आर्थिक विकासाची 'इंजिने' गणले जाते. परंतु, त्यासाठी शहरी वाढविस्ताराचे सुविहित व परिणामकारक व्यवस्थापन घडून येणे अत्यावश्यक ठरते. अशा व्यवस्थापनात शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका केवळ पायाभूतच नव्हे तर कळीची शाबीत होते. आपल्या देशातील नागरी प्रशासनाच्या पुढ्यातील जटिल प्रश्नांबाबत साधकबाधक चर्चा करण्याच्या दृष्टीने, अलीकडेच, पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी ('यशदा') या संस्थेमध्ये एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्या कार्यशाळेतील एका सत्रामध्ये साकारलेल्या विचारविनिमयाचा गोषवारा या अंकातील एका लेखामध्ये विस्ताराने मांडलेला आहे. समाजमनस्क प्रज्ञावंतांनी प्रसंगपरत्वे प्रगट केलेल्या विचारांचा काही अंश कालातीत असतो. प्रचलीत वास्तवाच्या काही अंगांचे आकलन अधिक प्रगल्भप्रणे करून घेण्याची दृष्टी असे विचारमंथन आपल्याला प्रदान करत असते. अशा काही पूर्वकालीन चिंतनाचा वेचक अंश सादर करण्याचा प्रयत्न या खंडात 'उजळणी' या सदराद्वारे करत आहोत. 'अर्थबोधपत्रिके'च्या या खंडातील प्रत्येक अंकात 'उजळणी' या सदराचा अंतर्भाव असेल. एकंदरीनेच, विविध प्रांतांतील घडामोडींचे आपले आकलन बहुआयामी बनावे, एखाद्या विषयाच्या प्रचारकी अथवा अभिनिवेशपूर्ण मांडणीद्वारे संबधित प्रांतासंदर्भातील आपल्या धारणा एकांगी, एककल्ली व कडव्या बनू नयेत, भवतालातील घटनांच्या वेगवेगळ्या पैलूंचे भान आपल्याला लाभावे अशा प्रकारचे वाचनसाहित्य तटस्थपणे पुढ्यात मांडत राहणे, हा 'अर्थबोधपत्रिके'च्या निर्मितीमागील गाभाहेतू होय. मुळातच वाचनासंदर्भातील आवडी-निवडी आणि गरजा वेगाने बदलत असलेल्या वर्तमानात 'अर्थबोधपत्रिके' सारख्या काहीशी अलग व तुलनेने पठडीबाहेरील पिंडप्रकृती असणाऱ्या नियतकालिकाचा वाचकर्ग बहुसंख्य असणे दुरापास्तच! आपल्यासारख्या सुजाण वाचकांच्या पाठबळावरच १९९८ सालापासून आजवर 'अर्थबोधपत्रिका' त्याच हेतूला अनुसरत वाटचाल करत आलेली आहे. हा सगळा पदराला खार लावणारा उपक्रम आहे. परंतु, संस्थेला त्याचा खेद अथवा विषाद मात्र अणुमात्रही नाही. 'अर्थबोधपत्रिके'वरील लोभ असाच चिरंतन राहो, हीच विनंती.

# पर्व, पर्वणी आणि महाकुंभ

'पर्व' आणि 'पर्वणी' या दोन संकल्पनांबाबत आपल्या देशातील सर्वसामान्य भाविक मनांमध्ये सश्रद्ध असे अपार आकर्षण पूर्वापार नांदत आलेले दिसते. प्राचीन भारतीय धर्मशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रामध्ये तर पर्वांना अतिशय महत्त्व लाभलेले आहे. राशिचक्रामधील ग्रहांचे काही विशिष्ट कालावधीदरम्यान विविध स्थानांमध्ये होणारे प्रवेश आणि त्या त्या स्थानातील त्यांचे वास्तव्य हे विशेष पुण्यकारक असते, ही धारणा 'पर्व' या संकल्पनेच्या मुळाशी नांदते. काही विशिष्ट योग जुळून येण्याला 'पर्व' असे नामाभिधान आहे. असा योग जितका काळ स्थिर असतो त्या काळाला 'पर्वकाळ' असे म्हणतात. असे पर्वकाळ नेमके कोणते यांबाबत आपल्या पुराणवाङ्मयात निर्देश सापडतात. असा योग सहजासहजी जुळून येणारा नसतो. साहजिकच, त्या पर्वकाळादरम्यान आपले आचरण कसे असावे आणि कसे असू नये या संदर्भातील काही संकेत म्हणा अथवा धारणा म्हणा, प्राचीन धर्मशास्त्रामध्ये नमूद आहेत. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर पर्वकाळासंदर्भातील विधिनिषेध स्पष्ट आहेत. या विधिनिषेधांवर विश्वास अगर श्रद्धा ठेवावी अथवा न ठेवावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न ठरतो. तीर्थस्नान, जप, दान, उपवास या बाबी पर्वकाळादरम्यान आवर्जून कराव्यात, असा पूर्वापारचा संकेत सांगतो. तर, अभक्ष्यभक्षण पर्वकाळादरम्यान निषिद्ध मानलेले दिसते. फारा दिवसांनी उगवणाऱ्या पर्वकाळालाच 'पर्वणी' असे म्हणले जाते. असा पर्वकाळ साधण्याची संधी दुर्मिळ गणतात. म्हणूनच, 'पर्वणी साधली' अशी शब्दसंहती त्या संदर्भात योजली जाते.

भारतीय धार्मिक-सांस्कृतिक परंपरेमध्ये कुंभपर्वाला जे वैशिष्ट्यपूर्ण स्थान व महत्त्व आहे त्याचा उलगडा या संदर्भात करून घ्यावयास हवा. या पर्वाचा अनुबंध, त्याचे नाव सूचित करते त्यानुसार, कुंभाशी आहे. कुंभाला पुन्हा अर्थाचे चार आयाम आहेत. त्यांचा परिचय प्रथम करून घेणे उपकारक ठरावे. आकाशात स्थित

असणाऱ्या राशीचक्रातील अकरावी राशी हा झाला त्यांतील पहिला अर्थ. शनी हा ग्रह या राशीचा स्वामी मानला जातो. पाण्याने भरलेला मातीचा घडा (कुंभ) हातात घेऊन उभा असलेला मनुष्य हे 'कुंभ' राशीचे प्रतीक गणले जाते. घटाचा नाश हा नानाविध नामरूपांनी व्यक्त झालेल्या या जगाचा आणि जगाच्या निर्मितीस कारणभूत असणाऱ्या शक्तींचा विलय गणला जातो. वास्तुशास्त्रामध्ये कुंभाच्या आकाराची वास्तू संकल्पिलेली आहे. कुंभाचा आकार असणाऱ्या राजवाड्याला मत्स्य पुराणामध्ये 'कुंभ' असेच संबोधलेले दिसते. धान्यधुन्याचे मोजमाप करण्याचे एक मापही आपल्या परंपरेमध्ये 'कुंभ' या नावाने ओळखले जात असे. आता ते केव्हाच कालबाह्य झाल्याने आपल्या स्मृतीमधूनही ते पार पुसले गेलेले आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राची साक्ष काढावयाची तर एका कुंभामध्ये २० द्रोण धान्य मावत असे. पूर्वीच्या गणनपद्धतीनुसार, १० शेरांचा एक द्रोण या हिशेबाने एका कुंभामध्ये २०० शेर धान्य बसत असे. ४० शेरांचा एक मण या मापाने, मग, पाच मण धान्य एका कुंभात सामावले जाई, असे गणित दिसते. कुंभाच्या आकाराचा ढोल प्राचीन काळी रणवाद्य म्हणून वापरात असे. त्याला 'कुंभमुख' असेही नाव होते.

'कुंभ' या संज्ञेच्या या चार अर्थांपैकी आपल्याला इथे कर्तव्य आहे ते त्याच्या नावाने जे पर्व आपल्या संस्कृतीमध्ये विख्यात आहे त्याच्याशी. त्या पर्वाला म्हणतात 'कुंभपर्व.' परंपरेमध्ये हा योग पुण्यकारक गणला जातो. हा पर्वकाळ दर बारा वर्षांनी येतो. हा तसा फारा वर्षांनी उगवणारा पर्वकाळ असल्यामुळेच तो साधण्याला 'पर्वणी' म्हणले जाते. 'सिंहस्थ' हा कुंभपर्वाचाच एक भाग होय. गुरूचा प्रवेश सिंह राशीमध्ये झाल्यानंतर केलेले गोदावरीचे स्नान गंगास्नानतुल्य मानले जाते. गुरूचा निवास सिंह राशीमध्ये असताना गुप्तरूपाने गंगा नदी गोदावरीच्या भेटीस येते अशी पारंपरिक धारणा सांगते. गोदावरीच्या उगमासंदर्भात पुराणांतरी असणारी एक कथा मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रसन्न झालेल्या शंभुशंकरांनी गौतम ऋषींना त्यांच्या जटेतील एक खंड प्रसादरूपाने दिला. गौतमांनी त्याची स्थापना त्र्यंबकेश्वरानजीकच्या ब्रह्मगिरीवर केली. त्या दिवशी तिथी होती माघ शुद्ध दशमी आणि गुरू होता सिंह राशीमध्ये. भागवत पुराणांतर्गत महाविष्णूंच्या विख्यात अशा दशावतारांपैकी, त्या वेळी, पृथ्वीवर कूर्मावतार चालू होता, अशी परंपरेची श्रद्धा आहे. ब्रह्मगिरीवर गौतमांनी स्थापलेल्या शिवजटेतील एका खंडामधून गोदावरीचा उगम झाला, अशी गोदावरीची जन्मकथा पुराणांत ग्रथित आहे. सिंहस्थ हा, आपल्या परंपरेमध्ये, गोदावरीचा द्वादशवार्षिक

वाढदिवस गणला जातो. हा मोठा पुण्यपर्वकाळ असल्यामुळे भाविक साधक सिंहस्थाला पर्वणीच समजतात. ‘**आली सिंहस्थपर्वणी**’ ही तुकोक्ती त्याच वास्तवाची पुस्ती करते.

आपल्या देशात कुंभयोगाची पर्वणी एकंदर चार क्षेत्रांमध्ये अवतरते. प्रयाग, हरिद्वार, नाशिक आणि उज्जयिनी ही ती चार तीर्थस्थाने. या संदर्भातील पारंपरिक धारणांनुसार सूर्य आणि चंद्र मकर राशीमध्ये तर, गुरू वृषभ राशीमध्ये असताना त्या काळात अमावास्या आली तर कुंभयोग प्रयागक्षेत्री साजरा केला जातो. प्रयागातील कुंभपर्वाची तीन उपपर्वे परंपरेमध्ये सांगितलेली आहेत. मकरसंक्रांत हे त्यातील पहिले उपपर्व, पौषातील अमावास्या हे दुसरे तर, वसंतपंचमी हे तिसरे उपपर्व. या तीनपैकी पौष अमावास्येचे उपपर्व हे सर्वांत महत्त्वाचे गणले जाते. त्यालाच ‘पूर्णकुंभ’ असे नाव आहे. या तीन उपपर्वांबाबत मात्र आणखी एक श्लेष दिसतो. तो असा की, अन्य एका परंपरेनुसार प्रयागातील कुंभपर्वणीची मकरसंक्रांती, पौष पौर्णिमा आणि पौष अमावास्या अशी तीन उपपर्वे सांगितली जातात. म्हणजेच, या दोन परंपरांमध्ये मकरसंक्रांत आणि पौष अमावास्या ही दोन उपपर्वे समान दिसतात. फरक दिसतो तो केवळ एकाच तिथीबाबत. एक परंपरा वसंतपंचमी हे तिसरे उपपर्व मानते तर दुसरी परंपरा पौष पौर्णिमा हे तिसरे उपपर्व मानते. प्रयाग, हरिद्वार, नाशिक व उज्जयिनी या चार ठिकाणी कुंभपर्व साजरे केले जाण्याचा संबंध, परंपरेनुसार, गुरू, सूर्य आणि चंद्र या तिघांच्या राशीस्थानाशी संलग्न आहे. कुंभ राशीमध्ये गुरू असताना मेष राशीमध्ये सूर्य असेल तर कुंभपर्व हरिद्वारला साजरे होते. सिंह राशीमध्ये गुरू तर कर्क राशीमध्ये सूर्य व चंद्र असतील तर कुंभपर्व भरते नाशिकला. तर, वृश्चिक राशीमध्ये गुरू आणि तूळ राशीमध्ये सूर्य असताना कुंभाचे आयोजन केले जाते उज्जयिनीला. गुरूच्या भ्रमणक्रमानुसार एका राशीमधून गमन केल्यानंतर पुन्हा त्या राशीत गुरू साधारणत: १२ वर्षांनी परत येतो. त्यांमुळे, कुंभपर्व दर १२ वर्षांनी येते. हा तसा सहजासहजी येणारा योग नसल्यामुळेच कुंभाला ‘पर्वणी’ असे संबोधले जाते.

सण-समारंभ असोत अथवा पुण्य-पर्वकाळ, भारतीय परंपरेमध्ये यापैकी प्रत्येकाच्या मुळाशी काही ना काही कथानक अथवा प्रसंग जोडलेला असतो. कुंभाबाबतही तसेच आहे. कुंभपर्वाचा अनुबंध आपली परंपरा जोडते थेट पुराणांतरीच्या समुद्रमंथनाच्या आख्यायिकेशी. देव-दानवांनी क्षीरसिंधूचे मंथन चालू केल्यानंतर भगवान धन्वन्तरी हातात अमृतकुंभ घेऊन अवतरले. हा अमृतकुंभ दानवांच्या हाती लागला तर अमृत प्राशन करून राक्षस अमर बनतील आणि मग आपली काही धडगत नाही या धास्तीने, देवांच्या इशाऱ्यानुसार देवराज इंद्राच्या जयंत नावाच्या

मुलाने तो अमृतकुंभ पळवला. परिणामी, देव आणि दानवांचे तब्बल १२ दिवस-रात्र घनघोर युद्ध झाले. त्या धुमश्चक्रीदरम्यान अमृताने भरलेला तो कुंभ १२ वेळा खाली पडला. खाली पडलेल्या त्या कुंभाचे रक्षण, त्या काळात मग, सूर्य-चंद्र-बृहस्पती शनी या चौघांनी केले. तो अमृतकुंभ ज्या १२ ठिकाणी खाली पडला त्या १२ स्थानांवर कुंभपर्व - संबंधित ग्रह आणि त्यांची त्यांची राशीस्थाने यांचे समीकरण जुळले की- साजरे केले जाते, अशी कथा पुराणांतर्गत सांगितलेली आहे.

मुळात, भारतीय परंपरेत नद्या पवित्र मानलेल्या आहेत. त्यांतच, जिथे दोन अथवा अधिक नद्यांचा संगम होतो अशी संगमस्थाने आणि तशा संगमस्थानांवर केलेले स्नान अधिकच पुण्यदायक मानले जाते. त्यांमुळे, पवित्र गणल्या गेलेल्या नद्यांमध्ये आणि/अथवा अशा नद्यांच्या संगमावर स्नान करण्याला पुण्यकर्म आणि अध्यात्म साधनेचे एक अंग समजण्याचा लोकमानस आपल्या देशात प्राचीन काळापासून नांदत आलेला आहे. पूर्वकालीन तसेच समकालीन अनेक देशी-विदेशी अभ्यासकांनी या वास्तवाची तशी नोंदही करून ठेवलेली आहे. कुंभमेळ्याबाबत ऐतिहासिक समजता येईल असा अगदी सर्वांत जुना निर्देश गवसतो तो चिनी प्रवासी ह्यू-एन्-त्संग यांच्या टिपणांत. ह्यू-एन्-त्संग भारतामध्ये येऊन गेले होते इसवी सनाच्या सातव्या शतकात.

काही अभ्यासकांच्या अभ्यासानुसार आजमितीस हरिद्वार, प्रयाग, उज्जैन आणि नाशिक अशा चार स्थळांवर कुंभमेळ्याचे आयोजन केले जात असले तरी, काही जुन्या दस्तऐवजांमध्ये मात्र कुंभाच्या संदर्भात हरिद्वार आणि प्रयाग या दोनच स्थानांचा काय तो निर्देश आढळतो. भारतविद्याभ्यासक कामा मॅक्लिन यांच्या प्रतिपादनानुसार प्रयाग येथे भरणाऱ्या धार्मिक यात्रेला अथवा मेळ्याला १७६० सालापूर्वी 'कुंभमेळा' म्हणून निर्देशित केले जात नसे. प्रयाग येथे भरणाऱ्या त्या यात्रेचा अथवा मेळ्याचा महिमा मात्र त्या काळातही मोठा होता, हे वास्तवदेखील त्यांनी नमूद करून ठेवलेले आहे. जेम्स लॉश्चट्फेल्ड या आणखी एका पाश्चिमात्य अभ्यासकांच्या निरीक्षणानुसार चार तीर्थांमध्ये भरणाऱ्या कुंभमेळ्यांचा महिमा आजकाल उदंड वाढलेला असला तरी, कुंभांच्या आयोजनासंदर्भात ऐतिहासिक पुरावे मात्र त्या मानाने अत्यल्प प्रमाणातच हाताला लागतात. हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व नाशिक या चार ठिकाणी काही विशिष्ट कालावधीदरम्यान मोठ्या प्रमाणावर यात्रा भरत असल्याबद्दलचे निर्देशदेखील, त्यांच्या मते, खूप अलीकडचे आहेत. हरिद्वार येथे दरवर्षी वैशाखात, तर प्रयागात दरवर्षी

माघ महिन्यात मेळा भरत असल्याबाबतच्या नोंदी मात्र पूर्वकालीन दस्तऐवजांमधून पुढ्यात येतात, असेही निरीक्षण लॉश्चट्रिफल्ड नोंदवितात.

या संदर्भात साधुमेळ्याचे कथन मात्र अगदी निराळेच आहे. त्या कथनाला अधिष्ठान आहे ते पारंपरिक श्रद्धेचे. साधुसमाजाच्या धारणांनुसार कुंभमेळ्याच्या उपक्रमाचे प्रवर्तन घडवून आणले ते आद्य शंकराचार्यांनी. इसवी सनाचे साधारण आठवे-नववे शतक हा आद्य शंकराचार्यांचा काळ ठरतो. साधू-संन्यासी, पारमार्थिक सिद्ध-साधक, उपासक यांच्या नित्य भेटीगाठी घडून याव्यात, त्या निमित्ताने चर्चा-विचारमंथन घडावे, असा त्यांचा हेतू असल्याची एक पारंपरिक धारणा दिसते. त्याच वेळी, काही ठरावीक कालावधीनंतर भरणाऱ्या अशा यात्रा-मेळ्यांद्वारे हिंदुधर्मातील साधू-संन्याशांचे संघटन घडून यावे, असाही हेतू या उपक्रमाच्या मुळाशी असल्याचा आणखी एक विचारप्रवाह दिसतो. परंतु, या पारंपरिक धारणांना पुष्टी देणारे ऐतिहासिक पुरावे अथवा दाखले मात्र सापडत नाहीत, असेही निरीक्षण अभ्यासक नोंदवितात.

साधू, संन्यासी, गोसावी अशांची कुंभमेळ्यामधील प्रचंड संख्येने असणारी उपस्थिती हा कायमच एक मोठ्या जिज्ञासेचा प्रांत राहिलेला आहे. 'गोसावी' हा यतींचा एक वर्ग होय. आपल्या देशात गोसाव्यांची ही परंपरा प्रदीर्घ काळापासून अव्याहत चालत आलेली आहे. शैवपंथी आणि वैष्णवपंथी असे गोसाव्यांमध्ये दोन प्रमुख वर्ग आहेत. 'गोसावी' ही आपल्या देशातील अतिशय प्राचीन अशी संस्था होय. या परंपरेचा माग काढू गेलो तर आपण थेट वैदिक काळात पोहोचतो. परंतु, वैदिक कालखंडामध्ये 'गोसावी' या संज्ञेला अतिशय निराळा अर्थ होता. वेदकाळात 'गोसावी' या पदाची सांगड गोपालनाशी घातली जात असे. 'गोसावी' या संज्ञेला आज जो अर्थ आहे तो वेदकाळात नव्हता. गोसावी पंथाचा स्वीकार केलेल्यांना या भूमीमध्ये अतिशय मान प्रदान केला जात असल्याचे उल्लेख मेगॅस्थिनीसने करून ठेवलेले आहेत. त्यांत, नग्न साधूंप्रमाणेच नगरांजवळ राहणाऱ्या संन्याशांचाही निर्देश सापडतो. काही संन्यासी घरबारी असून ते औषधोपचार करणे, भविष्य सांगणे यांसारखे उद्योग करत असल्याचेही मेगॅस्थिनीसने नोंदवून ठेवलेले आहे. नग्न संन्यासी बहुतांश वना-जंगलांमध्येच वास करत असल्याचे स्ट्रॅबो नावाच्या इतिहासकारानेदेखील नमूद करून ठेवलेले आहे. तर, घरबारी गोसावी गावात घरे बांधून राहत असल्याचेही त्यांनी नमूद करून ठेवलेले आहे. या साधू-गोसाव्यांचे त्यांच्या देहेन्द्रियांवरील नियंत्रण कमालीचे असल्याने तरूण स्त्रियाही त्यांच्या परिसरात नि:संकोचपणे त्यांचे

त्यांचे व्यवहार उरकीत असत, असेही स्ट्रॅबो आवर्जून नोंदवून ठेवतात. गोसावी पंथामध्ये विविध प्रकारचे फरक असून त्यांचे आचार, परंपरा, साधनाप्रकार यांतही भरपूर भिन्नता नांदत आलेली आहे. काळाच्या ओघात त्यांत वेळोवेळी बदलही होत आलेले आहेत.

गोसावी पंथियांमध्ये एकंदर दहा वर्ग अथवा प्रकार अथवा नावे आढळतात. तीर्थ, आश्रम, वन, अरण्य, गिरी, पर्वत, सागर, सरस्वती, भारती आणि पुरी ही ती दहा नावे होत. या प्रत्येक नावाला एक विशिष्ट अर्थ असून त्याचा संबंध त्या त्या वर्गातील गोसाव्यांच्या चर्येशी आहे. त्रिवेणी संगमात तत्त्वार्थभावाने जो स्नान करतो तो 'तीर्थ.' सर्व इच्छा-कामनांचे विसर्जन करून आश्रमात निवास करतो तो 'आश्रम.' स्वानंदामध्येच रममाण होऊन अरण्यात वास करतो तो 'अरण्य.' सर्वसंगपरित्याग करून वनातील झऱ्याकाठी जो काळ व्यतीत करतो तो 'वन.' स्थिर बुद्धीने गिरीकंदरामध्ये जो अभ्यासात मग्न राहतो तो 'गिरी.' पर्वताच्या पायथ्याशी निवास करून सतत विवेकशील जीवन व्यतीत करणारा तो 'पर्वत.' समुद्राप्रमाणे सतत गंभीर तत्त्वचर्चेत निमग्न असतो तो 'सागर.' स्वरज्ञानात जो निपुण आहे तो 'सरस्वती.' ज्याला दु:खाचा भार सहन करावाच लागत नाही तो 'भारती' आणि अखंड ज्ञानातच जो पुरेपूर रममाण झालेला आहे तो 'पुरी', अशी या दहा वर्गांच्या नावांची तात्त्विक उपपत्ती 'मठाम्नाय'नामक ग्रंथामध्ये विवरलेली सापडते.

गोसाव्यांमधील हे दहा वर्ग अथवा प्रकार आद्य शंकराचार्यांनी प्रवर्तित अथवा निर्माण केल्याची साधुसमाजाची धारणा आहे. परंतु, गोसावी पंथियांमध्ये आढळून येणारी ही दहा नावे उपनावे अथवा/आणि कुळनावे म्हणून शंकराचार्यांच्या आधीपासूनच इथल्या समाजात प्रचलीत होती, असे अभ्यासांती आता सिद्ध झालेले आहे. कोणत्याही वर्गातील असले तरी, हे साधक-उपासक गोसावी बव्हंशी शंकराचार्यांच्या अद्वैतमताला अनुसरणारे होते. केवळ इतकेच नाही तर, या दसनामी गोसाव्यांनी वैदिक धर्माच्या प्रचार-प्रसारासाठीही भरपूर कष्ट उपसले. यथावकाश यांच्यापैकी काहींनी वैष्णवपंथाची दीक्षादेखील घेतली. तर, यांपैकी काही जैन व शीख बनले, असेही दिसते.

लौकिक जीवनापेक्षा निराळी जीवनशैली अंगीकारून अध्यात्मसाधनेत आयुष्य व्यतीत करणाऱ्या या गोसाव्यांप्रमाणेच, या देशात क्षात्रवृत्ती जोपासणाऱ्या गोसावी पंथियांचीदेखील एक मोठी परंपरा पूर्वापार नांदत आलेली आहे. सिकंदर आणि चंद्रगुप्त यांच्या काळात या भूमीत गोसाव्यांची लहान-लहान राज्ये होती, असे

उल्लेख सापडतात. सिकंदराने हिंदुस्थानवर स्वारी केली त्या वेळी पंजाबात गोसाव्यांचे एक छोटेसे राज्य असल्याचे उल्लेख आहेत. बुंदेलखंडातही गोसाव्यांची राज्ये होती. तसेच तक्षशिलेजवळही काही नागा साधू तेव्हा राहात असत. काश्मीरच्या राजदरबारात काही गोसावी होते. राजस्थानात तर राजपुतांचे आराध्य दैवत असलेल्या एकलिंगजीच्या पूजाअर्चेची सेवा गोसाव्यांकडेच होती. परिस्थितीवशात, राजपुतांच्या बाजूने अनेकदा गोसाव्यांनी शत्रूशी दोन हात केल्याचे उल्लेख सापडतात. पृथ्वीराज चौहान, जयचंद अशा राजांच्या सैन्यांमध्ये गोसावी सैनिक बऱ्याच संख्येने असल्याच्याही नोंदी आहेत.

कुंभामध्ये सहभागी होणारे गोसावी–साधू निरनिराळ्या आखाड्यांशी संलग्न असल्यामुळे प्रथम 'आखाडा' ही संस्था नीट समजावून घ्यावयास हवी. आध्यात्मिक साधना व तपस्या आणि लढाऊ क्षात्रवृत्ती अशा उभय परंपरा गोसावी पंथियांमध्ये बऱ्यापैकी समांतर चालत राहिल्याने 'आखाडा' या संस्थेची निर्मिती त्याच प्रक्रियेद्वारे घडून आली असावी, असे मानण्यास जागा आहे. गोसाव्यांचे आखाडे म्हणजे धार्मिक तसेच लष्करी शिक्षण प्रदान करणारी संस्थात्मक रचना होती. गोसाव्यांमध्ये क्षात्रतेजाचे बीजांकुरण आखाड्यांच्या माध्यमातून घडून आले की, क्षात्रवृत्ती जोपासणाऱ्या गोसाव्यांमुळे आखाडे साकारले, हे आज घटकेला सांगणे अवघड आहे. परंतु, अगदी नेमका कालखंड सांगता येणे अवघड असले तरी, 'आखाडे' ही संस्था प्राचीन काळापासून सक्रिय राहत आल्याचे निर्देश हाताला लागतात. काळाच्या ओघात त्यांचे रंगरूप तसेच व्यवस्थापन यात चढउतार झाले असणेही शक्य आहे. कारण, पृथ्वीराज चौहान व जयचंद यांनी आखाड्यांची व्यवस्था पुन: सावरली असे संबंधित दस्तऐवजांमध्ये नमूद दिसते.

आद्य शंकराचार्यांच्या शिष्यगणांमध्ये काही गोसावीपंथी होते. आपल्या अशा गोसावीपंथी शिष्यवरांसाठी त्यांनी सात आखाडे निर्माण केले असे परंपरा सांगते. सनातनी, निर्वाणी, निरंजनी, अटल, अभान, आनंद आणि अग्नी हे ते सात आखाडे. सनातनी आखाड्यालाच 'जुना आखाडा' असेही नाव आहे. प्रत्येक आखाड्याचे आराध्य दैवत, आचारविधी, परंपरा तसेच ध्वज निरनिराळे आहेत व असतात. परंतु, हे आखाडे शैवपंथी गोसाव्यांचे होत. आचार्यांनी हंस, परमहंस, दंडी आणि नग अशी मठपतींची जी चौपदरी व्यवस्था निर्माण केली त्यांच्याच सक्रिय शाखा म्हणजे हे आखाडे होत, अशीदेखील एक धारणा प्रचलीत दिसते. शैवपंथी गोसाव्यांप्रमाणेच वैष्णवपंथी गोसाव्यांचेदेखील सात आखाडे आहेत. शैवपंथी

गोसाव्यांच्या तुलनेत वैष्णवपंथी गोसावी हे त्या मानाने बरेच अलीकडचे ठरतात, असे मानले जाते. काही अभ्यासकांच्या मते, वैष्णवपंथी गोसाव्यांच्या आखाड्यांची स्थापना १७व्या शतकाच्या आगेमागे झाली असावी. दिगंबर, निर्वाणी, निर्मोही, निरालंबी, संतोषी, महानिर्वाणी आणि खाकी अशी वैष्णवपंथी गोसाव्यांच्या आखाड्यांची नावे होत. आखाडा अथवा पंथपरंपरा कोणतीही असो, कुंभपर्वादरम्यान यच्चयावत साधूसमाज मेळ्यामध्ये कटाक्षाने सहभागी होत असतो, हे कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य होय.

कुंभपर्वादरम्यान प्रगट होणारे नागा साधू अन्य वेळी कोणाच्याही नजरेस पडत नाहीत. कुंभमेळ्यादरम्यान त्या त्या संबंधित तीर्थक्षेत्रात पर्वकाळ व्यतीत केल्यानंतर हे साधू पुन्हा त्यांच्या त्यांच्या ठिकाणी, जंगलावनात, गिरीकंदरात अथवा निबीड पर्वतराजींमध्ये साधना करण्यासाठी निघून जातात, असे सांगितले जाते.

## ‘अर्थबोधपत्रिके’च्या या अंकातील लेखांसाठीचे संदर्भ


1. Jha, Dhirendrra K, Naga Sanyasis - A Power Play.
2. Avantas Kumar, Naga Sadhus and the Hindu ascetic warrior tradition.
3. Siddharth Kapila, One day in January 2013.
4. Karthikeyan, Ananth, Naga Gosain Sadhus’ solidarity with Awadh.
5. https://www.csis.org/programs/strategic-technologies-program/significant-cyber-incidents
6. https://www.globenewswire.com/news-release/2025/06/30/3107676/0/en/Global-Cybersecurity-Market-to-Worth-Over-US-723-8-Billion-By-2033-North-America-Dominates-Asia-Pacific-Accelerates-Europe-Consolidates-Emerging-Markets-Awaken-Says-Astute-Analytic.html
7. https://blog.netwrix.com/biggest-cyber-attacks-in-history
8. https://www.thelancet.com/journals/lanplh/article/PIIS2542-5196(25)00051-8/fulltext
9. https://www.nytimes.com/2025/04/16/climate/climate-emergency-blood-supply.html
10. https://www.usc.edu.au/about/unisc-news/news-archive/2025/april/blood-pressure-new-study-predicts-how-climate-change-will-jeopardise-blood-supply
11. https://www.wevolver.com/article/cobot-vs-robot https://ifr.org/ifr-press-releases/news/how-robots-work-alongside-humans.


*(उर्वरित संदर्भ पृष्ठ २४ वर)*

# इतिहास

## कुंभमेळा आणि सशस्त्र नागा साधू

गंगा-यमुना-सरस्वती या तीन नद्यांचा संगम प्रयाग येथे झालेला असल्याची पूर्वापार धारणा असल्यामुळे प्रयागला 'तीर्थराज' असे संबोधतात. प्रयागतीर्थावर कुंभपर्वणीदरम्यान स्नानपर्वासाठी जमणारे साधू-संन्यासी हे या पर्वोत्सवाचे एक वैशिष्ट्य गणले जाते. 'बैरागी' हा आपल्या देशातील तसाच एक जुना व मोठा संप्रदाय होय. बैरागी संप्रदायात शैव आणि वैष्णव असे दोन पंथ दिसतात. शैवपंथीय बैराग्यांच्या तुलनेत वैष्णव बैराग्यांची साधना सौम्य असते. हे साधू-बैरागी निरनिराळ्या जातींचे असतात. भिक्षाटनावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. पंथानुसार त्यांचे विधिनिषेध, वेषभूषा व उपासनापद्धती बदलते. त्यांचे प्रमाणग्रंथ, दीक्षाविधी हेदेखील निरनिराळे आहेत. स्वत:च्या देहाबाबत ते उदासीन असतात. काही फिरस्ते तर काही तीर्थवास करणारे असतात. काही साधू भिन्न भिन्न अवस्थांमध्ये अथवा मुद्रांमध्ये अतिशय कठीण अशी देहदंडणात्मक साधना करत राहतात. काही साधू एकेकटे तर काही समूहाने भ्रमण करतात. समूहाने सतत फिरस्ते असणारे साधू-बैरागी स्वसंरक्षणार्थ नाना प्रकारची शस्त्रास्त्रेदेखील स्वत:जवळ बाळगतात. रानावनात वास्तव्य करून असणाऱ्या साधू-संन्याशांच्या कुटीमध्ये सतत एखादी धुनी प्रज्ज्वलीत असते.

परिचर्या आणि वर्तन यांमुळे कुंभ पर्वातील नागा साधू हाच एक जिज्ञासेचा मोठा व स्वतंत्र प्रांत ठरतो. कुंभमेळ्यामध्ये सहभागी होणारे नागा साधू हा नित्यानेच उदंड चर्चेचाही विषय सतत बनत आलेला आहे. माध्यमांच्या विश्वातदेखील साधूंच्या याच वर्गाला मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळते. मिरवणुकीने शाही स्नानासाठी प्रयाण करणारे हे साधू त्यांची वेषभूषा, गळ्यात तसेच जटांभोवती त्यांनी परिधान केलेल्या फुलांच्या माळा, हार, गळ्यात, मनगटात तसेच जटामुगुटाभोवती वेष्टिलेल्या रुद्राक्षमाळा, चेहऱ्यावर तसेच अंगावर लेपलेली विभूती, हातात धारण केलेली त्रिशूळ, भाले, तलवारी, चिमटे, दंड यांसारखी हत्यारे... अशा त्यांच्या

जाम्यानिम्यापायी जिज्ञासेचा आणि दराऱ्याचा विषय ठरून राहतात. अनेक नागा साधू तर वस्त्रविहिन अवस्थेतच मिरवणुकीमध्ये सामील झालेले दिसतात. कित्येक साधू तर त्यांच्या धुंदीतच असतात. १२ वर्षांतून एकदा उगवणाऱ्या कुंभपर्वादरम्यानच्या काळात या नागा साधूंचे वास्तव्य नेमके कोठे असते, याचाही काही पत्ता लागत नाही. कुंभमेळ्यामध्येदेखील या नागा साधूंच्या डेऱ्यांमध्ये वरकड लोकांना प्रवेश नसतो. वरकरणी उग्र भासणाऱ्या त्यांच्या बाह्य दर्शनापायी त्यांची गूढ जीवनशैली उगलडण्यासाठी त्यांच्या समीप जाण्याचीदेखील भीतीच वाटते. हे साधूदेखील पुन्हा निरनिराळ्या आखाड्यांचे सदस्य म्हणा अथवा अनुयायी म्हणा असतात.

प्रत्येक आखाड्याचे विधिनिषेध आणि नियम-संकेत पुन्हा भिन्न आहेत. शाही स्नानासंदर्भातील त्यांचे मानापमानही तितकेच तीव्र प्रतीत होतात. ते मान आखाड्यांच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वावर अवलंबून आहेत, असे सांगितले जाते. स्नानाच्या ठरलेल्या क्रमात काही मागे-पुढे झाले तर शस्त्रसज्ज असलेल्या नागा साधूंदरम्यान रक्तरंजित संघर्षही झडतात. साधूंच्या या वर्गाला 'नागा साधू' असे संबोधत असल्यामुळे हे ईशान्य भारतातील 'नागा' जमातीचे साधू असावेत, असाही एक समज होण्यास भरपूर जागा आहे. परंतु, वास्तवात मात्र तसे नाही. 'नागा' हे साधूंच्या या शाखेचे विशेषण होय. 'वस्त्ररहित' हा 'नागा' या विशेषणाचा या संदर्भातील अर्थ. या शाखेचे साधू पूर्वापारच वस्त्रविहिन अथवा अगदी किमान वस्त्रांनिशी संचार करत असल्यामुळे त्यांना 'नागा' हे विशेषण जोडले गेले व जाते. 'नागा' या साधुनामासंदर्भात आणखीही एक उपपत्ती सांगितली जाते. पर्वताला संस्कृतामध्ये 'नग' असे म्हणतात. नगा-वनामध्ये म्हणजेच पर्वतराजीमध्ये वास करणारे साधू म्हणून त्यांना 'नग-वासी' साधू पर्यायाने 'नागा साधू' असे नामाभिधान प्राप्त झाले असावे, अशीही उपपत्ती काही अभ्यासक मांडतात. म्हणजे, 'नग-वासी साधू' या वर्णनसंहतीचे बोली भाषाव्यवहारात 'नग-साधू' पर्यायाने 'नागा साधू' असे रूपांतरण घडून आले असावे, असे ही संभाव्य उपपत्ती सूचित करते. परंतु, 'नागा साधू' या विशेषणाच्या अशा स्पष्टीकरणाच्या पुष्टीकरणार्थ फारसे निर्देश सापडत नाहीत हेही इथे नोंदवून ठेवावयास हवे. आद्य शंकराचार्यनिर्मित मठाधिपतींच्या चार वर्गांतील 'नग' या नावाने सूचित होणाऱ्या परंपरेशी नागा (पर्यायाने, 'नग') साधूंचा काही अनुबंध असावा, असे मानण्यास जागा आहे.

नागा साधू बनणे, ही कठोर तपस्येनंतर शक्य बनणारी बाब होय. नाना प्रकारचे देहदंडण व तीव्र कायातपस्या त्यासाठी करावी लागते. त्या परीक्षेला उतरल्यानंतरच

गुरूच्या आज्ञेनेच संबंधित व्यक्तीला पंथाचे अनुयायित्व बहाल केले जाते. या पंथाचा अनुयायी बनू इच्छिणाऱ्याने अविवाहित राहणे क्रमप्राप्त असते.

कुटुंबाचा पाश त्याला अथवा तिला असता कामा नये, हा मूलभूत दंडक गणला जातो. 'नागा साधू' या वर्गात समावेश होण्यापूर्वी ती व्यक्ती वस्त्रे धारण करत राहते. त्या अवस्थेदरम्यान तिला 'वस्त्रधारी साधू' असे संबोधले जाते. 'नागा साधू' म्हणून त्याला अथवा तिला अधिमान्यता मिळण्याचा काळ किमान दोन वर्षे ते बारा वर्षे असा कितीही असू शकतो. गुरूकडून विधिवत दीक्षा प्राप्त झाल्यानंतरच वस्त्रधारी साधू वस्त्रांचा संपूर्णत: त्याग करून 'नागा साधू' बनतो. सर्वांगाला राख अगर भस्म चर्चून वस्त्रविहिन अवस्थेत भ्रमण करत राहणे, ही नागा साधूंची परिचर्या त्यांच्या नि:संगपणाचे द्योतन करते. देहाची आसक्ती पूर्णत: सोडल्याचे ते लक्षण मानले जाते. नागा साधूला त्याच्या जीविताचीदेखील तमा नसते. किंबहुना, नागा पंथाची दीक्षा घेतलेला संन्यासी जिवावर उदार झाल्याचे अधोरेखित व्हावे यासाठी दीक्षित साधूला स्वत:चे पिंडदान स्वत:च्या हातानेच करावे लागते!

हे साधू व गोसावी, प्रथमपासूनच, शस्त्रसज्ज होते किंवा कसे, यांबाबत मात्र स्पष्ट असे काहीच निर्देश सापडत नाहीत. विख्यात वैय्याकरणी पाणिनींच्या लेखनात भालाधारी संन्याशाचा उल्लेख असल्याचे अभ्यासक नमूद करतात. त्या नंतर, योगाचार्य पतंजली शस्त्रसज्ज साधूचा निर्देश करतात, असेही अभ्यासक मांडतात. सम्राट हर्षवर्धनाचे चरित्र लिहिणाऱ्या बाणभट्टांनी मात्र योध्याच्या परिवेषातील शैव संन्याशांचे अतिशय व्यवस्थित वर्णन केलेले दिसते. अशा सशस्त्र शैव संन्याशांच्या युद्धकौशल्याबाबतही हर्षवर्धनाच्या चरित्रात बाणभट्टांनी निरीक्षणे नोंदविल्याचे अभ्यासक नजरेस आणून देतात. परंतु, सशस्त्र साधूंचे संघटन त्या काळात पद्धतशीरपणे कसे, कधी व कोणत्या प्रक्रियेद्वारे सुरू झाले, यांबद्दल मात्र काही ठोस आडाखे बांधणे अथवा निष्कर्षास येणे अवघड शाबीत होते. शस्त्रसज्ज नागा साधूंचे संघटित रूप हे त्या मानाने खूपच अलीकडील वास्तव होय, यांबाबत देशी-विदेशी अभ्यासकांमध्ये बऱ्यापैकी मतैक्य दिसते.

साधारणपणे ११-१२व्या शतकानंतर सूफी साधूंचा प्रवेश हिंदुस्थानामध्ये वाढत्या प्रमाणावर होऊ लागल्यानंतर नाथपंथी योग्यांनी त्यांना पायबंद घालण्यात सक्रियता दाखवली, असे काही उल्लेख सापडतात. शैवपंथीयांपैकी कापालिकांनी शस्त्रधारणेत व शस्त्रास्त्रे चालविण्यासंदर्भातील निपुणतेमध्ये प्रथम लौकिक संपादन केला, असे मानले जाते. परंतु, सूफींच्या फैलावाला अटकाव करण्याचे ते प्रयत्न वैचारिक होते

की सशस्त्र होते, यांबाबतही नि:संदिग्ध पुरावे अथवा निर्देश उपलब्ध होत नाहीत. पारंपरिक मन आणि त्याने निर्माण केलेल्या कथागाथा मात्र नागा साधूंचे शस्त्रधारणत्व धर्मरक्षणाशी जोडतात. या भूमीतील सनातन धर्मावर होणारी परकीय तसेच परधर्मीय आक्रमणे थोपविण्यासाठीच नागा साधूंनी शस्त्रधारणेस सुरुवात केली, अशी लोकधारणा चांगल्यापैकी प्रस्थापित आहे. सगळेच साधू-बैरागी शास्त्रांच्या पठणात मग्न राहिले तर त्या शास्त्रांचे रक्षण कोणी करायचे, असा पूर्वपक्ष या संदर्भात मांडला जातो. यच्चयावत साधूसमाज भजनमार्गी बनला तर भागणार नाही, ही भावना या शस्त्रसज्जतेच्या मुळाशी दिसते. शाही मिरवणुकीसाठी शोभायात्रेने संगमाकडे प्रयाण करणाऱ्या नागा साधूंच्या हातात त्रिशूळ, भाले, तलवारी यांसारखी शस्त्रे दिसण्यामागील एक कारण हेच सांगण्यात येते. एकंदरीनेच, साधू - गोसाव्यांमध्ये शस्त्रनिपुणता आणि शास्त्रनिपुणता समांतर चालत आलेली दिसते. एका हातात जपमाला आणि दुसऱ्या हातात भाला, ही साधूविश्वाला प्रिय असणारी जीवनरीत दिसते. परंतु, या प्रक्रियेचा नेमका आरंभबिंदू मात्र अज्ञातच आहे.

अर्थात, यांबद्दलही निरपवाद असे काही म्हणता येत नाही. काही अभ्यासक या संदर्भात अन्य एक संभाव्यताही विदित करतात. साधूंच्या आखाड्यांदरम्यानच, प्रसंगोपात्त आणि कारणपरत्वे जे झगडे उभे राहत त्यांदरम्यान शस्त्रास्त्रांचा वापर होण्याचे प्रसंग उद्भवून त्या माध्यमातून संन्यासी शस्त्रधारी बनू लागले, असेही काही निर्देश सूचित करतात. मठांचे आणि आखाड्यांचे व्याप वाढू लागल्यानंतर देवदेवस्थाने, त्यांच्या जमिनी यांच्या अनुषंगाने उभ्या राहणाऱ्या विसंवादांचे रूपांतर, प्रसंगी, सशस्त्र संघर्षामध्ये घडून आल्याचे काही दाखले अभ्यासकांनी नोंदवून ठेवलेले आहेत. शैवपंथी साधूंचा निर्वाणी आखाडा आणि वैष्णवपंथीयांचा एक आखाडा या दोहोंदरम्यान १२५४ साली सशस्त्र संघर्ष खडा झाल्याचा एक दाखला या संदर्भात दिला जातो. केवळ इतकेच नाही तर, अकबराच्या राजवटीत, म्हणजे, १५६७ सालादरम्यान, थानेसरजवळ संन्याशांच्या दोन गटांत सशस्त्र संघर्ष झाल्याचेही दाखले दिले जातात. आखाड्यांच्या परस्परांतील मतभेदांद्वारे संन्याशांमध्ये शस्त्रसज्जतेचा प्रवेश एक वेळ झालाही असला तरी, प्रथम इस्लामी राज्यकर्त्यांच्या विरोधात आणि पुढे ब्रिटिशांच्या विरूद्ध नागा संन्यासी हातात शस्त्र घेऊन लढले, असे अनुमान जे काही उपलब्ध पुरावे गवसतात त्यांवरून बांधता येते. १३व्या शतकाच्या आगेमागे, तत्कालीन मारवाडातील एका मुख्य पुजाऱ्याने मंदिराच्या संरक्षणासाठी संन्याशांची एक मोठी तुकडी सज्ज ठेवल्याचे सांगितले जाते. साधारणपणे १७व्या शतकाच्या

मध्यास, मंदिरांसह व्यापारी मार्गांनाही शस्त्रसज्ज साधू सुरक्षाकवच पुरवत असल्याचे दाखले नमूद आहेत. अनेक धार्मिक स्थळांचे व तीर्थस्थानांचे रक्षण करण्यातही सशस्त्र संन्याशांची दले अग्रेसर असत, असेही निर्देश सापडतात. इ. स. १६६४–६५ दरम्यान काशीच्या विश्वेश्वराच्या मंदिरावर चालून आलेल्या औरंगजेबाच्या फौजेला शस्त्रधारी संन्याशांनी प्रखर प्रतिहल्ल्याच्या बळावर नामोहरम केल्याचे उदाहरणही या संदर्भात प्रकर्षाने दिले जाते.

उत्तर भारतातील एक संघटित प्रबळ शक्ती या स्वरूपात सशस्त्र नागा संन्याशांचा लढाऊ प्रभाव मध्ययुगात प्रस्थापित झालेला होता, असे अनुमान जदुनाथ सरकार यांच्यासारखे इतिहासतज्ज्ञदेखील काढतात. उत्तरेतील विविध राज्यसंस्थांमध्ये गोसाव्यांनी त्यांचा दबदबा त्या काळात प्रस्थापित केला. मुघल काळादरम्यान तत्कालीन राजपुताना, गुजरात या प्रांतांतील स्थानिक राजेरजवाड्यांच्या बाजूने सशस्त्र गोसाव्यांच्या तुकड्या लढल्याचे दाखलेही मिळतात. गोसावी तुकड्यांच्या अशा मदतीखातर संबंधित राजसंस्था त्यांना जमिनी तसेच अन्य इनामे बहाल करत असत. उदयपूर, जयपूर, जैसलमेर, जोधपूर, बीकानेर, बडोदा, भूज यांसारख्या संस्थानांच्या सेवेत सशस्त्र गोसाव्यांच्या तुकड्या रीतसर असल्याचे जदुनाथ सरकार नोंदवितात. काही ठिकाणी तर, नियमित पगारी लष्कर म्हणूनही गोसावी संस्थानिकांच्या व राजांच्या सेवेत राबत असल्याचे दाखले दिसतात. तत्कालीन सत्ताव्यवहारातील अशा वाढत्या प्रभावाद्वारे गोसावी नेतृत्त्वाच्या राजकीय महत्त्वाकांक्षाही क्रमाक्रमाने पल्लवीत होऊ लागल्याचे निरीक्षणही जदुनाथ सरकार यांनी नमूद करून ठेवले.

शस्त्रसज्ज नागा संन्याशांच्या संदर्भात असा हा पूर्वकालीन पुरावा आढळत असला तरी, या भूमीतील एक प्रबळ सशस्त्र व संघटित शक्ती म्हणून नागा संन्याशांचा उदय मुघल साम्राज्याच्या अस्तानंतर वेगाने घडून आला, असे दाखविणारे संदर्भ नोंदविलेले दिसतात. मुघल सत्ता दुर्बळ होत लयाला जाऊ लागल्यावर तिथवर मुघलांचे वर्चस्व सहन केलेले अनेक प्रांतिक राजेरजवाडे व सत्ताधीश बंड करण्यास प्रवृत्त झाले. मुघलांची सत्ता झुगारली गेल्यानंतर जी पोकळी मधल्या काळात निर्माण झाली तिथून सुरू झालेल्या राजकीय अस्थिरतेने जवळपास सगळे १८वे शतक व्यापून राहिले. सशस्त्र नागा संन्याशांच्या संघटित बळाचा उदय त्याच अस्थिरतेच्या पर्वादरम्यान घडून आला असावा, असा कयास अभ्यासक व्यक्त करतात. नागा संन्याशांची अवध संस्थानशी असलेली जवळीक हा त्या उदयामागील एक मुख्य

कारक घटक होता, असेही प्रतिपादन केले जाते. तशी जवळीक निर्माण होण्यामागील कार्यकारणभाव जाणून घेणे इथे उपकारक ठरेल.

गंगा आणि यमुना या नद्यांच्या दुआबातील अतिशय सुपीक प्रदेश म्हणून अवध संस्थान आणि त्याचा परिसर पूर्वापार विख्यात होता. त्यांमुळेच, 'मुघल सत्तेच्या राजमुकुटातील हिरा', असे अवध संस्थानचे वर्णन केले जात असे. अवध संस्थानची सामाजिक संरचना वैशिष्ट्यपूर्ण होती. संस्थानिक शिया होते तर नागरिकांमध्ये सुन्नीपंथी मोठ्या संख्येने होते. प्रजा बव्हंश हिंदू होती. त्यांमुळे, सर्व प्रकारचे सत्तासंतुलन शाबीत राखण्यासाठी अवधच्या नबाबांना पाठबळाची निकड भासत असे. आजुबाजूच्या सुन्नी सत्तांबरोबर नांदण्यासाठीदेखील अवध संस्थानला लष्करी ताकदीची गरज असे. त्यांतच, १८व्या शतकात जवळपास सगळ्या उत्तर हिंदुस्थानात सर्व प्रकारची अस्थिरता उद्भवल्यानंतर अवधचे तत्कालीन नबाब सफदरजंग यांनी सशस्त्र गोसावी दलांशी जवळीक प्रस्थापित करण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली. गोसाव्यांमधील तत्कालीन एक प्रतिष्ठित महन्त राजेन्द्रगिरी गोसावी यांच्याशी त्यांनी १७४० सालादरम्यान संधान बांधले.

याच राजेन्द्रगिरींचे दोन शिष्यवर होते. अनुपगिरी गोसावी आणि उमरावगिरी गोसावी अशी त्यांची नावे. मुळातच, गोसावी पंथामध्ये जातपात, वर्णाश्रम, कर्मकांडे यांचे स्तोम कधीच नसे. त्यांमुळे समाजाच्या विविध स्तरांतील माणसे गोसावी पंथात समाविष्ट असत. लढाईचे कौशल्य उत्तम पद्धतीने संपादन केलेले ते गोसावी निकराने लढत. सर्वसंगपरित्याग केलेला असल्याने गमावण्यासारखे त्यांच्यापाशी काही नसेच. शिवाय, देहावरही त्यांनी तुळशीपत्र ठेवलेले असल्याने मरणाची भीतीही त्यांना मागे खेचत नसे. त्यांमुळे, अतिशय लढाऊ, जिवावर उदार होऊन त्वेषाने झगडणारी सशस्त्र लष्करी ताकद म्हणून गोसाव्यांची दले १८व्या शतकाच्या मध्यापासून तत्कालीन राजकीय व्यवस्थेत तसेच आनुषंगिक लष्करी हालचालींमध्ये स्वत:चा दबदबा निर्माण करून प्रस्थापित बनली. जदुनाथ सरकार यांच्या दाखल्यानुसार, १७५१ ते १७५३ या कालावधीदरम्यान अवध संस्थानच्या लष्करी उलाढालींचा एक मुख्य सूत्रधार राजेन्द्रगिरीच असल्याचे समजते. इ. स. १७५३मध्ये राजेन्द्रगिरी यांचा मृत्यू झाल्यानंतर अनुपगिरी आणि उमरावगिरी हे दोन भाऊ त्यांचे उत्तराधिकारी म्हणून पुढे आले. सफदरजंग यांच्या पश्चात अवध संस्थानचा कारभार शुजा उद्दौला यांच्या हाती गेला. जदुनाथ सरकार यांच्या कथनानुसार, अनुपगिरी आणि उमरावगिरी यांची कारकीर्द ऐन भरात असताना त्यांच्यापाशी ४० हजार

शस्त्रसज्ज गोसाव्यांची फौज तैनात होती. पायदळ आणि घोडदळ अशा दोन्ही स्वरूपांत अतिशय वेगाने आणि भेदक मारा करणारी फौज असा तिचा लौकिक गाजत असे.

मराठी सत्तेचा विस्तार १८व्या शतकाच्या पूर्वार्धापासून उत्तरेकडे जोमाने होऊ लागल्यानंतर दिल्लीकर मुघल सत्तेच्या तत्कालीन वारसांनी आणि रोहिलखंडातील सत्ताधीशांनी अफगाण सत्ताधीश अहमदशहा अब्दालीकडे सहाय्य मागितले. १७६१ सालातील पानिपतचे तिसरे महायुद्ध त्यांतूनच उद्भवले. त्या युद्धात अवधचा संस्थानिक शुजा उद्दौला अब्दालीच्या बाजूने लढला. अनुपगिरी आणि उमरावगिरी यांच्या नेतृत्त्वाखाली सुमारे १० हजार गोसाव्यांची फौज पानिपतावर उभी ठाकली. नग्न साधूंच्या आपल्या लष्करी छावणीतील उपस्थितीने अब्दाली व त्याचे सरदार कमालीचे अस्वस्थ बनल्याच्या नोंदी सापडतात. त्यांतून अब्दालीचे सैनिक आणि गोसाव्यांमध्ये बखेडे माजण्याची चिन्हे दिसू लागल्यावर शुजा उद्दौलाने महत्प्रयासाने ती अशांतता थोपवल्याचे सांगितले जाते. पानिपतावर मराठी फौज परास्त झाल्यानंतर रणांगणावर वीरगतीस प्राप्त झालेल्या मराठी सैनिकांचे और्ध्वदेहिक करण्यात गोसाव्यांनी पुढाकार घेतला. त्याखातर शुजा उद्दौला यांनी अब्दालीला जबर खंडणी दिल्याचेही अभ्यासक नमूद करतात.

मराठी राजसत्तेच्या विरोधात अब्दालीच्या बाजूने पानिपतावर लढल्यानंतर गोसाव्यांनी अवध संस्थानच्या बाजूने ब्रिटिशांविरोधात बक्सरच्या लढाईत १७६४ साली शस्त्र उपसले. ती लढाई ब्रिटिशांनी निर्णायकरीत्या जिंकली आणि अवध संस्थानचा पाडाव झाल्याचे उमगून गोसाव्यांनी पुढील काळात निरनिराळ्या राजसत्तांशी हातमिळवणी केली. जदुनाथ सरकार यांच्या दाखल्यानुसार, १७६४-६५ सालादरम्यान अनुपगिरी आणि उमरावगिरी हे दोघे गोसाव्यांच्या फौजेसह जाट सत्ताधीश जवाहरसिंह यांच्याबरोबर राहिले. १७६७ सालादरम्यान ते मराठ्यांना मिळाले. मराठी सत्तेत पुढे सैरभैरपणा निर्माण झाल्यानंतर गोसाव्यांनी बुंदेलखंडावर मांड बसवली. १७६७ सालानंतर पुढील सात ते आठ वर्षे दोघेही गोसावीबंधू पुन्हा शुजा उद्दौला यांच्याबरोबर राहिले. 'हिंमतबहाद्दर' अशी पदवी बहाल करून शुजा उद्दौला यांनी अनुपगिरी गोसावी यांना गौरविले. १७७५ नंतरचे जवळपास दीड दशक गोसावी फौजा दिल्लीकर सत्ताधीशांबरोबर राहिल्या. पुढे, अनुपगिरी आणि उमरावगिरी यांनी मराठ्यांशी संधान बांधले. १७८९ सालाच्या आगेमागे मराठी राजसत्तेने गोसाव्यांच्या मदतीने बुंदेलखंड जिंकून घेतला. थोरले बाजीराव आणि मस्तानी यांचे नातू अलिबहादर

यांनी गोसावीबंधूंच्या साहाय्याने बांद्याचे संस्थान निर्माण केले. त्या दरम्यान बुंदेलखंडाचा जणू अनभिषिक्त सम्राट असाच अनुपगिरी यांचा दबदबा राहिला. मात्र, ब्रिटिशांविरोधातील मराठ्यांच्या दुसऱ्या युद्धादरम्यान मराठी फौजेला माघारी पत्करावी लागल्यानंतर अनुपगिरीने बुंदेलखंड ब्रिटिशांच्या स्वाधीन केला. १८०४ साली झालेल्या अनुपगिरी यांच्या मृत्यूनंतर गोसाव्यांच्या फौजेत फाटाफूट झाली. काही गोसावी पथके अन्य राजसत्तांच्या आश्रयाला गेली तर काही विलय पावली.

अनुपगिरी व उमरावगिरी यांच्या नेतृत्त्वाखालील गोसाव्यांच्या फौजांव्यतिरिक्त अन्यही काही गोसाव्यांच्या सशस्त्र तुकड्या होत्या. मराठी सत्तेला उतरणी लागून ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल प्रस्थापित होऊ लागल्यानंतर गोसाव्यांची सशस्त्र दले ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध सक्रिय बनली. शेतसारा जमा करण्याचे दिवाणी हक्क ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल प्रांतात १७६५ साली संपादन केल्यानंतर पीडित शेतकरीवर्गाच्या बाजूने गोसाव्यांच्या तुकड्यांनी आघाडी उघडत गनिमी काव्याचे डावपेच रचत चढाया जारी राखल्या. गोसाव्यांच्या त्या उठावाचा बंदोबस्त करण्यासाठी वॉरन हेस्टिंग्जने परिणामकारक पावले उचलण्यास सुरुवात केली. गोसावी-संन्याशांनी हत्यारे बाळगायची नाहीत, असा आदेश १७७३ साली जारी करण्यात आला. गोसाव्यांचा पुरता पाडाव होण्याचे पर्व १९व्या शतकाला सुरुवात होण्याच्या सुमारास चालू झाले. हिंदुस्थानच्या पूर्व, पश्चिम तसेच मध्य भागांत सक्रिय राहिलेल्या नागा संन्याशांच्या सशस्त्र तुकड्यांनी १८०९-१० सालाच्या सुमारास शस्त्रे खाली ठेवली. संस्थानिक तसेच प्रांतिक राजसत्तांच्या फौजा निस्तेज बनल्या. रोडावलेली आर्थिक परिस्थिती आणि ब्रिटिशांच्या तैनाती फौजा यांमुळेदेखील सशस्त्र संन्याशांच्या तुकड्यांची गरज स्थानिक सत्ताधीशांना भासेनाशी झाली.

ब्रिटिश राजसत्ता इथे चांगल्यापैकी प्रस्थापित झाल्यानंतर संन्याशांच्या आखाड्यांचेही माहात्म्य, यथावकाश, प्रतिकात्मक बनू लागले. नागा साधू-संन्याशांनीदेखील काळाची बदलती पावले अचूक हेरली. उत्तरेतील राजकारणाचा आणि अर्थकारणाचा पालटता रंग नेमकेपणाने पारखून, एकेकाळच्या लढाऊ सशस्त्र जीवनपद्धतीकडून साधूसमाजदेखील नागर जीवनव्यवहारामध्ये आपले बस्तान स्थिर करण्याकडे वळू लागला. आखाड्यांसाठी जमीनजुमले संपादन करून आर्थिक तसेच राजकीय सामर्थ्य वाढविण्याचे पर्व नागा संन्याशांच्या विश्वात क्रमाक्रमाने तेव्हापासून संचारत आलेले आहे. आजही, गुजरातमधील गिरनार पर्वतराजीपासून ते अयोध्या-हरिद्वारच्या परिसरात विविध ठिकाणी नागा साधूंच्या आखाड्यांचा

मठ–जमिनींवर विस्तृत अंमल नांदता आहे. वाढते आर्थिक सामर्थ्य आणि पूर्वापार लाभत आलेले धार्मिक वलय यांपायी राजकीय व्यवस्थेतही स्वत:ची मुद्रा स्थिर करण्याच्या प्रेरणा नागा साधूसंन्याशांमध्ये अंकुरल्याचे अनुभवास येते. सिंहस्थात तसेच कुंभमेळ्यांमध्ये मिरवणुकीने गाजावाजा करत शाही स्नानासाठी सज्ज झालेल्या नागा साधूंच्या मेळ्यांची पूर्वपीठिका ही अशी प्रदीर्घ आणि तितकीच अनेकविध उलाढालींनी रंगलेली आहे.

*(उर्वरित संदर्भ पृष्ठ १५ वरून)*

### 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांसाठीचे संदर्भ


१२. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड १, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, द्वितीय आवृत्ती १९८२, पृ. क्र. ३९१.

१३. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड २, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६४, पृ. क्र. ३६६–३६९.

१४. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड ३, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६५, पृ. क्र. १९२–१९६.

१५. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड ५, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६८, पृ. क्र. ४४६.

१६. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड ६, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७०, पृ. क्र. २३३.

१७. जोशी, महादेवशास्त्री (संपादक), होडारकर (सौ.) पद्मजा (सहसंपादक), भारतीय संस्कृतिकोश, खंड ९, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९६, पृ. क्र. ५११–५१२, ८३३–७३४.

१८. यशवंत रामकृष्ण दाते, चिंतामण गणेश कर्वे, आबा चांदोरकर, चिंतामण शंकर दातार (संपादक मंडळ, महाराष्ट्र शब्दकोश, विभाग पांचवा, महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणे, १९३६, पृ. क्र. १९५१.

- https://www.thelancet.com/journals/lanplh/article/PIIS2542-5196(25)00051-8/fulltext
- https://www.nytimes.com/2025/04/16/climate/climate-emergency-blood-supply.html
- https://www.usc.edu.au/about/unisc-news/news-archive/2025/april/blood-pressure-new-study-predicts-how-climate-change-will-jeopardise-blood-supply
- https://www.wevolver.com/article/cobot-vs-robot
- https://ifr.org/ifr-press-releases/news/how-robots-work-alongside-humans

# शिक्षण

## चिनी विद्यापीठांचे नवे आव्हान

एकमेव महासत्ता बनण्याची मनीषा बाळगणाऱ्या चीनने कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आणि जगभरातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी आता कंबर कसली आहे. जगभरातील चांगले विद्यार्थी, शास्त्रज्ञ आपल्याकडे यावेत आणि आपल्या विद्यापीठांत त्यांनी शिकून संशोधन करावे या अपेक्षेने आता चीनची पुढील पावले पडू लागलेली आहेत. उच्च तंत्रज्ञानातील स्वयंपूर्णतेच्या जोडीला चीनने आता शिक्षणावर विशेषत्वाने लक्ष केंद्रित केले आहे, ही निश्चितच लक्षात घेण्यासारखी बाब आहे. या संदर्भातील काही तपशील जाणून घेणे उद्बोधक ठरावे.

गेल्या दोन-तीन दशकांत चीनने नियोजनबद्ध रीतीने आणि अत्यंत वेगाने प्रगती केलेली आहे. जगातील मोठ्या आणि अत्याधुनिक शिक्षण देणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांचा विचार करायचा झाल्यास त्यात आता चीनचाही क्रमांक लागतो आहे. २१ व्या शतकाच्या प्रारंभापासून चीनने शिक्षणप्रणालीमध्ये सातत्याने विकासात्मक बदल कसे होतील याकडे खूप बारकाईने लक्ष दिलेले आहे. चीनमधील पूर्वीची शिक्षणव्यवस्था कठोर, अपरिवर्तनीय आणि चौकटीबद्ध होती. ठराविक गोष्टी, ठराविक विषय आणि गरजेपुरताच, चाळणी लावलेला इतिहास तिथे शिकवला जात होता. १९८० च्या दशकापासून चीनमधील शिक्षणपद्धतीत अनेक बदल होताना दिसू लागले. चीनमध्ये प्राथमिक शिक्षण सहा वर्षे दिले जाते. त्यामध्ये चिनी भाषेच्या जोडीला तांत्रिक विषय, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र हे विषय शिकवण्यावर भर दिला जाऊ लागला. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम व्हावा याकडे तेव्हापासून लक्ष दिले जाऊ लागले. विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक समज अधिक चांगली व्हावी म्हणून माध्यमिक शिक्षणामध्ये विशेषत्वाने प्रयत्न केले जातात.

त्यामुळे गणित, विज्ञान, साहित्य अशा विषयांच्या जोडीला विद्यार्थ्यांच्या संकल्पना विकसित करण्यावर आणि त्यांच्यात कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात येतो.

उच्च शिक्षणात आपल्या विद्यापीठांचा दर्जा जागतिक स्तरावर अग्रमानांकित कसा राहील याविषयी चीन आता आग्रही आहे. त्या दृष्टीने उत्तम पायाभूत सुविधा असणारी दर्जेदार विद्यापीठे उभी करण्यावर चीनने अलीकडील काळात कायमच भर ठेवला. त्यामुळे जागतिक क्रमवारीत ही विद्यापीठे आपले स्थान राखू लागली आहेत. QS World University Rankings 2024 नुसार, Tsinghua University हे विद्यापीठ जागतिक क्रमवारीत १७व्या तर Peking University १९ व्या स्थानावर आहे. या शिवाय, Fudan University, Shanghai Jiao Tong University, Zhejiang University ही सर्व विद्यापीठे जागतिक क्रमवारीत आपले चांगले स्थान राखून असून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ती ओळखली जातात. विज्ञान, गणित आणि तंत्रज्ञान या विषयांच्याबाबतीत चिनी विद्यापीठे आघाडीवर आहेत, असा चिनी शासनकर्त्यांचा दावा आहे. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन Programme for International Student Assessment (PISA) या प्रणालीद्वारे केले जाते.

चीनमध्ये उद्योजकांच्या सहकार्यानेही विद्यापीठे वाढू लागलेली आहेत. त्यामुळे, प्रचलित आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवे संशोधन करण्यावर त्या विद्यापीठांमध्ये भर दिला जातो आहे. उच्च तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात चीन स्वयंपूर्ण व्हावा आणि इतर देशांवरील त्यांचे अवलंबित्व सर्व स्तरांवर कमी व्हावे असा चिनी धोरणकर्त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठी चीनमधील विद्यापीठांमध्ये आता संशोधक व शास्त्रज्ञ यांना सर्व स्तरांवर प्रोत्साहन दिले जात आहे. जगभरातील चांगले संशोधक चिनी विद्यापीठांकडे आकर्षित व्हावेत आणि त्यांनी आपल्या देशात राहून संशोधनाला हातभार लावावा, अशी धोरणदृष्टी यामागे आहे. याचे अगदी ताजे आणि बोलके उदाहरण सांगायचे झाले तर, प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय नियतकालिक गणल्या जाणाऱ्या 'नेचर' या प्रकाशनाने जगातील सर्वोत्तम विद्यापीठांची यादी अलीकडेच जाहीर केलेली आहे. त्यानुसार, चीनमधील Chengdu या भागात असणाऱ्या Sichuan University या विद्यापीठाने शैक्षणिक गुणवत्तेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. Stanford University, Massachusetts Institute of Technology (MIT), Tokiwa University अशा जगभरातील नामांकित विद्यापीठांना मागे टाकीत Sichuan University या विद्यापीठाने वरचे स्थान मिळवले आहे. इतरही

चिनी विद्यापीठांचा दर्जा उंचावला असल्याचे या क्रमवारीतून दिसून येते. ‘नेचर’ने जाहीर केलेल्या यादीनुसार, Harvard University या विद्यापीठाने जागतिक क्रमवारीत आपला पहिला क्रमांक अबाधित राखला आहे. मात्र त्या नंतरच्या क्रमवारीत चिनी विद्यापीठांनी मुसंडी मारली असल्याचे दिसून येते. ‘जैविक विज्ञान’, ‘रसायनशास्त्र’, ‘भू-विज्ञान आणि पर्यावरणशास्त्र’, ‘आरोग्यशास्त्र आणि भौतिकशास्त्र’ या पाच क्षेत्रांत होणाऱ्या संशोधनांवर आधारित अभ्यासपूर्ण किती लेख आंतरराष्ट्रीय नितकालिकांमध्ये प्रसिद्ध होतात यानुसार ही क्रमवारी ठरवली जाते. विज्ञान व संशोधनाच्या बाबतीत Sichuan University हे जगातील ११ व्या क्रमांकाचे सर्वोत्तम विद्यापीठ ठरले आहे. अलीकडेच DeepSeek या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कंपनीने तंत्रज्ञानाची नुसती एक झलक दाखवताच अवघे जग हादरले आणि तो जागतिक बातमीचा विषय बनला, ही एकच बाब या संदर्भात अतिशय बोलकी आहे.

चिनी विद्यापीठांतून उत्तम दर्जाचे संशोधन व्हावे या दृष्टीने नियोजनबद्ध प्रयत्न केले जात आहेत. Sichuan University ने संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी गेल्या काही वर्षांत अतिशय नियोजनबद्ध रीतीने प्रयत्न केलेले दिसतात आणि चीन सरकारनेही विद्यापीठांना भक्कम पाठबळ पुरविले आहे. उच्च दर्जाच्या संशोधकांना काम करण्याबाबत आकर्षण वाटावे असे वातावरण निर्माण करणे, निधीच्या तरतुदीत वाढ घडवून आणणे, उद्योग आणि विद्यापीठांच्या भागीदारीला प्रोत्साहन देणे, अभ्यासक्रम व शिक्षणप्रणालींच्या आंतरराष्ट्रीय आदानप्रदानास चालना देणे अशांसारख्या प्रयत्नांचा त्यात समावेश राहिला. या विद्यापीठाने विविध देशांतील पाच हजार शास्त्रज्ञांना संशोधनासाठी निमंत्रित केले. सिंगापूर, जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, स्वित्झर्लंड, जपान, दक्षिण कोरिया या सारख्या देशांतील शास्त्रज्ञांना चीनने आवाहन केले. त्या दृष्टीने चीनने २००८ सालापासूनच Thousand Talents Plan या नावाचा उपक्रम हाती घेतलेला आहे. Overseas High-Level Talent Recruitment Program म्हणूनदेखील हा कार्यक्रम ओळखला जातो. परदेशात राहणाऱ्या चिनी नागरिकांच्या माध्यमातून त्या त्या देशांत वास्तव्यास असणाऱ्या संशोधक, शास्त्रज्ञ व तज्ज्ञांची भरती चिनी शिक्षणसंस्थांत केली जाते. चिनी विद्यापीठांमध्ये संशोधनासाठी त्यांना प्रोत्साहित केले जाते. आता हीच योजना Qiming या नावानेही ओळखली जाते. अर्थातच, जगातील अनेक देशांचा या योजनेला विरोध असून ही उघडपणाने इतर देशांच्या बौद्धिक संपदेची चोरी आहे;

त्यातून इतर देशांचे नुकसान होणार आहे ही भावना या विरोधाच्या मुळाशी आहे. त्यामुळे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा या देशांनी त्यास विरोध दर्शवलेला आहे.

मात्र चिनी विद्यापीठांनी जगभरातील चांगल्या गुणवान शास्त्रज्ञांना आकर्षित करण्यासाठी अगदी नियोजनबद्ध रीतीने पावले उचललेली आहेत. त्यासाठी अनेक योजनाही त्यांनी सादर केलेल्या आहेत. शिक्षणशुल्क, मासिक भत्ता, निवास आणि वैद्यकीय विमा अशा विविध स्वरूपांमध्ये संशोधन करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाते. विशेष म्हणजे चीनमधील २७३ हून अधिक विद्यापीठांमध्ये विविध पातळ्यांवर अशा अनेक योजना सुरू आहेत. नाविन्यपूर्ण संशोधन प्रस्ताव आणि अभ्यास प्रकल्प विद्यापीठांकडे दाखल झाल्यानंतर त्यांचा विचार होऊन योग्य त्या व्यक्तींची निवड करून त्यांना या संशोधन योजनांचा लाभ मिळवून दिला जातो.

चिनी सरकारच्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना संपूर्णपणे अनुदानित शिष्यवृत्ती देण्यात येते. Hunan Universityमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्क, मासिक भत्ता, निवास आणि वैद्यकीय विमा या सर्व गोष्टी उपलब्ध करून दिल्या जातात. या शिवाय, संशोधनासाठी अत्याधुनिक संशोधनसुविधा विनाशुल्क मिळतील यांचीही तरतूद करण्यात येते. सांस्कृतिक देवाणघेवाणीची संधीही त्यांना उपलब्ध करून दिली जाते. Shandong Universityच्या माध्यमातून संशोधक विद्यार्थ्यांना सर्व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांसह देशात सुरुवातीला दाखल होताना पहिल्यावेळी विमानभाडेसुद्धा दिले जाते. भूविज्ञान क्षेत्रात ज्या विद्यार्थ्यांना अथवा व्यक्तींना संशोधन करायचे आहे त्यांना सर्व सुविधांसह शिष्यवृत्ती देण्यासाठी वुहानमधील China University of Geosciences (Wuhan) या विद्यापीठाने विशेष पुढाकार घेतला आहे आणि गेल्या काही वर्षांत या विषयात संशोधन करण्यासाठी तिथे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओघही वाढला असल्याचे दिसून येते. 'विज्ञान', 'अभियांत्रिकी' व 'तंत्रज्ञान' या क्षेत्रात संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी व संशोधकांसाठी तर चिनी विद्यापीठांनी जणू पायघड्याच घातलेल्या आहेत. University of Science and Technology, Beijing (USTB) या विद्यापीठाने त्यासाठी सर्वतोपरी पुढाकार घेतलेला आहे. शिक्षणशुल्कात सवलत, उत्तम मासिक भत्ता, निवासाची चांगली सुविधा, वैद्यकीय विमा आणि जागतिक दर्जाच्या संशोधनसुविधा संशोधनासाठी उपलब्ध करून देणे अशी अभ्यासकांची सर्वंकष खातीरदारी तिथे केली जाते.

विविध क्षेत्रांत अधिकाधिक संशोधन व्हावे आणि चांगल्या संशोधनासाठी प्रेरक

वातावरण निर्माण व्हावे यासाठीदेखील चीनमध्ये विविध योजना राबविल्या जातात. उद्योग-व्यवसायांच्या जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये आज आणि यापुढे अद्ययावत तंत्रशास्त्राचा वापर अधिकाधिक वाढत्या प्रमाणावर होत राहणार आहे. असे प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करून ते सक्षमपणे हाताळण्यासाठी कर्मचारीदेखील अत्याधुनिक तंत्रज्ञानात प्रवीण असणे अनिवार्य ठरते. त्यांमुळे, एकीकडे उच्च शिक्षण गुणवत्तापूर्ण असावे यासाठी प्रयत्न करत असतानाच दुसरीकडे शिक्षणसंस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्या दरम्यान घट्ट साहचर्य नांदणे अत्यावश्यक ठरते. ठिकठिकाणच्या विख्यात संशोधकांना आकर्षित करणे, संशोधनासाठी निधी वाढवणे, उद्योग आणि विद्यापीठांच्या भागीदारीला आणि परस्परसहकार्याला प्रोत्साहन देणे, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक आदानप्रदान आणि सहकार्याला अधिकाधिक चालना देणे यावर त्या दृष्टीनेच चीनमध्ये लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे.

या आणि अशा पद्धतीच्या अनेकानेक योजनांद्वारे चिनी विद्यापीठे जगभरातील चांगल्या विद्यार्थ्यांना आणि शास्त्रज्ञांना त्यांच्याकडे आकर्षित करीत आहेत. अशा संशोधकांची बडदास्त ठेवून त्यांना संशोधनपूरक वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या ज्ञानाचा व संशोधनकौशल्याचा पुरेपूर वापर करून घेऊन त्याचे आनुषंगिक लाभ आपल्या देशाला मिळवून देणे, ही दृष्टी या प्रयत्नांमागे आहे. त्यासाठी विद्यापीठांना आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी चीन सरकारही तत्पर आहे. त्यामुळेच आता चिनी विद्यापीठांकडे वैश्विक स्तरावरील नामवंत संशोधकांचा ओघ हळूहळू वाढू लागला असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. संशोधन - तंत्रविकास - शिक्षण - प्रशिक्षण या चार घटकांचा आंतरसंबंध टिकवून धरण्यावरच येत्या काळातील विकास अवलंबून असेल, हे सूत्र चीनने अचूक हेरल्याचे हे द्योतक होय.

चीनच्या या संशोधनसंलग्न विकासाच्या प्रयत्नांमागील स्वार्थपोषक धोरणे लपून राहिलेली नसल्याने जागतिक पातळीवरून या आक्रमकतेला विरोध होत असला तरी चीनने त्यांच्या विद्यापीठांमध्ये जे संशोधनपूरक वातावरण निर्माण केलेले आहे त्यामुळे नकळतपणे जागतिक पातळीवर संशोधनाच्या क्षेत्रात एकंदरीनेच स्पर्धात्मकता वाढू लागली असल्याचे जाणकारांचे मत आहे. संशोधनाचे बेट बनू पाहत असलेल्या चीनचा हा वारू रोखणे आजच्या घडीला जगातील अन्य देशांना शक्य नसले तरी, आपल्या देशांतील बुद्धिमत्ता चीनकडे जाऊ न देता ती आपल्याच देशात राहून तिचे मौलिक योगदान स्वदेशाला लाभावे यासाठी इतर देशांना कंबर कसण्यावाचून आता पर्याय उरलेला नाही हे मात्र नक्की!

## सामाजिक

# कष्टकरी वृद्धांचा वाढता टक्का...

वाढत्या सजगतेपायी एकीकडे जन्मदर कमी होणे आणि वैद्यकशास्त्रातील अप्रतहित प्रगतीपायी सरासरी आयुर्मान वाढून दुसरीकडे वृद्धांची संख्या वाढणे हे वास्तव आजच्या घडीला अनेक देशांच्या पुढ्यात उभे ठाकलेले आहे. या समस्येला आता अमेरिकाही अपवाद राहिलेली नसून तिथेही ही वस्तुस्थिती वेगाने वाढत असल्याचे चित्र दिसते आहे. चीन, जपान या देशांमध्ये वृद्धांच्या वाढत्या संख्येने अनेक प्रश्न निर्माण केलेले असताना अलीकडच्या काळात अमेरिकेतसुद्धा तशाच प्रकारची समस्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागल्याचे अलीकडील काही अभ्यासातून स्पष्ट होते आहे. या समस्येचे विविध कंगोरे जाणून घेणे रोचक ठरते.

अमेरिकेत आजघडीला काम करीत असलेल्या लोकांपैकी जवळपास १९ टक्क्यांहून अधिक लोक हे ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे आहेत. दशकभरापूर्वी हेच प्रमाण केवळ १० टक्के इतके होते. म्हणजे गेल्या दहा वर्षांत हे प्रमाण जवळपास दुप्पट झालेले आहे. अमेरिकेतील Employee Benefit Research Instituteने केलेल्या अभ्यासानुसार, ६५ वर्षे वयापेक्षा अधिक असणाऱ्या या वृद्धांना चरितार्थासाठी काम करण्याशिवाय पर्याय नाही. निवृत्तीवेतन मिळण्याची हमी नसताना किंवा बचतीच्या पर्यायांचा विचार न करता नोकरी करीत राहिल्याने अशा असंख्य वृद्धांसमोर, या पुढे जगायचे कसे, हा प्रश्न आहे. त्यामुळेच मिळेल ती नोकरी पत्करून त्यांना गुजराण करावी लागते. आजारपणासाठीच्या खर्चाची तरतूद, आर्थिक फसवणुकीमुळे निर्माण झालेली परिस्थिती अशांसारख्या कारणांपायी, वृद्धत्व आले तरी त्यांना अर्थार्जन करणे भाग पडते आहे. एकूणातील निम्म्याहून अधिक वृद्ध अशाच परिस्थितीतून जात असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे.

'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या अंदाजानुसार, आगामी काळामध्ये अमेरिकेमध्ये अशा वृद्धांचा टक्का वाढत जाणार आहे आणि वयाच्या ५५-६० वर्षानंतरसुद्धा

सातत्याने काम करीत राहणाऱ्या लोकांची संख्या वाढणार आहे. सरासरी आयुर्मान वाढतच जाणार आहे. कमी-जास्त होत राहिला तरी महागाईचा काचही संपणारा नाही. अशा परिस्थितीमध्ये किमान गुजराण होत राहावी यासाठी काम करण्याखेरीज दुसरा कुठलाही पर्याय नसलेला एक मोठा वर्ग आज अमेरिकेत आहे. त्या वर्गाच्या समस्या येणाऱ्या काळात अधिकच वाढत जातील, असे हा अभ्यास सूचित करतो. या लोकांना वयोमानपरत्वे काम थांबवण्याची इच्छा आहे, परंतु काम थांबवता येत नाही, अशा विचित्र कात्रीमध्ये हे लोक सापडलेले आहेत.

विकसित देशांमध्ये सामाजिक सुरक्षा प्रणालीचे संरक्षक कवच लाभल्याने तिथे ही समस्या अभावानेच दिसून येते. तसेच निवृत्तीवेतन योजनांचा आधार दिलेला असल्याने एका विशिष्ट वयानंतर वृद्धांमध्ये रोजगाराचे प्रमाणही कमी दिसून येते. Organisation for Economic Co-operation and Development (OECD) या व्यासपीठाचे सदस्य असलेल्या देशांचा आढावा घेतला असता त्यामध्ये ६५ वर्षांवरील व्यक्तींचे रोजगारातील प्रमाण एकूणांत १५ टक्के इतके आहे. विकसनशील देशांमध्ये मात्र परिस्थिती या पेक्षा वेगळी आहे. सामाजिक सुरक्षाप्रणालींचा फारसा न झालेला विस्तार आणि निवृत्तीवेतन योजनांचे अभावानेच असणारे कवच यामुळे वृद्ध व्यक्तींना आर्थिक गरजा भागवण्यासाठी काम करीत राहावे लागते. भारतामध्ये ६० वर्षांवरील व्यक्तींचे रोजगारातील प्रमाण ६० टक्के इतके आहे. ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण त्याहूनही अधिक असू शकेल असा अंदाज आहे. भारताप्रमाणेच जगभरातील अनेक देशांमधील ६० वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या व्यक्तींना उपजीविकेसाठी काम करीत राहावे लागते. सामाजिक सुरक्षाप्रणालींचे बळकटीकरण हा या संदर्भातील कळीचा मुद्दा आहे. त्यावर अधिक काम होणे गरजेचे आहे. या शिवाय, निवृत्तीवेतन योजनांची हमी प्रदान करून अशा वृद्धांना आर्थिक सुरक्षा पुरविणे, त्यांना आरोग्य आणि सामाजिक सेवा चांगल्या रीतीने उपलब्ध करून घेण्यासाठी पुढाकार घेतला जाणे आवश्यक आहे, अशी भावना या क्षेत्रातील अभ्यासक तसेच सेवाभावी संस्था व्यक्त करतात.

विविध देशांमध्ये तेथील ६० वर्षे वयाच्या व्यक्तींचे रोजगारातील प्रमाण हे तेथील परिस्थितीनुसार भिन्न असते. चीनमधील ६० वर्षे वयाच्या पुढच्या लोकांचे रोजगारामधील प्रमाण अलीकडच्या काळात वाढताना दिसते आहे. १९६० साली चीनमधील सरासरी आयुर्मान ४४ वर्षे इतके होते. २०२३ साली ते वाढून ७८ वर्षांपर्यंत गेले आहे. त्यामुळे चीनमध्ये ६० वर्षांहून अधिक वर्षे असणाऱ्या वृद्धांची

संख्या २८ कोटींहून अधिक आहे. ही संख्या वाढत जाऊन पुढील दशकभरात ती ४० कोटींवर जाईल, असा अंदाज अभ्यासक वर्तवत आहेत. निवृत्तीनंतरही सक्रिय राहून काम करीत राहणाऱ्या वृद्धांची संख्या त्यामुळे चीनमध्ये वाढत चालली आहे. चीनमध्ये निवृत्तीवेतन दिले जाते. परंतु वृद्धांची संख्या वाढत असल्याने त्या सुविधेवरही ताण येऊ लागला आहे. त्यामुळे रोजगारक्षम असलेल्या वृद्धांच्या निवृत्तीचे वय वाढवण्याच्या दृष्टीने चीनमध्ये गांभीर्याने विचार सुरू झालेला आहे. त्यातून अधिकाधिक वृद्धांना अधिक काही काळ काम करण्याची संधी मिळेल आणि त्याच्या जोडीला निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी तरतूद केलेल्या निधीवरील ताण कमी होईल असा विचार चीनमध्ये जोर धरतो आहे.

जपान हा जगातील सर्वाधिक वृद्ध लोकसंख्येचा देश आहे. या देशातील वृद्धांचे सरासरी आयुर्मान हे ८५ वर्षे इतके आहे. त्यामुळेच जपानमधील वृद्धांचे वास्तव आणि त्यांच्या जीवनमानाच्या वाढत्या व बदलत्या गरजा लक्षात घेता त्यांना सांभाळणे हे जपानपुढील एक मोठे आव्हान ठरते आहे. जपानमध्ये ६५ वर्षे वयाच्या पुढील व्यक्ती रोजगारात असण्याचे प्रमाण विकसित देशांच्या गटात सर्वाधिक म्हणजे २५ ते ३० टक्के इतके आहे. हे प्रमाण अन्य विकसनशील देशांच्या तुलनेतही अधिक आहे. विकसित देशांच्या तुलनेत हे प्रमाण खूप जास्त आहे.


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

जपानमधील वृद्धांची संख्या अधिक आहे आणि जन्मदर कमी आहे हे लक्षात घेऊन जपान सरकारने ७० वर्षापर्यंतच्या वृद्धांना नोकरीसाठी प्रोत्साहन व अनुमती दिली आहे. विविध योजना उपलब्ध करून देऊन आणि त्यांच्या योग्यतेचे काम देऊन ज्येष्ठांना गुंतवून ठेवले जाते. त्यांच्या अनुभवकौशल्याचा अधिकाधिक फायदा कसा करून घेता येऊ शकेल हेदेखील आवर्जून पाहिले जाते.

सरकारने कंपन्यांनाही त्या पद्धतीचे आदेश दिलेले असून वयाची साठी पार केलेल्या वृद्धांचाही नोकरीमध्ये आवर्जून विचार केला जातो आणि त्यांना संधी दिली जाते. किराणा दुकाने, हॉटेल, रेस्टॉरंट अशा विविध प्रकारच्या सेवा क्षेत्रांत, टॅक्सीचालक, वाहतूक नियंत्रक कर्मचारी म्हणून, कृषी क्षेत्र आणि लहान-मध्यम स्वरूपाच्या उद्योगांमध्ये, कर्मचाऱ्यांचे अनुभवी सल्लागार म्हणून किंवा प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळते. दीर्घायुष्यासोबत वाढती आर्थिक गरज हे त्यांच्या काम करीत राहण्यामागचे प्रमुख कारण असते. आपण जितके सक्रिय राहू तितके आपले आरोग्य सुदृढ राहील आणि जीवनमान चांगले राहील अशी धारणा असल्याने जपानी माणसे स्वत:ला कायम कार्यमग्न ठेवण्याचा प्रयत्न करतात. आपण काम करणे थांबवले आणि घरी रिकामे बसून राहिलो तर आपला सामााजिक संपर्क कमी होईल आणि त्यातून मग लोक आपल्याशी बोलेनासे होतील या भीतीमुळे लोक रोजगाराच्या निमित्ताने का होईना लोकांमध्ये राहण्याचा प्रयत्न करतात. आगामी काळात तंत्रज्ञान आणि उत्पादन पद्धतीचे स्वयंचलन यांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक वृद्धांना विविध कामांमध्ये कसे गुंतवता येईल या दृष्टीने जपानमध्ये गांभीर्याने विचार सुरू आहे.

युरोपमध्ये मात्र या पेक्षा वेगळी परिस्थिती दिसून येते. वयाची साठी पार केलेल्या लोकांच्या रोजगारामधील सहभागासंदर्भात अचूक माहिती उपलब्ध नाही. ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या नॉर्वेमधील सगळ्या नागरिकांना निवृत्ती वेतन लागू केले जाते. युरोपातील अनेक देशांमध्ये शिक्षणाचेही प्रमाण चांगले असल्याने आणि नागरिकांच्या भविष्यातील निर्वाहाची चांगली व्यवस्था विविध देशांनी केलेली असल्याने वयाचा विशिष्ट टप्पा पार केल्यानंतर नोकरी किंवा व्यवसायातून बाहेर पडून जीवनाचा आनंद घेण्याकडे युरोपातील लोकांचा कल आहे. स्वीडनमध्येदेखील शिक्षण आणि रोजगाराचे प्रमाण चांगले असल्याने ६०-६५ वर्षे वयाच्या वृद्धांमध्ये सुरक्षितता, नागरी स्वातंत्र्य आणि सार्वजनिक वाहतूक या सर्वच बाबतींत समाधानी वृत्ती आहे.

फ्रान्समध्ये व्यक्तींच्या रोजगारासंदर्भात उपलब्ध असलेल्या अधिकृत आणि अचूक आकडेवारीनुसार तिथे निवृत्तीचे वय पूर्वी ६२ वर्षे असे होते. ते आता, जागतिक पातळीवरचे बदल लक्षात घेऊन, ६४ वर्षे असे करण्यात आले आहे. परंतु त्याला फ्रान्समधील नागरिकांचा खूप विरोध आहे. त्यामुळे फ्रान्समध्ये आंदोलने सुरू आहेत. निवृत्तीचे वय वाढवल्याने रोजगारक्षम लोकांवर अन्याय होतो आणि त्यांना नोकरीसाठी प्रतिक्षा करावी लागते त्यामुळे, सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून निवृत्तीचे वय वाढवू नये, अशी भूमिका फ्रान्समध्ये जोर धरते आहे.

अलीकडच्या काळामध्ये रशियामध्ये ६० वर्षांवरील वृद्धांच्या रोजगारातील प्रमाणात वाढ होते आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे रशियामध्ये निवृत्तीचे वय वाढवण्यात आले आहे. २०१९ सालापासून पुरुषांचे निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे आणि महिलांचे वय ५५ वरून ६० वर्षे असे करण्यात आलेले आहे. २०२४ साली ६५ वर्षे वयोगटातील एकूण लोकसंख्येपैकी ४२ टक्के लोक नोकरीत कार्यरत होते. वाढत्या महागाईमुळे अनेक वृद्धांना नोकरी करीत राहावी लागते, असे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदवलेले आहे.

जगभरातील स्थितीवर नजर टाकली असता विविध देशांमध्ये वृद्धांचे रोजगारातील प्रमाण विविध कारणांनी वाढते आहे. असे ध्यानात येते. सरासरीने वाढते आयुर्मान, कमी होत असलेला जन्मदर, वाढती महागाई, निवृत्ती वेतन योजनांचा कमी आधार, आर्थिक अपरिहार्यता अशा विविध कारणांमुळे वय उलटल्यानंतरदेखील वृद्ध लोक स्वत:ला विविध कामांमध्ये गुंतवत आहेत. असे चित्र सरासरीने आजमितीस सर्वत्र दिसते. अशा ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सुरक्षेचे काही किमान कवच पुरविणे हे शासनसंस्थांना उत्तरोत्तर दुरापास्त ठरते आहे. लोकसंख्येतील आणि पर्यायाने श्रमदलातील तरुणांचे प्रमाण घटत राहण्याने करसंकलनाद्वारे शासकीय तिजोरीत जमा होणाऱ्या महसुलाच्या स्त्रोताला कसर लागण्यास प्रारंभ होतो. दुसरीकडे, श्रमदलामधील तरुणांचे प्रमाण घटू लागले की पर्यायाने अर्थव्यवस्थेतील एकंदर मागणी, बचत घटू लागते. तिसरीकडे ज्येष्ठांच्या कल्याणासाठी आखावयाच्या योजनांवरील खर्चाचा भार वाढता राहतो. या कैचीत जगातील अनेक देश आज सापडलेले आहेत. या सगळ्यापायी शासनसंस्थेच्या तिजोरीतील तुटीचे भगदाड वाढू लागते. तूट भरून काढण्यासाठी कर्जउभारणी करणे मग अपरिहार्य ठरते. हे सगळे अतिशय दुष्कर असे दुष्टचक्र आहे.

# आरोग्य

## रक्तपुरवठा साखळीला हवामानबदलाचा फटका

हवामानबदलाचे जागतिक परिणाम दिवसेंदिवस स्पष्ट होत असताना आता एक नवा आणि अनपेक्षित असा धोका आरोग्याच्या जागतिक क्षेत्राला भेडसावण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. तो धोका आहे... रक्तसंचयन, रक्तसंकलन आणि वितरणासाठी आवश्यक असलेल्या रक्ताच्या सुरक्षिततेचा आणि उपलब्धतेचा. The Lancet Planetary Health या विख्यात नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका महत्त्वाच्या संशोधनात ही बाब आग्रहाने मांडलेली आहे आणि भविष्यातील धोक्यांचे सूचन त्याद्वारे केलेले आहे. जागतिक स्तरावर या स्वरूपाचा हा पहिलाच अभ्यास आहे. हवामानबदलामुळे रक्तपुरवठा साखळीतील प्रत्येक टप्प्यावर गंभीर परिणाम होणार असल्याचे या संशोधनात म्हटले आहे. रक्तदात्यांची निवड करण्यापासून ते रक्ताची साठवण आणि वितरण करेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आगामी काळात हवामान बदलामुळे अनेक अडथळे येणार आहेत. या संभाव्य धोक्यांमुळे संपूर्ण जगभरातील रक्तसाठ्यांच्या स्थैर्याला धक्का बसू शकतो, अशी शक्यता जाणकारांकडून वर्तवली जाते आहे.

आपत्कालीन उपचार, दीर्घकालीन आजारांचे व्यवस्थापन आणि शस्त्रक्रिया यामध्ये रक्तपुरठा साखळी महत्त्वाचे काम करीत असते. मात्र, हवामानबदलाचा फटका बसल्याने भविष्यात अनेक आव्हाने निर्माण होणार आहेत. रक्तदात्यांची उपलब्धता आणि रक्त संकलनाच्या व्यवस्थापनावर होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी या संशोधनात प्रामुख्याने चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. वाढते तापमान, पूर, चक्रीवादळे, जंगलातील वणवे अशा आपत्तींचे प्रमाण हवामानबदलामुळे वाढत चालले असल्याने रक्तदाते व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर त्यामुळे मर्यादा येते. या अडथळ्यांमुळे नव्या रक्तदात्यांकडून मिळणाऱ्या रक्ताच्या प्रमाणातही घट होते आहे. संकलित रक्ताचे आयुष्य मर्यादित असते. संकलित रक्त योग्य तापमानात

टिकवून ठेवणे आणि त्या रक्ताची आवश्यक त्या ठिकाणी समयबद्ध वाहतूक करणे यात हवामानबदलापायी अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. रक्तघटकांचा साठवण कालावधी (शेल्फ लाइफ) कमी असल्याने या संकटाचे स्वरूप अधिकच गडद झाले आहे. हवामानबदलामुळे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांपायी वैद्यकीय केंद्रांमध्ये रक्ताच्या टंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

**रक्तदान प्रक्रियेवर परिणाम**

उष्णतेची लाट, पूर, चक्रीवादळे यासारख्या आपत्तींमुळे रक्तदान प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होतो ही बाब नव्या संशोधनातून समोर आली आहे. अलीकडेच ऑस्ट्रेलियातील 'क्विन्स लँड' आणि 'न्यू साऊथ वेल्स' या राज्यांमध्ये उष्णकटिबंधीय चक्रीवादळ आले होते. त्यामुळे खूप मोठे नुकसान झाले आणि पूर परिस्थितीही निर्माण झाली होती. रक्तदानासाठी ३५०० लोकांनी पूर्वनोंदणी केलेली असताना प्रतिकूल हवामानापायी ती मोहिम रद्द करावी लागली. ही परिस्थिती नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेली होती. याचा मोठा परिणाम एकूण रक्तसाठ्यावर घडून आला. यापूर्वी कधीही दिसून न आलेला आणि भयावह असा परिणाम पहिल्यांदा दिसून आल्याचे जाणकारांचे मत आहे. हवामानबदलामुळे जे संकट आलेले आहे त्याचा अभ्यास Australian Red Cross Lifeblood आणि University of Sunshine Coast यांच्याशी संलग्न संशोधकांनी केलेली आहे. रक्तपुरवठ्याच्या साखळीवर हवामान-बदलांचा कसा प्रतिकूल परिणाम होतो हे यातून अधोरेखित झाले आहे.

**रक्ताची साठवण आणि वाहतूक विस्कळीत**

रक्त आणि त्याचे घटक विशिष्ट तापमानालाच साठवावे लागतात. हवामानातील बदलांमुळे साठवणुकीच्या सुविधा आणि वाहतुकीवरही प्रतिकूल परिणाम होतो असे दिसून आले आहे. रक्ताच्या गुणवत्तेवर परिणाम न होऊ देता ते योग्य रीतीने साठवणे आणि गरजूंना योग्य वेळेत ते पाठवणे या दोन्ही गोष्टींवर हवामानबदलांचे प्रतिकूल परिणाम होऊ शकतात असे लक्षात आले आहे.

**आरोग्यसमस्यांमध्ये वाढ**

हवामानबदलामुळे रक्ताद्वारे पसरणारे आजारही वाढण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. 'डेंग्यू', 'वेस्ट नाइल' आणि 'मलेरिया' यांचे विषाणू हवामानबदलामुळे आता जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये स्थलांतरित होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. हवामानबदलामुळे असे विषाणू नव्या चांगल्या जागांचा शोध घेऊ शकतात. त्यामुळे रक्ताद्वारे पसरणारे आजार अशा नव्या भागांमध्येही प्रसारित होण्याची शक्यता आहे,

असे जाणकारांचे मत आहे. बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीमुळे संभाव्य रक्तदात्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. वाढते तापमान आणि उष्णतेच्या लाटांमुळे उच्च रक्तदाब, निर्जलीकरण अशा आरोग्यसमस्यांमध्ये वाढ होऊ लागलेली आहे. त्यामुळे घ्याव्या लागणाऱ्या औषधांपायी अनेक व्यक्ती रक्तदानासाठी अपात्र ठरतात. अलीकडच्या काळात अशा लोकांची संख्या वाढत असल्याचे अभ्यासकांच्या निरीक्षणावरून लक्षात येते. सातत्याने अस्थिर होणाऱ्या हवामानबदलांचे गंभीर असे मानसिक परिणामही होत असल्याचे समोर आले आहे. रक्तदात्यांची पात्रता कमी होणे आणि त्यांची संख्या घटणे हेसुद्धा एक मोठे आव्हान असल्याचे मानले जाते आहे. हवामानबदलाचे गंभीर परिणाम होऊन हृदयरोग, मूत्रपिंडाचे विकार, श्वसनाच्या समस्या, प्रसूती संबंधातील आजार अशा रोगांचे प्रमाण वाढू लागले आहे.

**अस्थिर हवामानाचा फटका**

हवामानबदलामुळे ऋतुचक्रामध्ये तर बदल होतोच पण त्याचबरोबर हवामानातील अस्थिरताही वाढते. कडाक्याचा उन्हाळा किंवा सातत्याने होणाऱ्या पावसामुळे निर्माण होणारी परिस्थिती यांचा फटका रक्तपुरवठ्याला बसतो. Harvard School of Public Health मधील संशोधक जेम्स स्मिथ यांच्या मते, रक्तपुरवठा साखळ्यांवर हवामानबदलांचा आणि पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान वाढण्याचा खूप मोठा परिणाम होऊ लागल्याचे दिसून येत आहे. वाढत्या उष्णतेमुळे रक्तसंकलन आणि संकलीत केलेले रक्त जतन करणे ही एक वेगळीच मोठी समस्या आगामी काळामध्ये निर्माण होणार आहे.

International Federation of Red Cross and Red Crescent (IFRC) मधील ज्येष्ठ संशोधक Dr. Thomas Rid यांच्या मते, हवामानबदलाचे परिणाम आपण आता अनुभवू लागलो आहोत. आगामी काळात परिस्थिती आणखीनच गंभीर होत जाणार आहे. अशा परिस्थितीत पूर, वादळे, भूकंप, उन्हाच्या वाढत्या झळा यासारख्या समस्यांमुळे रक्तदान मोहिमांचे प्रमाण कमी होऊ शकते तसेच वाहतुकीची साखळीही भंग पावू शकते. त्यामुळेच या संदर्भात आवश्यक विचारमंथन आता जागतिक पटलावर होणे गरजेचे आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर हे लक्षात येते की जागतिक हवामानबदलाचे फटके जसे आपल्या दैनंदिन जीवनव्यवहारात बसणार आहेत त्याचप्रमाणे त्याचे काही अकल्पित दूरगामी परिणाम संभवतात. रक्तपुरवठा साखळीवर होणारा परिणाम हा त्यापैकीच एक आहे.

# 'रोबॉट'बरोबर आता 'कोबॉट'ही!

आधुनिक तंत्रज्ञानामध्ये सातत्याने होणारी प्रगती स्तिमित करणारी अशीच आहे. येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), त्यावर आधारित तंत्रज्ञान आणि 'रोबॉटिक्स तंत्रज्ञान' यांनीच भारलेला असणार आहे. त्या दृष्टीने जगभरामध्ये 'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'संदर्भात सातत्याने नवनवीन संशोधन होते आहे आणि नव्या संशोधनाच्या माध्यमातून 'रोबॉट'मध्ये नवनवे बदल घडवून ते अधिकाधिक अत्याधुनिक आणि माणसांची कामे वेगाने हातावेगळे करणारे बनावेत असा संशोधकांचा प्रयत्न आहे. त्याच पार्श्वभूमीवर, 'रोबॉट'ची जागा त्याची पुढची आवृत्ती असणारे 'कोबॉट' घेऊ लागले असल्याचे वास्तव आता समोर आले आहे.

औद्योगिक आस्थापनांमध्ये अनेक कामे मानवी श्रमांचा वापर करून केली जातात. परंतु बरेचदा ही कामे एकसुरी, कंटाळवाणी आणि वेळखाऊ असतात. त्याच त्याच स्वरूपाचे काम माणसांना करायला दिले तर ती कंटाळून जातात, आळस करतात, ती कामे अपेक्षित गुणवत्तेने होत नाहीत, कामात टाळाटाळ केली जाते. त्यामुळे नियोजित कालमर्यादेत ती कामे पूर्ण होत नाहीत. म्हणूनच औद्योगिक आस्थापनांमधील वेळेचा असा अपव्यय टाळण्यासाठी अशा स्वरूपाची कामे यंत्रमानवांच्या मदतीने केली जावी आणि त्यातून अनेक गोष्टी साध्य कराव्यात याकडे औद्योगिक आस्थापनांचादेखील कल दिसून येतो.

औद्योगिक क्षेत्रामध्ये यंत्रमानवांचा वापर १९८०च्या दशकापासून सुरू झाला. सुरुवातीच्या काळात, वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे या स्वरूपाच्या कामापुरता हा वापर मर्यादित होता. परंतु, हे तंत्रज्ञान औद्योगिक विश्वात उपयोगी ठरू शकते असे लक्षात आल्याने यंत्रमानवाच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला जाऊ लागला आणि त्याची उपयुक्तता अधिकाधिक कशी वाढेल असा प्रयत्न केला जाऊ लागला. त्यामुळे 'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'चा जगभरात वेगाने विकास झाला. त्या

संदर्भात नवनवे संशोधन होऊ लागले. विशेषत: औद्योगिक क्षेत्रात उपयोगी ठरतील असे यंत्रमानव साकारण्यावर विशेषत्वाने भर दिला जाऊ लागला. 'रोबॉटिक्स तंत्रज्ञान' औद्योगिक आस्थापनांच्याही पथ्यावर पडले. उद्योगांचा सर्वांत मोठा लाभ झाला तो म्हणजे कमीत कमी मनुष्यबळात खूप चांगली कामे होऊ लागली. कामे पूर्ण होण्याचा वेग वाढला. मनुष्यबळावर होणारा इतर खर्च कमी झाला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे उत्पादन खर्चातही बचत होऊ लागला आणि त्यामुळे यंत्रमानवांकडून केल्या जाणाऱ्या कामांना प्राधान्य दिले जाऊ लागले आणि त्यामुळे औद्योगिक प्रसार व 'रोबॉटिक्स तंत्रज्ञान' हे जणू समीकरणच बनत गेले. कामाची गुणवत्ताही उंचावली. माणसांकडून जी कामे करवून घेतली जात असत त्या तुलनेत यंत्रमानवाकडून केली जाणारी कामे अधिक अचूक आणि अधिक उत्कृष्ट होत असल्याचे लक्षात आले. स्वाभाविकपणे यंत्रमानवांकडे व्यावसायिकांचा ओढा सातत्याने वाढत गेला.

'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'मध्ये जसजसे यंत्रमानव विकसित होत गेले तसतसे त्यांच्या वापराचे प्रमाणही वाढत गेले. आजच्या घडीला मोटरगाड्यांचे उत्पादन, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, अन्नप्रक्रिया उद्योग, कृषी या प्रमुख क्षेत्रांमध्ये यंत्रमानवांचा वापर वाढतो आहे. विविध प्रकारची उत्पादने एका ठिकाणावरून दुसरीकडे नेणे, मालाची देखभाल करणे, 'ड्रोन'सारख्या तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयंचलित पद्धतीने वस्तूंची ने-आण करणे या सर्व कामांमध्ये यंत्रमानवाची मदत घेतली जाते. परंतु त्याच्या जोडीला आता संशोधन विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या विविध प्रयोगशाळांमध्येदेखील यंत्रमानवांचा वापर वाढू लागला आहे. धोकादायक रसायनांवर प्रयोग करण्यादरम्यान जीविताला धोका असल्याने अशी कामे यंत्रमानवांच्या मदतीने करण्यावर भर दिला जाऊ लागला आहे. अवकाश संशोधनांमध्येसुद्धा आता यंत्रमानवांचा वापर वाढू लागला आहे.

विज्ञान व संशोधनाच्या क्षेत्राबरोबरच आता आरोग्यसेवेच्या क्षेत्रातही 'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'चा वापर वाढू लागला आहे. गुंतागुंतीच्या अनेक शस्त्रक्रिया यंत्रमानवाच्या मदतीने अचूकतेने केल्याचे दाखल समोर येऊ लागले आहेत. तसेच, रोगनिदान करण्यामध्येदेखील यंत्रमानव महत्त्वाची भूमिका बजावू लागलेले आहेत. या शिवाय, रुग्णालयांमध्ये औषधांचे वितरण करणे, स्वच्छता राखणे, जंतूनाशकांची फवारणी यासारख्या बाबींमध्येदेखील यंत्रमानवांची मदत घेतली जाऊ लागली आहे. या शिवाय, लोकांना सेवा देण्याच्या आदरातिथ्यासारख्या क्षेत्रातही यंत्रमानवांचा वापर

वाढू लागला आहे. जपान, चीन आदी देशांत यंत्रमानवांच्या मदतीने लोकांना माहिती देणे, त्यांना आवश्यक सेवा पुरवणे या गोष्टी होऊ लागल्या आहेत. कृषी क्षेत्रात यंत्रमानवांच्या मदतीने कीटकनाशकांची फवारणी करणे, बी-बियाणांची पेरणी करणे, खुरपणी करणे, पिकांचे निरीक्षण करून त्यांचे मानांकन ठरवणे यासारख्या बाबी यंत्रमानवांच्या आणि 'ड्रोन्स'च्या मदतीने होऊ लागलेल्या आहेत. वरील सर्व उदाहरणे पाहता, सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये यंत्रमानवांचा प्रत्यक्ष वापर आणि अत्याधुनिक 'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'चे व्यवहारातील उपयोजन वाढत असल्याचे दिसते. आता 'रोबॉटिक्स तंत्रज्ञाना'चे आणखी एक पुढचे पाऊल म्हणून 'कोबॉट' या नव्या तंत्रज्ञानाचा वापर उद्योगविश्वात वाढू लागला आहे.

अमेरिकेतील Northwestern University मधील संशोधक आणि प्राध्यापक J. Edward Colgate आणि Michael Pushkin यांनी 'कोबॉट' ही संकल्पना सर्वांत पहिल्यांदा १९९६ साली मांडली होती. 'कोबॉट' याचा अर्थ आहे, 'कोलॅबोरेटिव्ह रोबॉट' अर्थात 'सहयोगी यंत्रमानव'. मानवाला पर्याय म्हणून नव्हे तर त्याच्याबरोबरीने काम करणारा यंत्रमानव, अशी ही मूळ संकल्पना आहे. मोबाइलचे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर आणि 'मशीन व्हिजन' या सगळ्याचा एकत्रितपणे वापर करून यंत्रमानवांचे काम अधिक प्रभावी बनविण्याकडे कल वाढतो आहे. या सगळ्या बाबींमुळे साकारलेला यंत्रमानव अधिक कुशल असतो. तो सर्व कामे वेगाने व अचूकतेने करतो. त्यामुळे आगामी काळात एक चांगला सहकारी म्हणून 'कोबॉट'चा वापर वाढत जाईल, असा संशोधकांचा कयास आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड असल्याकारणाने हे 'कोबॉट' स्वत: निर्णय घेण्याची क्षमता असणारे असतात. त्यामुळे सर्व कामे अधिक सुलभतेने होण्यास मदत होऊ शकते. त्यात कोणतेही तांत्रिक बिघाड झाले तरी कोणत्याही परिस्थितीत मानवास त्यांची हानी पोहोचणार नाही याची दक्षता त्यात पुरेपूर घेतलेली असते. त्याच्या गतीवर नियंत्रण ठेवणारी सगळी सूत्रे माणसाच्या हातात असतात आणि असा यंत्रमानव अनियंत्रित झाल्यास त्याचे काम खंडीत व्हावे, अशी सुविधाही 'कोबॉट'मध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहे. त्यामुळे 'रोबॉट'पेक्षाही अधिक सुरक्षित पर्याय म्हणून आता 'कोबॉट'कडे पाहिले जाऊ लागले आहे.

'रोबॉट' आणि 'कोबॉट' या दोन्हींमध्ये मूलभूत फरक म्हणजे, 'रोबॉटचे प्रोग्रॅमिंग' हे त्यांनी स्वयंचलित रीतीने काम करावे अशा पद्धतीने केलेले असते. परंतु 'कोबॉट'ची संरचनाच अशी केलेली असते की ते माणसाचे सहायक म्हणून काम करतात.

त्यामुळे ‘कोबॉट’ हे ‘रोबॉट’प्रमाणे माणसाला पर्याय न ठरताना माणसांकडून केल्या जाणाऱ्यां कामांमध्ये पूरक आणि सहायक ठरतात. आधुनिक ‘कोबॉट’मध्ये नव्याने विकसित केलेले ‘सेन्सर्स’ बसवलेले असतात त्यामुळे ‘रोबॉट’च्या तुलनेत ते अधिक सुरक्षित ठरतात. परिणामी, माणसांनी ‘कोबॉट’समवेत काम केले तरी कोणत्याही परिस्थितीत माणसांसाठी ते धोकादायक ठरत नाहीत. त्यामुळे यंत्रमानवांचाच अधिक ‘स्मार्ट’ अवतार म्हणून या नव्या ‘कोबॉट’कडे पाहिले जाते.

येत्या काळामध्ये या ‘कोबॉट’ची मदत अनेक प्रकारच्या मानवी श्रमांमध्ये होऊ शकते. बांधकामाची कामे, नालेसफाई, खाणींमध्ये काम करणे, ज्वालाग्राही रसायनांचे प्रयोग करणे, प्रचंड उष्णता अथवा नीचांकी तापमान असताना तिथे काम करणे या सर्व अवघड वाटणाऱ्या कामांमध्ये ‘कोबॉट’ माणसाचा सहायक बनून विनासायास कामे मार्गी लावू शकतो. धोक्याच्या ठिकाणी काम करताना दगावणाऱ्या माणसांची संख्या खूप मोठी आहे. अशा परिस्थितीमध्ये हे आधुनिक यंत्रमानव वरदान ठरू शकतात आणि जीवितहानी टाळली जाऊ शकते. या शिवाय, औद्योगिक आस्थापनांमध्ये वेष्टन, साठवणूक, वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे, नोंदी ठेवणे, देखभाल करणे अशा विविध कामांमध्ये ‘कोबॉट’ची मदत अधिक प्रभावी रीतीने होऊ शकते. कृषी क्षेत्रातसुद्धा केवळ औषध फवारणीच नव्हे तर लावणी, कापणी, पिकांची निगराणी, जल व्यवस्थापन अशा सर्वच बाबतींत त्याची मदत होऊ शकते. शिक्षण क्षेत्रातसुद्धा येणाऱ्या काळात ‘कोबॉट’च्या वापराचे प्रमाण वाढणार असून अध्यापन आणि प्रशिक्षण या दोन्ही कामांमध्ये त्याची मदत मोलाची ठरणार आहे. आभासी वर्गांच्या जोडीला आता विद्यार्थ्यांना शिकवणारा ‘कोबॉट’ दिसू लागल्यास आश्चर्य वाटायचे काहीच कारण नाही. ‘विज्ञान’, ‘तंत्रज्ञान’, ‘अभियांत्रिकी’, ‘संगणक प्रशिक्षण’, ‘गणित’ असे अवघड वाटणारे विषय, जगभरातील संदर्भ घेऊन ‘कोबॉट’ अगदी सुलभ रीतीने समजावून सांगू शकतो. त्याच्यातील ‘सेल्फ प्रोग्रॅमिंग’च्या क्षमतेमुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची त्याला जोड दिलेली असल्याने नव्या माहितीची भर घालून हे ‘कोबॉट’ स्वत:ला अद्ययावतसुद्धा ठेवू शकतात. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या रोजच्या जीवनव्यवहारात एका सहायकाची सतत मदत गरजेची असते. एक उत्तम सहायक बनून ‘कोबॉट’ ही भूमिका भविष्यात बजावू शकतील असा अंदाज वर्तवला जातो आहे. दिव्यांगांना अनेक गोष्टी शिकवण्यासाठी आणि त्यांच्या घरात मदतनीस म्हणून काम करण्यासाठी ‘कोबॉट’चा वापर सहजशक्य होईल असे मानण्यास भरपूर जागा आहे.

याच्याही पुढे एक पाऊल टाकीत आता Humanoid Kobot साकारण्याच्या दिशेने संशोधकांची पावले पडू लागलेली आहेत. असे 'कोबॉट' तयार करण्याचे असंख्य प्रयोग अमेरिका, चीन आणि जपानमध्ये सुरू आहेत. एलॉन मस्क यांच्या 'टेस्ला' या कंपनीच्या माध्यमातून असे 'कोबॉट' तयार करण्यावर विशेषत्वाने भर दिला जातो आहे. अलीकडेच 'टेस्ला' कंपनीने अद्ययावत आणि अनेक सुविधा असणारा 'Tesla Bot Gen 3' बाजारात सादर केला आहे. माणसांची कामे अधिक सोपी करणाऱ्या आणि त्यांना सहायक ठरणाऱ्या 'कोबॉट'ची जागतिक बाजारपेठही वेगाने विस्तारते आहे. Humanoid Kobot ची जागतिक बाजारपेठ आजमितीला ४० अब्ज अमेरिकी डॉलर्सची आहे. आगामी तीन वर्षांत ती ७० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत तर येत्या काही वर्षांत ही बाजारपेठ १०० अब्ज अमेरिकी डॉलर्सचा टप्पा पार करेल असा अंदाज वर्तवला जातो आहे. 'रोबोटिक्स'मध्ये सध्या जपान हा देश सर्वाधिक आघाडीवर असून येथील Fanuc Corporation आणि Yaskawa या कंपन्या यंत्रमानवांच्या निर्मितीत आघाडीवर आहेत. भारतातील 'कोबॉट'ची बाजारपेठ २०२४ साली २३०६ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतकी होती.

औद्योगिक आस्थापनांच्या जोडीला येणाऱ्या काळात घरगुती वापरातसुद्धा 'कोबॉट'ची मदत घेतली जाईल आणि घरातील एखाद्या सेवकासारखा किंवा सहायकाप्रमाणे तो मदत करेल अशी शक्यता आहे. स्वयंपाकघरात मदत करण्याच्या जोडीला खाद्यपदार्थ बनवू शकणारे 'कोबॉट'ही आता तयार होऊ लागले आहेत. या शिवाय कपडे धुणे, भांडी धुणे, घरात स्वच्छता राखणे, लहान मुलांची देखभाल करणे अशा सर्वच कामांमध्ये 'कोबॉट'ची अधिक चांगली मदत होऊ शकणार आहे. या शिवाय, अचानक उद्‌भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीमध्येही संरक्षकाच्या भूमिकेत हे 'कोबॉट' भविष्यात उभे राहतील. 'शॉर्ट सर्किट' होणे, घरात अचानक आग लागणे अशा संकटांच्या समयी करावयाच्या उपाययोजनांची आज्ञावली या 'कोबॉट'मध्ये बसवलेली असेल. त्यामुळे भविष्यात त्यांचा प्रभावी वापर घराघरांत सुरू होण्याची शक्यता आहे.

'रोबोटिक्स तंत्रज्ञान' झपाट्याने विकसित होत असताना 'रोबॉट'च्या पुढे जाऊन माणसाचा सहयोगी बनणाऱ्या 'कोबॉट'चे दिवस आता येऊ लागले आहेत. त्यांचे खरोखरीच चांगले परिणाम किती होतील आणि अनिष्ट परिणाम काय संभवतील याचे उत्तर मात्र येणारा काळच देऊ शकणार आहे.

# शहरीकरण

## नागरी प्रशासनाचे जटिल वास्तव

वेगाने नागरीकरण घडून येणाऱ्या देशांमध्ये आज भारताचा समावेश आहे. 'कोरोना'च्या प्रादुर्भावापायी २०२१ साली दशवार्षिक जनगणना होऊ शकली नाही. २०११ सालच्या जनगणना आकडेवारीनुसार, नागरीकरणाची सरासरी पातळी भारतामध्ये ३१ टक्क्यांच्या आसपास होती. अर्थातच, ही देशपातळीवरील सरासरी होय. नागरीकरणाच्या वाढविस्तारासंदर्भात देशातील राज्याराज्यांदरम्यान लक्षणीय तफावत पूर्वापारच नांदत आलेली आहे. नागरीकरणाच्या आजवरच्या आगेकूचीदरम्यान एकंदर तीन स्तरांवर तशी तफावत स्पष्टपणे दिसून येते. औद्योगीकरणामध्ये आघाडीवर राहिलेल्या महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, पंजाब व हरियाना यांसारख्या राज्यांमध्ये नागरीकरणाची सरासरी पातळी, नागरीकरणाच्या राष्ट्रीय पातळीपेक्षा चांगल्यापैकी अधिक आहे. तर उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान... यांसारख्या उत्तरेकडील मोठ्या राज्यांमधील नागरीकरणाची सरासरी पातळी नागरीकरणाच्या राष्ट्रीय पातळीपेक्षा कमी राहात आलेली आहे. नागरीकरणाच्याबाबतीत अग्रेसर असणाऱ्या राज्यांमध्येदेखील नागरीकरणाच्या वाढविस्तारासंदर्भात जिल्हा स्तरावर भरपूर असमानता आढळून येते. नागरी वाढविस्ताराच्या संदर्भातील असमतोलाचा तिसरा आयाम पुढ्यात अवतरतो तो शहरांच्या (अथवा, नागरी केंद्रांच्या) पातळीवर.

शहरी लोकसंख्येमध्ये वाढ घडून येताना दिसते ती मुख्यत: तीन स्रोतांद्वारे. लोकसंख्यावाढीचा नैसर्गिक दर (जन्मदर व मृत्यूदर या दोहोंतील फरक), हा झाला त्यांतील पहिला स्रोत. शहरांकडे होत राहणारे अविरत स्थलांतर हा ठरतो दुसरा घटक. तर, अस्तित्त्वात असणाऱ्या शहरांच्या भौगोलिक सीमांचा विस्तार घडून येणे हा शहरी लोकसंख्यावाढीचा होय तिसरा स्रोत. विद्यमान शहराच्या भौगोलिक सीमांचा विस्तार घडून येण्याद्वारे त्या शहराच्या झालर क्षेत्रातील गावांची लोकसंख्या

त्या शहराच्या लोकसंख्येमध्ये समाविष्ट होते अथवा आपसूकच केली जाते. स्थलांतरासंदर्भातही, आपल्या देशात, एकंदर चार प्रवाह आढळून येतात. खेड्यांकडून शहरांकडे केले जाणारे स्थलांतर सर्वपरिचित असेच आहे. परंतु, आताशा, काही प्रमाणात शहरांकडून पुन्हा खेडेगावांकडे असाही स्थलांतराचा एक प्रवाह आढळून येतो. 'कोरोना'च्या काळात जे घाऊक प्रमाणावर शहरांकडून गावांकडे स्थलांतर झालेले आपण पाहिले तो अपवाद गणावा लागतो. एका अर्थाने, ते सक्तीने करावे लागलेले स्थलांतर होते. स्थलांतराचा तिसरा प्रवाह लहान शहरांकडून मोठ्या शहरांकडे असा वाहताना दिसतो. मोठ्या महानगरांमध्ये गुंतवणूक, उद्योगव्यवसाय, रोजगाराच्या संधी यांचे केंद्रीकरण सतत होत असल्याने लहान शहरांमधील होतकरू अधिक चांगल्या रोजगार संधींच्या आशेने मोठ्या शहरांकडे पावले वळवतात. तर, स्थलांतराचा चौथा प्रवाह एका ग्रामीण परिसरातून दुसऱ्या ग्रामीण भागाकडे असाही वाहत असतो. यांपैकी, पहिल्या व तिसऱ्या प्रकारच्या स्थलांतराद्वारे शहरी विभागांच्या लोकसंख्येमध्ये भर पडत असते. असे असले तरीही, उपलब्ध आकडेवारीनुसार, आपल्या देशातील नागरी लोकसंख्यावाढीमध्ये सर्वांत मोठा वाटा राहिलेला दिसतो तो नागरी लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीचा.

येत्या काळात नागरीकरणाचा हा झपाटा असाच सक्रिय राहील, अशी चिन्हे सर्वत्र दिसतात. नागरीकरणाचा दमदार असणारा वेग आणि खास करून मोठ्या शहरांमध्ये होत राहणारे लोकसंख्येचे केंद्रीकरण यांपायी येत्या काळात नागरी पायाभूत सेवासुविधांवरील ताण सतत वाढता राहील. गुंतवणूक, उद्योगव्यवसाय, रोजगाराच्या संधी यांचे केंद्रीकरण ज्या प्रमाणात अप्रतिहत चालू राहील त्या प्रमाणात शहरांतर्गत रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, दिवाबत्ती, प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, घनकचरा व्यवस्थापन, वाहतूकपूरक सुविधा व यंत्रणा अशांसारख्या शहरी पायाभूत सुविधांची मागणी सतत वाढतच जाईल. त्यासाठी भरभक्कम भांडवली गुंतवणूक मग निकडीची ठरते. अशा भांडवली गुंतवणुकीमध्ये भला मोठा हिस्सा राहतो तो पायाभूत सुविधांचा विस्तार घडवून आणण्यासाठी आवश्यक ठरणारे भूसंपादन करतेवेळी संबंधितांना द्याव्या लागणाऱ्या मोबदल्याच्या रकमेचा. हे मग इथेच थांबत नाही. मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यात आलेल्या नागरी पायाभूत सुविधांच्या देखभालदुरुस्तीखातर, काही वर्षांनी का होईना पण, तशीच घसघशीत तरतूद करावी लागते. कारण, निर्माण केलेल्या सेवासुविधांची गरजेनुसार वेळेवर व उचित अशी देखभाल झाली नाही तर यथावकाश ती सुविधा निकामी बनते.

परिणामी, तिच्या निर्मितीमध्ये करण्यात आलेली भांडवली गुंतवणूक वाया जाते आणि नागरिकांची गैरसोयही जारी राहते. त्यांमुळे, आपल्या देशातील शहरी पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यासाठी, त्या त्या सुविधेसंदर्भातील मानकांनुसार, किती गुंतवणूक आवश्यक ठरते याचे मोजमाप सतत होत राहणे अनिवार्य शाबीत होते. अशा गणतीसाठी, नागरीकरणाच्या विद्यमान पातळीप्रमाणेच भविष्यात घडून येणाऱ्या संभाव्य नागरीकरणासंदर्भातील काही आडाखेदेखील लक्षात घेणे गरजेचे ठरते.

डॉ. मनमोहनसिंग हे पंतप्रधान असताना त्यांच्या कार्यकालात एका उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीची निर्मिती नेमक्या याच कारणासाठी करण्यात आली होती. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि नागरी प्रश्नांच्या अभ्यासक डॉ. ईशर जज अहलुवालिया या त्या तज्ज्ञ गटाच्या अध्यक्ष म्हणून नियुक्त होत्या. २००८ सालातील मे महिन्यात स्थापन करण्यात आलेल्या त्या समितीने तिचा अहवाल २०११ सालातील मार्च महिन्यात सादर केला. देशातील नागरीकरणाचा भविष्यकालीन चेहरामोहरा नजरेसमोर ठेवून, नागरी पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठी एकंदर किती गुंतवणुकीची गरज आहे, याचा हिशेब करण्याचे काम या समितीकडे सोपविण्यात आलेले होते. या कामासाठी, तज्ज्ञ समितीने एकंदर आठ शहरी सुविधांचा विचार गुंतवणुकीसंदर्भातील हिशेबामध्ये केला. पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, घनकचरा व्यवस्थापन, पावसाळ्यादरम्यान पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा घडवून आणणारे नाले आणि गटारे, रस्ते, वाहतूक, दिवाबत्ती आणि शहरी वाहतुकीसाठी आवश्यक असणाऱ्या अन्य पायाभूत सुविधा या आठ सुविधांचा विचार समितीने गुंतवणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या निधीचे मोजमाप करण्यासाठी केला.

असा हिशेब करण्यासाठी शहरीकरणाचा जो संभाव्य पसारा समितीने तिच्या नजरेसमोर ठेवलेला होता, त्याचा परिचय प्रथम करून घेणे उपकारक ठरते. आर्थिक पुनर्रचना पर्वानंतर देशाच्या ठोकळ देशी उत्पादनवाढीचा वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी सशक्त बनलेला आहे. आर्थिक वाढविकास आणि शहरी विकास यांचा संबंध जैविक स्वरूपाचा असतो. केवळ इतकेच नाही तर, या दोहोंदरम्यान नांदणारे नातेदेखील द्विविध असते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेदरम्यान अर्थव्यवस्थेमध्ये जे संरचनात्मक (स्ट्रक्चरल) बदल घडून येतात त्यांद्वारे बिगर शेती उद्योगधंद्यांना चालना मिळत राहते. वस्तुनिर्माण तसेच सेवा उद्योगांचा वाढविस्तार हा शहरे व नागरी विभागांच्या निर्मितीस कारक ठरणारा आद्य घटक ठरत असतो. त्यांमुळे, शहरांची निर्मिती आणि वाढ ही सर्वसाधारण आर्थिक विकासाची निष्पत्ती

गणली जाते. त्याच वेळी, शहरी बिगर शेती उत्पादन घटकांची सरासरी उत्पादकता शेतीसह एकंदरच प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन घटकांपेक्षा अधिक असल्याने शहरी अर्थकारणाची भरभराट वेगवान राहते. त्यांतून सर्वसाधारण आर्थिक विकासाला चालना मिळत राहते. या दोन समांतर प्रक्रिया एकमेकींचे सक्षमीकरण घडवून आणत गतिमान राहतात.

सर्वसाधारण आर्थिक विकास आणि शहरीकरणाचा विस्तार या दोहोंदरम्यानचा हा जैविक सहसंबंध ध्यानात घेऊन तज्ज्ञ समितीने नजीकच्या भविष्यातील संभाव्य नागरी वाढविस्ताराचा एक आलेख प्रथम तयार केला. २००१ सालातील जनगणनेनुसार आपल्या देशात एकंदर ५ हजार १६१ लहान–मोठी शहरे व नागरी केंद्रे होती. नागरी केंद्रांची हीच संख्या २०११ सालातील जनगणनेनुसार ७ हजार ९३५पर्यंत वाढलेली होती. २०३१ सालापर्यंत देशातील शहरोशहरी वास करणाऱ्या लोकसंख्येचे आकारमान साधारणपणे ६० कोटींपर्यंत वाढेल, असा अंदाज या संदर्भात समितीने मांडला. १० लाख अथवा १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांना 'महानगर' (मेट्रोपॉलिटन सिटी) असे म्हणले जाते. २०११ सालातील जनगणनेनुसार आपल्या देशात ५० महानगरे होती. २०३१ सालापर्यंत महानगरांची हीच संख्या ८७ पर्यंत वाढेल, असे संभवते. या ५० महानगरांमध्ये २०११ साली सुमारे १६ कोटी शहरवासी सामावलेले होते. २०३१ साली त्या वेळच्या ८७ महानगरांमध्ये अदमासे २६ कोटी शहरवासी सामावलेले असतील, असा समितीचा अंदाज सांगतो. महानगरे वगळता, आपल्या देशातील अन्य नागरी विभागांमध्ये २०११ सालच्या जनगणनेनुसार साधारणपणे २२ कोटी शहरवासी एकवटलेले होते. समितीच्या अंदाजानुसार, २०३१ सालादरम्यान, महानगरे वगळता अन्य नागरी केंद्रांमधील शहरवासियांची संख्या ३४ कोटींपर्यंत वाढलेली असेल.

येत्या काळात, देशाच्या सर्वसाधारण आर्थिक वाढविकासात, शहरे व महानगरेच कळीची भूमिका बजावतील हाच या सगळ्या कथनाचा इत्यर्थ. साहजिकच, देशांतर्गत उत्पादनात शहरी विभागांचे असणारे योगदानही तसेच भरभक्कम राहील. या संदर्भात, समितीने संकलित केलेली आकडेवारी मोठी उद्‌बोधक शाबीत होते. १९७०–७१ साली, देशी ठोकळ उत्पादनामध्ये तत्कालीन नागरी केंद्रांचा वाटा होता सरासरीने ३८ टक्क्यांच्या परिघात. त्या नंतर दहा वर्षांनी (सन १९८०–८१) तो वाटा उंचावून पोहोचला ४२टक्क्यांवर. आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या प्रारंभी (वर्ष १९९३–९४) ४७ टक्के इतका असणारा तो हिस्सा १९९९–२००० सालादरम्यान जाऊन टेकला होता

५२ टक्क्यांना. त्या नंतरच्या अवघ्या १० वर्षांतच (सन २००९-१०) शहरी केंद्रांचे देशांतर्गत ठोकळ उत्पादनामधील योगदान पोहोचले होते ६३ टक्क्यांवर. आणि २०३०-३१ या वर्षादरम्यान हेच प्रमाण चांगले ७५ टक्क्यांपर्यंत उंचावलेले असेल, असा अंदाज तज्ज्ञ समितीने व्यक्त केलेला आहे.

शहरांच्या वाढविकासात बिगर शेती उद्योगधंद्यांचे असणारे मुख्य योगदान ध्यानात घेता, येत्या काळात जर देशी उत्पादनातील जवळपास तीन चतुर्थांश उत्पादन शहरी विभागांमधून निर्माण होणार असेल तर, शहरोशहरींच्या वस्तुनिर्माण व सेवा उद्योगांचा त्यांत कळीचा सहभाग राहावा, हे ओघानेच येते. शहरांतील बिगर शेती उद्योगव्यवसायांची भरभराट ग्रामीण अर्थकारणाच्या सक्षमतेवर बऱ्याच अंशी निर्भर राहील. वस्तुनिर्माण व सेवा उद्योगक्षेत्रांच्या विस्तारामुळे, शहरी लोकसंख्येतील नैसर्गिक वाढीच्या हातात हात घालूनच, येत्या काळात, शहरांकडे होणारे स्थलांतर सशक्त राहील, असा कयास समिती व्यक्त करते. परिणामी, अनेक मोठ्या शहरांच्या झालर क्षेत्रातील ग्रामीण भाग त्या त्या शहरामध्ये अंतर्भूत केला जाऊन मोठ्या शहरांना महानगरांचे रंगरूप बहाल होण्याची प्रक्रिया येत्या काळात वेगाने साकारेल, असे संभवते.

हे सगळे असे चित्र पाहता, भारतीय अर्थव्यवस्थेची येत्या काळातील कामगिरी मुख्यत: शहरांच्या वाढविकासाशी घनिष्ठपणे निगडित राहील, असा निष्कर्ष सहजपणे पुढ्यात उभरतो. आजवर देशातील केवळ मोठ्या आकारमानाच्या शहरांमध्येच नागरी लोकसंख्येचे होत आलेले केंद्रीकरण पाहता, येत्या काळात, नागरीकरणाचा विस्तार नवनवीन शहरांच्या निर्मितीद्वारे घडून येणे गरजेचे ठरते. हा झाला एक पर्याय. दुसरा पर्याय म्हणजे, महानगरे वगळता देशातील जी अन्य शहरे आहेत त्यांच्याकडे गुंतवणुकीचा प्रवाह वळवणे, हा. म्हणजेच, शहरी पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्याला हे दोन आयाम आहेत. एक म्हणजे, विद्यमान मोठ्या शहरांमधील पायाभूत सेवासुविधांचा दर्जा टिकवून धरणे आणि दुसरे म्हणजे, लहान व मध्यम आकाराच्या नागरी केंद्रांमध्ये पायाभूत सेवासुविधा बळकट बनवण्यासाठी निधीची तरतूद करणे. परंतु, आजचे चित्र या संदर्भात अजिबातच समाधानकारक नाही, अशा निष्कर्षास तज्ज्ञ समिती अभ्यासांती येऊन पोहोचली. शहरवासी नागरिकांना दर्जेदार पायाभूत सेवासुविधा पुरवण्यासंदर्भात शहरे आजच तोकडी पडत आहेत. दमदार आर्थिक विकासाची 'इंजिने' म्हणून शहरे जर कार्यान्वित राहायची असतील तर शहरांमध्ये वसणाऱ्या आर्थिक विकासाच्या सर्व क्षमता पुरेपूर वापरल्या जाणे अनिवार्य ठरते. परंतु, समितीच्या निरीक्षणानुसार नेमकी समस्या आहे ती हीच

आणि इथेच. नागरी विभागांच्या आर्थिक विकासवर्धक क्षमता पूर्णपणे वापरल्या जाण्याच्या दृष्टीने शहरांमधील पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता, गुणवत्ता आणि दर्जा आजमितीस कमालीचा तुटपुंजा शाबीत होत आहेत.

देशातील नागरी विकासाचे भविष्यकालीन रंगरूप निकोप राहण्याच्या दृष्टीने एकंदर पाच आघाड्यांवर ठोस प्रयत्न केले जाण्याची गरज, या सगळ्या निरीक्षणांच्या पार्श्वभूमीवर, समितीने तिच्या अहवालात मुखर केली. दर्जेदार पायाभूत सेवासुविधा शहरांमध्ये पुरविणे आणि अशा सुविधांचा पुरवठा व देखभालदुरुस्ती कार्यक्षमपणे केली जाण्याच्या दृष्टीने शहरी प्रशासनाच्या कारभाराची गुणवत्ता सक्षम बनवणे, ही ठरते भविष्यकालीन सुधारणांची पहिली दिशा. विविध शहरी सुविधांचा पुरवठा त्यांच्या संदर्भातील प्रमाणकांना अनुसरूनच केला जावा आणि शहरांतील नागरिकांच्या सर्व स्तरांना – अगदी शहरातील गोरगरिबांसकट – त्यांचा लाभ सुलभतेने मिळत राहावा, ही ठरते दुसरी दिशा. शहरे आणि ग्रामीण विभाग यांच्यादरम्यानचे नाते सुभग आणि परस्परांच्या आर्थिक विकासविषयक क्षमतांचा वापर परस्परपूरक रीतीने घडवून आणण्यास उपकारक ठरेल, अशा प्रणाली निर्माण करून त्या राबविणे ही ठरते सुधारणांची तिसरी दिशा. या संदर्भात कळीची ठरणारी शहरी वाहतूकव्यवस्थेची भूमिका योग्यपणे जोखून तिची उचित अशी बूज राखणे ही होय चौथी आघाडी. तर, महानगरांच्या भविष्यकालीन वाढविस्ताराचे सजग, व्यवहार्य आणि कालबद्ध नियोजन आखून त्याची तितक्याच कार्यक्षमतेने परिणामकारक अंमलबजावणी केली जाण्यावर कामकाजाचा रोख स्थिर राखणे, ही समितीच्या लेखी ठरते भविष्यकालीन सुधारणेची पाचवी दिशा. म्हणजेच, समितीच्या विश्लेषणानुसार, येत्या काळात, शहरे जर आर्थिक वाढविकासाची प्रेरक ठरायची असतील तर एकंदरीनेच शहरी व्यवस्थापनाचा दर्जा सक्षम बनवण्याखेरीज अन्य पर्याय उरत नाही. हे साध्य करायचे तर, समितीच्या प्रतिपादनानुसार, तीन मुख्य आघाड्यांवर लक्ष केंद्रीत करणे क्रमप्राप्त ठरते. शहरी पायाभूत सुविधांचा पुरवठा आणि देखभालदुरुस्ती यांसाठी आवश्यक असणारी गुंतवणूक हाती घेणे, ही त्यांतील पहिली आघाडी. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची कारभारप्रणाली आणि वित्तप्रणाली यांचे सक्षमीकरण घडवून आणणे, ही ठरते दुसरी आघाडी. आणि, प्रशासनाच्या सर्वच स्तरांच्या क्षमतांचे संवर्धन करण्यासाठी एक सर्वंकष कार्यक्रम राबविणे ही ठरते तिसरी आघाडी.

नागरी पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता आणि त्यांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या सेवांच्या दर्जावर नागरी जीवनमानाची सरासरी गुणवत्ता निर्भर असते.

देशाच्या आर्थिक विकासाची 'इंजिने' म्हणून नागरी विभागांना येत्या काळात निभवावी लागणारी भूमिका त्यांना नीट पेलता यावी या दृष्टीने विविध बाबींचा अभ्यास व विचार करून डॉ. ईशर जज अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने गुंतवणुकीचा अदमास निश्चित करण्यासाठी एकंदर आठ शहरी पायाभूत सेवासुविधांवर झोत स्थिर केला. शहरी उद्योगव्यवसायांची उत्पादक क्षमताच केवळ नव्हे तर शहरी नागरिकांच्या सर्वसामान्य कल्याणाचा स्तर टिकवून धरण्यासाठीही त्या आठ सुविधा कळीच्या ठरतात. शहरांतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, वीजबत्ती, मलनि:स्सारण, घनकचरा व्यवस्थापन, पावसाचे पाणी वाहून नेणारे नाले व गटारे, वाहतूक व्यवस्था आणि वाहतुकीसाठी आवश्यक असणाऱ्या पूरक सुविधा, या होत त्या आठ पायाभूत शहरी सेवा सुविधा.

या आठ सुविधा, त्यांच्या पुरवठ्यासंदर्भातील निर्देशित मानकांसह देशातील सर्व नागरी केंद्रांमध्ये पुरवायच्या झाल्यास, २००९-१० या वित्तीय वर्षातील प्रचलीत किंमतींनुसार, एकून ३९ लाख १८ हजार ६७० कोटी रुपयांची तरतूद/प्रत्यक्ष खर्च/ गुंतवणूक पुढील २० वर्षांच्या कालावधीदरम्यान करावी लागेल, असा हिशेब तज्ज्ञ समितीने मांडला. यांत, शहरांतील प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्य आणि विजेच्या वितरणासाठी आवश्यक असणाऱ्या खर्चाचा अंतर्भाव नाही. तसेच, समितीने हिशेबासाठी निर्धारित केलेल्या आठ सुविधा देशातील नागरी केंद्रांमध्ये पुरविण्यासाठी अनिवार्य ठरणाऱ्या जमिनी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीचाही या हिशेबात विचार करण्यात आलेला नाही. सुमारे ३९ लाख कोटी हा झाला या आठ सुविधांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवली खर्चाचा/गुंतवणुकीचा अंदाज. त्यांव्यतिरिक्त, शहरांतील विद्यमान तसेच नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या भांडवली स्वरूपाच्या मालमत्तेची निगराणी व देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी, पुढील दोन दशकांच्या कालावधीदरम्यान आणखी २० लाख कोटींची तरतूद करणे भाग आहे, असेही तज्ज्ञ समितीने तिच्या अहवालात नमूद केले.

डॉ. अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने मांडलेल्या या अंदाजानंतर जवळपास १०-११ वर्षांनी तशाच प्रकारचा एक अभ्यास जागतिक बँकेनेदेखील प्रकाशित केला. त्या अभ्यासावर आधारित २०२२ साली प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, भारतातील शहरी पायाभूत सेवासुविधांची निर्मिती व देखभाल-दुरुस्ती यांखातर, २०३६ सालापर्यंत एकूण ८४ हजार कोटी डॉलर्स इतकी गुंतवणूक/खर्च/निधीची गरज असल्याचा हिशेब मांडण्यात आलेला होता.

आता, जागतिक बँकेच्या अभ्यासगटाने तयार केलेला अभ्यास अहवाल आणि त्यांतील निधीचा अंदाज असो, अथवा, डॉ. अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने विचारात घेतलेल्या शहरी आठ पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचे मोजमाप असो, एवढा प्रचंड निधी कसा उभा करावयाचा हा खरा यक्षप्रश्न ठरतो. अगदी केंद्र सरकार, संबंधित राज्य सरकारे आणि काही प्रमाणात (सरकार व खासगी क्षेत्र यांच्यादरम्यानच्या भागीदारी तत्वावर) खासगी क्षेत्र यांच्याकडून निधीची तरतूद (होईल तेव्हा आणि झाली तर) झाल्यानंतरही जो काही निधी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्था अथवा सूत्र निश्चित होईल तितका निधी तरी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांपाशी असेल अथवा नाही, हा या संदर्भातील महत्त्वाचा पुढील मुद्दा ठरतो. निधी उभारण्यासंदर्भातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय क्षमता, बऱ्याच अंशी, त्यांच्या वित्तीय कारभाराच्या परिणामकारकतेवर (फिस्कल गव्हर्नन्स) अवलंबून राहते अथवा असते. त्यांमुळे, शहरी पायाभूत सेवासुविधांची निर्मिती, देखभाल-दुरुस्ती व त्यांसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद या सगळ्याचा संबंध शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराची एकंदरच सरासरी गुणवत्ता कितपत अव्वल आहे, याच्याशी जाऊन पोहोचतो. अर्थव्यवस्थेच्या विकासाचे 'इंजिन' म्हणून नागरी विभागांकडे आपण बघणार असू, आणि/अथवा, शहरांकडून तशी अपेक्षा इथून पुढील काळात आपण धरणार असू तर, नागरी विभागांमध्ये रुजलेल्या आर्थिक विकासाच्या क्षमतांचे भरणपोषण सुदृढपणे घडून येणे, घडवून आणले जाणे अत्यावश्यक ठरते. त्यासाठी जी गुंतवणूक अनिवार्य ठरते तिचे ढोबळ आकारमान ध्यानात आणून देणारे हे दोन अभ्यास (डॉ. ईशर जज अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समिती आणि जागतिक बँक) याच दोन दस्तऐवजांचा संदर्भ आजही घेतला जातो. केवळ त्याचसाठी या दोन पूर्वीच्या अभ्यासांचा संदर्भ इथवर तपशीलवार नमूद केलेला आहे.

आपल्या देशातील नागरीकरणाशी संलग्न अशा विविध मुद्यांसंदर्भात चिकित्सक विचारविमर्श घडवून आणण्याच्या दृष्टीने पुणे येथील 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी' (यशदा) येथे अलीकडेच एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्या चर्चासत्रादरम्यान, नागरी स्वराज्य संस्थांच्या कारभारविषयक परिणामकारकतेसंदर्भातील विविध पैलूंचा उहापोह करणाऱ्या उपगटांमध्ये निमंत्रित तज्ज्ञांनी केलेल्या सादरीकरणांचा गोषवारा सादर करण्याचा या ठिकाणी केलेला प्रयत्न उद्‌बोधक ठरावा. या परिसंवादामध्ये सहभागी झालेल्या अभ्यासकांनीदेखील,

नागरी पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा व देखभालदुरुस्ती यांसाठी आवश्यक असणाऱ्या गुंतवणुकीबाबत भाष्य करतेवेळी डॉ. अहलुवालिया यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ गटाचा अभ्यास आणि जागतिक बँकेने केलेला अभ्यास याच दोन्ही दस्तऐवजांच्या शिफारशी संदर्भासाठी वापरलेल्या होत्या. त्यांमुळे, जरी हे दोन्ही अहवाल पूर्वकालीन असले तरी त्यांचे संदर्भमूल्य आजही उणावलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे.

नागरी पायाभूत सेवासुविधांची निर्मिती आणि त्यांची देखभाल–दुरुस्ती यासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज शासनसंस्थेच्या विविध स्तरांवर मान्य झालेली आहे. परंतु, या संदर्भात अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांच्या तसेच नागरी प्रशासकांच्या पुढ्यातील मुख्य प्रश्न आहे तो या गुंतवणुकीच्या अवाढव्य आकारमानाचा. देशातील नागरी विभागांतील पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या निधीमधून, सुविधांच्या निर्मितीसाठी गरजेच्या भासणाऱ्या भूसंपादनासाठी आवश्यक असलेला गललेठ्ठ निधी जरी एक वेळ वगळला तरी, आवश्यक अशा उर्वरित निधीची गरज पुरविणे शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवाक्याबाहेरच आहे. परिणामी, गरजेच्या तुलनेत अतिशय कमी निधी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यासाठी आणि देखभाल–दुरुस्तीसाठी आजमितीस खर्च करत आहेत. परिणामी, नागरी जीवनमानाचा दर्जा बाधित होण्याबरोबरच शहरी अर्थकारणात सक्रिय असणाऱ्या उद्योग–व्यावसायिकांच्या उत्पादकतेवरही दुर्बळ व अलक्षित पायाभूत सेवासुविधांचा प्रतिकूल परिणाम घडून येत राहतो.

आजची परिस्थिती अशी आहे की, नागरी स्थानिक संस्थांचे स्वत:चे निधीस्रोत अतिशय अपुरे आहेत. मोठ्या शहरांमध्ये लोकसंख्येचे केंद्रीकरण दिवसेंदिवस वाढतच असल्याने शहरी पायाभूत सेवासुविधांना असणारी मागणीही भूमिती श्रेणीने वाढत राहते. शहरोशहरी कामकाजानिमित्त 'ये–जा' करणाऱ्या त्या त्या शहराच्या हद्दीबाहेरील नागरिकांची संख्याही प्रचंड असते. शास्त्रीय परिभाषेत अशा लोकसंख्येचा निर्देश 'फ्लोटिंग पॉप्युलेशन' असा केला जातो. रस्ते, वाहतूक, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा अशांसारख्या मूलभूत सेवांवर अशा 'फ्लोटिंग पॉप्युलेशन'चाही मोठा ताण पडत राहतो. सेवासुविधांना असणारी अशी वाढती मागणी पूर्ण करण्यात नागरी स्वराज्य संस्था आज सपशेल अपुऱ्या पडत आहेत. वस्तू आणि सेवा कराची प्रणाली अंमलात आल्यापासून त्या आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत असणारे विविध कर वस्तू व सेवा करामध्ये सामावले गेले आहेत. त्यांतही पुन्हा, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मुख्य फटका बसला तो जकातीसारखा दररोज

बख्खळ उत्पन्न रोख स्वरूपात तिजोरीमध्ये जमा करणाऱ्या कराचे विसर्जन झाल्यामुळे. या सगळ्यांपायी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची वित्तीय क्षमता कुपोषित बनते आहे. परिणामी, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था वित्तीय साधनसामग्रीच्याबाबतीत दुर्बळ बनत चाललेल्या आहेत. साहजिकच, शहरी पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा व त्यांची देखभाल-दुरुस्ती यांसाठी जेवढ्या मात्रेने वित्तीय तरतूद केली जाणे गरजेचे ठरते त्याच्या तुलनेत अतिशय कमी तरतूद आजघडीला प्रत्यक्षात होते आहे.

घरपट्टी हा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थकारणाचा कणा होय. परंतु, घरपट्टीची आकारणी आणि वसुली यांत आज अनंत प्रकारचे व्यवस्थात्मक तसेच व्यावहारिक अडथळे उभे आहेत. एक तर, शहरांच्या हद्दीतील मालमत्तांची नोंदणी काटेकोर व अद्ययावत नसल्याचे अनेक ठिकाणी आढळून येते. त्यांत भर पडते ती पुन्हा थकबाकीची. अनधिकृत बांधकामांचे वाढणारे पेव हा या कराशी संलग्न असलेला आणखी एक जटिल पैलू. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था नागरिकांना पुरवत असणाऱ्या सेवांखातर आकारले जाणारे सेवाशुल्क हा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा दुसरा मोठा स्त्रोत. परंतु, अनेक ठिकाणी उत्पन्नाचा हा स्त्रोतही पुरेपूर/पर्याप्तपणे वापरला जात असल्याचे दिसत नाही. नागरी स्वराज्य संस्थांच्याद्वारे पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधांसाठी जारी असलेली शुल्कआकारणी अपुरी/अपर्याप्त असते.

स्पर्धात्मक राजकारण हे त्यामागील एक कारण असले तरी तेच केवळ एकमात्र कारण नव्हे. मुळात, वाढत्या मागणीनुसार पायाभूत सुविधांच्या पुरवठ्यात वाढ घडवून आणता आली नाही तर, संबंधित सेवांसाठी वाढीव शुल्क मोजण्यास नागरिक नाखूष बनतात. तसेच, विविध सुविधांची देखभाल-दुरुस्ती वेळेवर व पुरेशी केली जाणे अपेक्षित असताना निधीच्या तुटवड्यापायी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ती करता आली नाही तर संबंधित सेवांचा गुणात्मक दर्जा ढासळतो व निकृष्ट सुविधांसाठी वाढीव शुल्क मोजण्यास नागरिक तयार होत नाहीत. तिसरीकडे, मुख्यत: पाणीपुरवठा, शहरी वाहतूक यांसारख्या जीवनावश्यक सुविधांचा पुरवठा करतेवेळी शासनसंस्थेची भूमिका निखळ व्यापारी तत्त्वावर बेतलेली असत नाही. तशी ती असूनही चालत नाही. कल्याणकारी शासनसंस्थेने शहरातील विविध आर्थिक स्तरांमधील नागरिकांचा विचार करून रास्त व परवडण्याजोगी शुल्कआकारणी करणे, अपेक्षित असते. म्हणजेच, त्यांत अनुदानाचा हिस्सा मोठा राहतो.

या सगळ्यांचा एकत्रित परिणाम होऊन शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांपाशी वित्तीय वाढावा (सरप्लस) उरतच नसतो. त्यांमुळे, शहरांतर्गत पायाभूत सेवासुविधांच्या पर्याप्त पुरवठ्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांचे हातपाय आखडलेले राहतात. हे एक प्रकारचे दुष्टचक्रच होय. आपल्या देशातील शासनसंस्थेच्या त्रिस्तरीय संरचनेत स्थानिक स्वराज्य संस्था या अगदी तळाला आहेत. त्यांमुळे, निधीच्याबाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थांचे, सत्तेच्या या उतरंडीमध्ये वरील स्तरांवर असणाऱ्या शासनसंस्थांवरील वित्तीय अवलंबन वाढत राहावे, हे मग ओघानेच येते. वरच्या स्तरावरील शासनसंस्थांकडून हस्तांतरित होणाऱ्या निधीमध्ये दोन मुख्य प्रकार दिसतात. त्यांतील पहिला म्हणजे काही विविक्षित योजना अगर उपक्रमांखातर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित केला जाणारा निधी (टाइड ग्रान्ट). ज्या उपक्रमाखातर अथवा ज्या सुविधेच्या निर्मिती अगर पुरवठ्याखातर तो निधी निर्धारित केलेला असेल तिच्या निर्मितीसाठीच हस्तांतरित होणारा संबंधित निधी वापरण्याचे बंधन स्थानिक स्वराज्य संस्थांवर इथे राहते. राज्य सरकार अथवा केंद्र सरकारकडून हस्तांतरित केला जाणारा निधी विशिष्ट उपक्रमांसाठी अथवा बाबींसाठीच निर्धारित असेल तर व्यवहारात अडचणी उभ्या ठाकतात. त्या त्या शहराची निकड आणि ज्या योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे ती योजना/उपक्रम/सुविधा/कार्यक्रम यांत विसंवाद/तफावत अनेकदा संभवते. परिणामी, एकीकडे निधी वापराविना पडून राहतो अथवा परत जातो तर, दुसरीकडे आवश्यक अशा पायाभूत सेवासुविधांसंदर्भातील शहरांच्या गरजा भागत नाहीत.

अशा परिस्थितीत, आज, स्वत:च्या उत्पन्नाव्यतिरिक्त, राज्य वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार हस्तांतरित होणारे खुले निधी (अनटाइड ग्रॅन्टस्) हाच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत ठरतो. या संदर्भात, साहजिकच मग, राज्य वित्तीय आयोगांची भूमिका केंद्रवर्ती ठरते. परंतु, अभ्यासकांच्या निरीक्षणांनुसार, राज्य वित्त आयोगांच्या नेमणुकांबाबतही फारसे उत्साहवर्धक चित्र दिसत नाही. २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये देशातील सर्व राज्यांमध्ये, वेळापत्रकानुसार, सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना होणे अपेक्षित होते. मात्र, अगदी एक अथवा दोनच अपवाद वगळता कोठेही तसे झाल्याचे दिसत नाही. राज्य वित्त आयोगांची वेळेवर स्थापना, आयोगांनी त्यांचे कामकाज निर्धारित मुदतीत पूर्ण करून त्यांना नेमून दिलेल्या संदर्भ कालावधीदरम्यान वित्त आयोगाचा अहवाल सादर होऊन तो राज्य सरकारने स्वीकारणे, त्या संदर्भातील कार्यवाहीचा अहवाल विधानसभेच्या पटलावर

राज्य सरकारने सादर करणे... यांसारख्या बाबी कोठेच काटेकोरपणे होताना दिसत नाहीत. अनेक ठिकाणी, ज्या कालखंडासाठी वित्त आयोगाने निधीवाटपासंदर्भात शिफारशी करणे अपेक्षित असते, तो कालावधी उलटून गेल्यानंतर वित्त आयोगाचा अहवाल संबंधित राज्य सरकारला सादर झाल्याची उदाहरणेही आढळतात. त्यांचे अहवालही अभ्यासकांना सहज उपलब्ध होत नाहीत. राज्य वित्त आयोगांना त्यांच्या परिणामकारक कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या किमान सुविधा – जागा, कार्यालय, मनुष्यबळ, संगणकादी साधनसामग्री – संबंधित राज्य सरकारांकडून पुरेशा प्रमाणात व वेळेवर उपलब्ध करून दिली जातानाही दिसत नाही. या अशा पार्श्वभूमीवर, राज्य वित्त आयोगांच्या संस्थात्मक व्यवस्थेचे सर्वांगीण सक्षमीकरण घडवून आणले जाणे अतिशय निकडीचे बनलेले आहे, अशी तीव्र भावना अनेक अभ्यासक प्रकर्षाने व्यक्त करताना दिसतात.

या अनास्थेचा एक अतिशय गंभीर परिणाम म्हनजे, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय बाबींसंदर्भात प्रमाणित, अद्ययावत, पुरेशी, विश्वसनीय आणि तुलना करता येण्याजोगी आकडेवारी सहजासहजी उपलब्ध होत नाही. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे वित्तीय व्यवहार कशा प्रकारे नोंदवून ठेवावेत या बाबत केंद्रीय स्तरावरून तसेच प्रत्येक राज्याने त्याचे त्याचे दंडक तयार केलेले आहेत. परंतु, प्रत्यक्षात या दोनपैकी कोणतीची प्रणाली नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अवलंबत नाहीत. असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. परिणामी, संशोधनांती काही ठोस उपाययोजना अथवा सुधारणा वा शिफारशी करता याव्यात या दृष्टीने आवश्यक ठरणारी संबंधित आकडेवारी अभ्यासकांना मुदलात उपलब्धच होत नाही. खर्चाच्या नोंदींचे प्रमाणीकरण दिसत नाही. परिणामी, 'भांडवली खर्च' कोणता व 'महसुली खर्च' कोणता अशांसारख्या साध्या वर्गीकरणाचाही अभाव दिसतो अथवा संबंधित नोंदींवरून खर्चाच्या प्रकाराबाबत बोध होत नाही. अशापायी, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय व्यवस्थापनाची गुणवत्ता सुधारण्यासंदर्भात ठोस अशा काही व्यवहार्य शिफारशी करणेही अशक्यप्राय होऊन बसते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय प्रकृतीचा परिणाम, अपरिहार्यपणे, त्यांच्या विकासविषयक जबाबदाऱ्यांच्या निर्वहनावर होणे स्वाभाविकच ठरते. त्यासाठी, प्रथम, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय तब्येतीची व्यवस्थित वास्तपुस्त केली जाणे अगत्याचे ठरते. परंतु, अशा परीक्षणांसाठी आवश्यक असणारी आकडेवारीच मुदलात हाताशी नसेल, तर सगळे बोलणेच खुंटते! स्थानिक स्वराज्य संस्थांची लेखा प्रणाली (अकौंटिंग सिस्टिम) निर्दोष असणे ही त्यासाठीची पूर्वअट ठरते.

परंतु, गंमत अशी आहे की, नेमके इथेच घोडे पेंड खाते! अभ्यासकांच्या पाहणीनुसार, 'डबल एन्ट्री' लेखापद्धती शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बव्हंशी वापरात आणलीच जात नाही. केवळ इतकेच नाही तर, एकंदरीनेच लेखा पद्धतीतील सुधारणांबाबत शहरी स्थानिक स्वराज्य संस्था घाऊक प्रमाणावर उदासीन दिसतात. त्यांना या बाबीचे महत्त्वच जाणवत नाही अथवा/आणि उमगलेले नाही, असा निष्कर्ष काढण्यावाचून काही पर्यायच उरत नाही. या वास्तवाबाबत कोणीच संबंधितांना जबाबदार धरत नसल्यामुळे ही अनास्था सदोदितच नांदत राहते. त्यांमुळे लेखानोंदींबाबत सुधारणा करण्याची प्रेरणा अथवा दबाव कोठेच नाही. असा दबाव कारभारविषयक कार्यपद्धतीमध्येच कोठेही नसल्याने लेखाव्यवस्थेची गुणवत्ता सुधारण्याबाबत जाणीव अथवा/आणि गरज व्यवस्थेमध्ये दिसत नाही. खासगी उद्योगांच्याबाबतीत असे घडत नाही. 'सेबी'सारख्या शासकीय यंत्रणा, कंपनीचे भागधारक, शेअर बाजार... यांच्यासारख्यांच्या नजरा त्यांच्यावर रात्रंदिवस रोखलेल्या असल्यामुळे लेखाव्यवस्थेबाबत त्यांना काटेकोर राहावे लागते. तसे काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबतीत घडत नसल्यामुळे काटेकोर वित्तीय नोंदींबाबत ढिसाळपणा सर्वत्र भरपूर दिसतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षणकृत अहवाल, ताळेबंद वेळच्यावेळी तयार झालेच पाहिजेत, त्यांची काटेकोर छाननी सक्षम पातळीवरून केली जाऊन त्यांत आढळणाऱ्या त्रुटींचा निरा-निपटारा करण्यासाठी योग्य त्या व्यवस्था कार्यान्वित केल्या गेल्या पाहिजेत यांबाबत कोठेच कठोर मार्गदर्शक तत्त्वे अथवा संकेत वा दंडक व्यवहारात नाहीत, त्याचा हा परिणाम होय, असे अभ्यासकांचे प्रतिपादन सांगते.

ही परिस्थिती व तिच्यातून निष्पन्न होणारी अनास्था झटकण्यासाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी, व्यवस्थापक तसेच लोकनियुक्त प्रतिनिधी यांना प्रशिक्षणाची गरज असल्याचा अभ्यासकांचा अभिप्राय आहे. विशेषत:, स्थानिक पातळीवरील नेतृत्वाशी निगडित विविध पैलूंबाबत प्रशिक्षण आयोजित करण्याची आवश्यकता अनेक संशोधक व्यक्त करत आहेत. त्यासाठी अनुरूप असा अभ्यासक्रम निर्माण करण्याबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध विभागांतील गरजांनुसार या अभ्यासक्रमात अनुरूप बदल/फरक असणेदेखील गरजेचे आहे. आजघडीला हे काहीच होताना दिसत नाही. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि शिक्षण संस्था यांच्यादरम्यान संवादाचा असलेला पूर्ण अभाव, हे त्याच्या मुळाशी असलेले मुख्य कारण. नागरी प्रशासनाचे विद्यमान वास्तव असे व इतके जटिल आहे! ■■

# उजळणी

सर्वच इतिहास समकालीन असतो, असे म्हणले जाते. त्यांत तथ्यही आहे. निरंतर वाहणाऱ्या काळाचे, निखळ सोयीसाठी आपण भूत–वर्तमान–भविष्य अशा तीन खंडांत विभाजन करतो. परंतु, मानवी व्यवहारातील जटिलतेची अशी व इतकी सोयीस्कर विभागणी करणे शक्यच नसते. भूतकाळात जमा झालेल्या अनेक वृत्ती–प्रवृत्ती, प्रेरणा, समस्या वर्तमानातदेखील नव्या रंगरूपात आपल्या भवताली प्रगटलेल्या दिसतात. समाजाच्या भल्याबुऱ्याची चिंता आस्थेवाईकपणे वाहणारे समाजमनस्क अशा प्रेरणा–समस्यांबाबत त्या त्या वेळी टिप्पणणी करत असतात. समाजासमोर उभ्या ठाकलेल्या प्रश्नांची चिकित्सा व मीमांसा करणाऱ्या थोरांचे ते विश्लेषक बोल, त्या त्या प्रश्नांप्रमाणेच, काळाच्या प्रवाहावर तरंगत राहतात. साहजिकच मग, जुनेच प्रश्न अथवा मुद्दे रंगरूप अंमळ पालटून वर्तमानात अवतरले की, चिंतनशील थोरांनी त्या त्या मुद्यांसंदर्भात त्या त्या वेळी प्रगट केलेले चिंतन समकालीन भवतालाचे आकलन करून घेण्यास चालू काळातही बव्हंशी उपयुक्त ठरते, असे आपल्याला अनेकदा प्रकर्षाने जाणवते. थोरांच्या तशा बोलांची उजळणी प्रचलीत वास्तवाच्या संदर्भात करण्याचा एक प्रयत्न या सदराद्वारे आपण सुरू करतो आहोत. आचार्य विनोबा भावे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या दोन व्यासंगी चिंतनशीलांच्या पूर्वकालीन विचारमंथनापासून ‘उजळणी’च्या या उपक्रमाचा आरंभ आपण करतो आहोत. १ मे या दिवशी साजरा केला जाणारा ‘महाराष्ट्र दिन’, त्याच दिवशी साजरा होणारा ‘मराठी राजभाषा दिन’ आणि मे महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाणारी ‘बुद्ध जयंती’ या तीन बाबींशी आंतरिक अनुबंध सांगणारे या दोन महामनस्कांचे संपादित असे संशोधित बोल आपल्याला अंतर्मुख बनवतील असेच आहेत.

# (१) : बुद्धाला ‘रिक्लेम’ केले पाहिजे

■ **आचार्य विनोबा भावे**

कित्येक दिवसांपासून माझ्या चित्तात हे चालले आहे की आपण बुद्धाला ‘रिक्लेम’ केले पाहिजे. एखादी जमीन पडीत राहिलेली असली म्हणजे तिला चांगली करून पुन्हा लागवडीखाली आणतात, त्याला जमीन ‘रिक्लेम’ करणे असे म्हणतात. बुद्ध आपल्यातलाच होता आणि या युगासाठी तोच अवतार आहे, म्हणून त्याला आपण ‘रिक्लेम’ केले पाहिजे. हिंदू लोकांची सर्व धर्मकार्ये बौद्ध अवतारात होत असतात– ***‘वैवस्वते मन्वन्तरे बौद्धावतारे.’*** म्हणजे आज आपण बौद्धावतारात आहोत. परंतु मध्यंतरी आपण हे विसरलो होतो. आणि बुद्ध हिंदुस्थानच्या बाहेर जो गेला तो अनेक देश हिंडून, अनेक देशांत ज्ञान–प्रचार करून परत मायभूमीला आला आहे. अहिंसेचा विचार अनेक संतांनी सांगितला, तोच आता एक परिपूर्ण जीवनविचार होऊन आलेला आहे. म्हणजे जीवनातल्या प्रत्येक शाखेला लागू होईल असा तो विचार झालेला आहे. केवळ धर्मापुरताच नव्हे तर समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यांनाही तो लागू होणार आहे. आता हिंदुस्थानात अहिंसेची प्रतिष्ठापना होत आहे आणि त्यानंतर साऱ्या जगात होणार आहे. म्हणजे बौद्धावताराचा आता आरंभ होत आहे.

२५०० वर्षांपूर्वी त्याचा अवतार झाला. परंतु मध्यंतरी तो लोपला. कारण त्याला अनुकूल परिस्थिती राहिली नाही व लोक शस्त्रास्त्रांच्या लढायांत दंग झाले. आता शस्त्रास्त्रांनी प्रश्न सुटतील, अडचणींचा परिहार होईल अशी आशा दुनियेतल्या शस्त्रास्त्रांतील प्रवीण लोकांनाही राहिलेली नाही. अशा स्थितीत आज बुद्धावताराची अतिशय गरज आहे. बुद्ध ही आजच्या युगाची भौतिक आवश्यकता आहे. म्हणून तीन वर्षांपूर्वी बिहारमध्ये समन्वय आश्रमाची स्थापना करताना मी म्हटले होते की वेदान्त आणि अहिंसा यांचा समन्वय करणे जरुरीचे आहे. जी अहिंसा बुद्ध, महावीर आणि पुढील संतांनी सांगितली, त्या अहिंसेनेच या युगातले प्रश्न सुटणार आहेत. तेव्हा ती अहिंसा आणि तिचा मूळ आधार वेदान्त यांचा समन्वय करावयास हवा. त्यासाठी समन्वयाचा नवीन धर्म आता रूढ केला पाहिजे.

**राम–कृष्ण–हरी**

आता राम व कृष्णाच्या नावांबरोबर बुद्धाचेही नाव जोडावे लागेल. आपण ‘राम कृष्ण हरी’ असे म्हणतो. यातील ‘हरी’ हा शब्द बुद्धवाचक समजू या. रामाने

सत्यनिष्ठा शिकविली, कृष्णाने अनासक्त कर्मयोग शिकविला व बुद्धाने करुणा शिकविली. सत्यनिष्ठा ही एक नैतिक वस्तू आहे. समाजाला प्रथम नीति-विचाराची आवश्यकता असते. त्याची नैतिक श्रद्धा डळमळीत होते तेव्हा सत्यधर्म शिकविण्याची आवश्यकता असते. रामाने सत्यधर्मासाठी खूप अडचणी सोसल्या. अविचल सत्यनिष्ठा हे रामाचे रूप आहे. ते फार रमणीय आहे. त्यानंतर कृष्णाने अनासक्तीचा पाठ दिला. अनासक्तीशिवाय साम्य अशक्य आहे, म्हणून कृष्णाने अनासक्त कर्मयोगाचा धडा शिकविला आणि जीवनभर तो आचरला. साधनेच्या रूढ एकांगी कल्पना त्याने काढून टाकल्या. अनासक्त कर्मयोग म्हणजे साम्ययोग. मला साम्ययोग हे नाव अधिक योग्य वाटते. गीतेच्या सहाव्या अध्यायातील चार श्लोक (६.२९-३२) मोठे सूचक आहेत. ***''जो आत्मौपम्य-बुद्धीनें सर्वत्र सम पाहतो''*** इत्यादी चार श्लोकांना मी साम्ययोगाचे श्लोकचतुष्टय म्हणतो व तेच गीतेचे सार आहे असे समजतो. नीतिमत्तेची अविचलता चित्तात ठसल्यानंतर भगवान कृष्णाने साम्ययोग दिला. त्यानंतर बुद्धाचा अवतार झाला. साम्ययोग करुणामूलक असेल, तरच तो साम्ययोग होतो. नाही तर ते स्थूल साम्य होते. यांत्रिक पद्धतीने आणलेले साम्य हे खरे साम्य नव्हे.

**साम्य आणि कारुण्य**

जगातले कुठलेही पाणी खाली वाहताना दिसते. सगळ्यात खाली समुद्र नावाचा जो खड्डा आहे त्याला भरण्याकरता सगळे पाणी कारुण्याने खालच्या दिशेने धावत असते. नद्यांच्या ठिकाणी हीच करुणा वाहताना दिसते. याप्रमाणे करुणेतून आलेले साम्य नसेल तर वैषम्य, विरोध, विसंवाद, झगडे उत्पन्न होतात.

पाण्याची अशी खुबी आहे की एखाद्या विहिरीतून तुम्ही पोहराभर पाणी काढून घेतले तर पाण्यात पोहऱ्याच्या आकाराचा खड्डा पडत नाही, तर सबंध पाण्याची पातळी थोडी खाली जाते. पाण्याच्या बिंदूंत असे नैसर्गिक स्नेहसामर्थ्य आहे की काही पाणी कमी होत आहे असे दिसताच पाण्याचे सर्व बिंदू त्या दिशेने धावत जातात. पाण्याला हे साम्य साधले आहे. परंतु तांदळाच्या ढिगातून तुम्ही एक पायली तांदूळ काढून घ्याल, तर तुम्हाला त्यात पायलीच्या आकाराचा एक खड्डा पडलेला दिसेल. फक्त काही दोन-चार महात्मे तांदूळ तो खड्डा भरण्यासाठी धावून जातील. बाकीचे आडमुठे तांदूळ आपल्या जागी बसून राहतील. पाण्यात साम्याची स्थापना करण्याचा जो गुण आला तो कशामुळे आला? स्नेह आणि अनुरागामुळे ते निम्नाकडे धावते, त्यामुळे आला. अशी ही कारुण्यवृत्ती जेव्हा वाढेल तेव्हा साम्ययोग सिद्ध होईल.

अलीकडे अर्थशास्त्रज्ञ, कम्युनिस्ट इत्यादी साम्याची अगदी कृत्रिम आणि यांत्रिक प्रक्रिया करू पाहतात, पण त्यामुळे साम्याऐवजी वैषम्यच येते. मानसिक वैषम्य तर येतेच, पण बाह्य वैषम्यही येते. रशियात साम्याचा प्रयत्न करूनही त्याची स्थापना होऊ शकली नाही, कारण तेथील प्रक्रिया कारुण्यमूलक नव्हती. कारुण्य-मूलक प्रक्रियेने साम्ययोगाची स्थापना होऊ शकते, हे भगवान बुद्धाने शिकविले.

राम-कृष्ण-हरी यातील 'हरी' हा 'सर्ववैषम्यहारी' शब्द आहे. तो कुठलेच वैषम्य टिकू देणार नाही. तेव्हा तो बुद्धच आहे असे समजावे. याप्रमाणे सत्याच्या विषयीची अचल नीतिनिष्ठा, सर्वत्र साम्ययोग आणण्याची ध्येयवृत्ती आणि त्याकरिता कारुण्य हे साधन, या तीन गोष्टी हिंदुधर्मात एकामागून एक येत गेल्या. आता त्यांची आपण पुन:स्थापना करू या. आणि भारतीय धर्माला - जागतिक धर्माला म्हणायला हरकत नाही, पण सध्या भारतीय धर्माला असेच म्हणू या - असे त्रिविध रूप देऊया - नीतिनिष्ठा हा पाया, साम्ययोग हे शिखर आणि करुणा हा मार्ग.

**बुद्धाचा प्रभाव**

बुद्ध हिंदुस्थानात जन्मला आणि त्याचा प्रभाव जगभर पडला. त्या बुद्धाला आपण जिरवू या, पचवू या. सध्या येथे धर्मसुधारणेचा एक विचार चालला आहे. हरिजन बौद्ध होत आहेत. ही सामान्य, वरवरची गोष्ट मी समजत नाही. 'उपनिषदांचा अभ्यास' हे पुस्तक मी १९२३ साली लिहिले. त्याचा शेवट मी बुद्धाच्या वचनाने केला आहे. १९४५ साली 'स्थितप्रज्ञ - दर्शन' हे पुस्तक लिहिले. त्यातही शेवटी म्हटले आहे, ***"एकं ब्रह्मं च शून्यं च य: पश्यति स पश्यति."*** जो बौद्धांचा शून्यवाद आणि हिंदूंचा ब्रह्मवाद एकच आहे असे पाहतो, तोच खरे पाहतो. हे दोन ग्रंथ लिहिण्यामध्ये बावीस वर्षांचा काळ गेला, त्या काळामध्ये माझ्या चित्तात एकच विचार होता की या देशाला समन्वयाची गरज आहे.

लहानपणी मी बडोद्याला होतो. तेथील राजे सयाजीराव यांचा बुद्धाकडे कल होता. त्यांनी तेथील एका बगिच्यात बुद्धाच्या मूर्तीची स्थापना केली होती. मी त्या बगिच्यात नेहमी जात असे, त्या मूर्तीकडे बघत असे. तेव्हापासून मला बुद्धाचा नाद आहे. सयाजीराव एका विचाराचे होते, पण त्यांना बुद्धाचा नाद होता. गांधीजी हे दुसऱ्या विचाराचे होते, पण त्यांना बुद्धाचा नाद होता. रवींद्रनाथ टागोर हे तिसऱ्या विचाराचे होते, पण त्यांना बुद्धाचा नाद होता. पं. नेहरू हे चवथ्या विचाराचे आहेत, पण त्यांनाही बुद्धाचा नाद आहे. आणि डॉ. आंबेडकर ह्यांनाही बुद्धाचा नाद होता. ह्याचे कारण असे की ही आजच्या युगाची भूक आहे. आज अनेकांना बुद्धाविषयी

आदर वाटतो ह्याचे कारण, आजच्या युगाची आवश्यकता बुद्ध पूर्ण करीत आहे. आज जगाला कारुण्याची गरज आहे.

**बुद्धाचे मुख्य कार्य करुणेचे**

कित्येक लोक म्हणतात की बुद्धाने जातिभेद – निरसनाचे कार्य केले. पण तसे म्हटले तर मग बुद्धाचे ते एक अपयशच मानले जाईल. कारण आज अडीच हजार वर्षांनंतरदेखील जातिभेद कायम आहे. तेव्हा बुद्धाचे ते कार्य होते असे म्हणणे योग्य होणार नाही. धम्मपदात जे शेवटचे 'ब्राह्मणवग्गो' प्रकरण आहे त्यात त्याने ब्राह्मण कसा असावा ह्याची जी लक्षणे दिली आहेत, ती स्थितप्रज्ञाच्या लक्षणांसारखीच आहेत. यावरून त्याला ब्राह्मण ह्या शब्दाविषयी किती आदर होता हे दिसते. त्याने आजच्या अर्थाने जातिभेद – निरसनाचे कार्य केले असे म्हणणे योग्य होणार नाही. उच्च-नीचता नसावी, गुणांकडे लक्ष द्यावे इत्यादी गोष्टी त्याने सांगितल्या. परंतु त्याचा मुख्य विचार कारुण्याचा होता. आणि कारुण्याचे प्रतीक म्हणूनच त्याने यज्ञातील पशुहिंसेचा प्रश्न हाती घेतला. ज्याप्रमाणे भूसमस्येचा परिहार हे मला निमित्त मिळाले आहे, त्याप्रमाणे भगवान बुद्धाने यज्ञातील पशुहिंसा बंद करण्याचे एक स्थूल कार्य हाती घेतले आणि त्याच्याद्वारे कारुण्याचा प्रचार केला. म्हणून त्याची प्रसिद्धी कारुण्यावतार या नावाने झाली.

**सत्य-प्रेम- करुणा हे धर्म-सार**

आता आपण आपल्या धर्मविचारात राम-कृष्ण यांच्याबरोबर बुद्धाला स्थान दिले, तर धर्म अधिक व्यापक होऊन त्याच्या पूर्ण विकासाला चालना दिली असे होईल. आता जी धर्मसुधारणा करावयाची आहे तिच्यात समन्वयाची दृष्टी हवी. करुणा हेच भक्तीचे रहस्य आहे. संतांनीदेखील हे सांगितले होते. परंतु त्याचबरोबर त्यांनी मूर्तिपूजाही सांगितली. शंकराचार्यांनी नारायणाला कारुण्यमूर्ती मानले. त्यांनी 'भूतदया' हा शब्द वापरला आहे – ***'अविनयमपनय विष्णो दमय मन: शमय विषय-मृगतृष्णाम् भूत-दयां विस्तारय तारय संसार – सागरत:.'*** बुद्धाने जी भूतदयेच्या विस्ताराची गोष्ट विस्ताराने मांडली, ती शंकराचार्यांनी विष्णूला करुणामय असे नाव देऊन सांगितली. ही हिंदुधर्माची रीत आहे.

म्हणूनच मी रोजच्या मौन प्रार्थनेत सांगतो की परमेश्वराच्या सत्य, प्रेम आणि करुणा या तीन मोठ्या गुणांचे चिंतन करू या. सत्य म्हटल्यावर रामचंद्र उभा राहतो. प्रेम म्हटल्यावर भगवान कृष्ण उभा राहतो, कारण अनासक्तीशिवाय प्रेम नाही आणि प्रेमाशिवाय अनासक्ती नाही. आणि करुणा म्हटल्यावर भगवान बुद्ध समोर उभे

राहतात. तेव्हा राम, कृष्ण, बुद्ध म्हणावयाचे असल्यास सत्य, प्रेम, करुणा म्हणता येईल. ते तीन गुण म्हणजे सर्व धर्मांचे सार आहे. हिंदुधर्मात ***'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म'*** इत्यादी वचने आहेत. म्हणजे त्यात परमेश्वराचे सत्य स्वरूप हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. तसेच ख्रिस्तीधर्मात 'गॉड इज लव्ह' म्हणतात. म्हणजे परमेश्वराचे प्रेमस्वरूप सर्वश्रेष्ठ मानले. आणि इस्लाममध्ये 'रहमानिरहीम' असे म्हणून परमेश्वराचे करुणामय स्वरूप सर्वश्रेष्ठ मानले. म्हणजे सत्य, प्रेम आणि करुणा ही तीन रूपे सर्व धर्मांचे सारही आहे आणि शिवाय आपल्या धर्मातील राम, कृष्ण, व बुद्ध ह्यांचेही सार आहे.

*(**संदर्भ :** महाराष्ट्रात विनोबा : भूदान आंदोलनाच्या काळात १९५८ मध्ये महाराष्ट्रात केलेली भाषणे, संपादक- पराग चोळकर, साधना प्रकाशन, २०२४, पृ. क्र. ७३-७३).*

# (२) : आपल्या वाङ्‌मयतपाचा क्रियाकलाप

**■ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

भारताच्या संघराज्याच्या जन्मास ज्या विविध प्रकारच्या चळवळी कारणीभूत झाल्या, त्या चळवळींचा एक प्रेरक मध्यबिंदू म्हणून आधुनिक मराठी साहित्य जन्मले आहे. मराठी साहित्याचा एकंदरीत उगम व विकास, चिरंतन अशा भारतीय संस्कृतीच्या अधिष्ठानावर झाला आहे. दुसरे असे की, आधुनिक काळातील मराठी वाङ्‌मयाच्या मुळाशी असलेली एक महत्त्वाची प्रेरणा भारतीय स्वातंत्र्याच्या जन्मास कारणीभूत झाली आहे. त्या प्रेरणेनेच भारतीय एकराष्ट्रीयत्वाची रचना केली आहे. एकराष्ट्रीयत्वाच्या प्रसूतिवेदना व संवेदना महाराष्ट्रभूमीने अनुभवल्या आहेत व ती अनुभवीत आहे. त्या अनुभवातच आधुनिक मराठी वाङ्‌मय विकास पावत आहे.

संघराज्यावरील निष्ठेतच महाराष्ट्राची प्रतिष्ठा आहे, हे विशिष्ट मनोगत गेल्या शतकातील महाराष्ट्राचा इतिहास व्यक्त करीत आहे. संघराज्याच्या प्राणप्रतिष्ठेच्या कार्यामध्ये महाराष्ट्राने आपल्या वाट्यास आलेले कर्तव्य कसलीही कसूर न ठेवता पार पाडले आहे. आधुनिक मराठी वाङ्‌मय या गोष्टीची साक्ष सविनयपणे देत आहे. म्हणूनच या भारतीय संस्कृतीच्या केंद्राकडे महाराष्ट्रीय मन कायमचे ओढले गेले आहे. या मनाच्या संवेदना या केंद्राच्या दर्शनाने उल्हसित होत आहेत. या मनाला या दर्शनामुळेच प्राचीन भूतकालापासून वर्तमानकालापर्यंतच्या इतिहासाचा विशाल चित्रपट दिसू लागतो. विश्वचैतन्यात निनादून राहणारे, कुरुक्षेत्रात भगवंताने गायिलेले चिरंतन गीत येथे अधिक जवळून ऐकू येत आहे. त्या गीताचे स्वर बाहेर पडल्यानंतर

अनेक मानवी युगे निघून गेली; त्या प्रत्येक युगात जे जे उच्चतम विचार द्रष्ट्यांच्या, प्रेषितांच्या, तत्त्ववेत्त्यांच्या व चिरस्थायी कलाकारांच्या कृतींनी प्रकट केले, त्याचे उचित स्वरसंमेलनही या गीताला साथ देत आहे.

**साध्ये व साधने**

आमच्या या उच्च भाविक जाणिवेच्या योगाने आमच्यावर ज्या ज्या नव्या जबाबदाऱ्या आल्या आहेत व जे जे नवे प्रश्न आमच्या पुढे उपस्थित झाले आहेत, त्यांचा अर्थ समजण्यास आम्हास सामर्थ्यच प्राप्त होईल. आम्हाला आमचे ध्येयवाद, विचार व आचार यांचा योग्य समन्वय साधून विसंगती नष्ट करावयाची आहे. आमची ध्येयेही अनेक असून त्यांच्यात विसंगतीही पुष्कळ आहे. त्या विसंगतीमुळे आमच्या विचारांत व प्रयत्नांत दोष उत्पन्न होतात. आमच्यात असलेली, मनुष्यस्वभावात सुलभपणे आढळणारी जरठस्थान– पूजकता, आमच्या उच्च नैतिक ध्येयांना बंधने घालीत आहे. ही विसंगती, दोष व बंधने निवारणारा समन्वयात्मक दृष्टिकोन आम्हास पाहिजे आहे. या दृष्टिकोनाच्या आश्रयाने मानवी विश्व, भारत राष्ट्र आणि महाराष्ट्रासारखे अवांतर प्रदेश यांच्यांतील चळवळीत अविरोध स्थापन करणारे आणि त्याबरोबरच स्वतंत्र वैशिष्ट्यांचे पोषण करणारे साधन घडवावयाचे आहे.

अशा प्रकारचे मुख्य साधन लोकशाही संस्कृती वा लोकशाही समाज हाच होय. विश्वव्यापी मानवी सहानुभूती व तिच्यातून निष्पन्न होणारी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही बौद्धिक तत्त्वे जीवनात उतरणे व अनुभवणे या गोष्टीची गरज त्याकरिता आहे. मानवी स्वातंत्र्याच्या तत्त्वाच्या आश्रयाने विविध संस्कृतींचे स्थिर वैशिष्ट्य राखले जाते. परंतु त्याबरोबरच त्यातील संकुचित बंधनांचा विध्वंस करणारी प्रवृत्तीही निपजते. समतेच्या तत्त्वाचा आश्रय केल्याने भौतिक व आध्यात्मिक समृद्धीचे सार्वत्रिक वितरण करणारी चळवळ वाढीस लागून तदनुरूप सामाजिक व राजकीय संस्था अस्तित्वात येतात. विश्वबंधुत्वाच्या तत्त्वाचे अवलंबन केल्याने स्वयंप्रेरित मानवी सहकार्याला सर्व प्रकारच्या मानवी प्रयत्नांच्या क्षेत्रांत प्राधान्य येते व त्यामुळे प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक स्पर्धा हतवीर्य होते.

लोकशिक्षणाशिवाय लोकशाही संस्कृती व लोकशाही समाज निर्माण करण्याची प्रक्रिया सफल होऊ शकत नाही. कारण विकसित स्वतंत्र समाज म्हणजेच लोकशाही समाज होय. लोकशाही संस्कृती अशाच समाजाचे आविष्करण असते. अशा सामाजिकतेची घडण शिक्षणाद्वारा वाङ्मय व कला करीत असतात. कारण, वाङ्मय आणि कला हे आध्यात्मिक व उदात्त अशा परस्पर सहयोगाचे एक उच्चतम साधन आहे. वाङ्मय

व कला यांच्या उत्कृष्ट संवर्धनाच्या योगाने भाषा प्रगल्भदशेस येतात. प्रगल्भदशेस आलेल्या मातृभाषांच्या योगाने सार्वत्रिक लोकशिक्षण देणे शक्य आहे. प्रगल्भदशेस आलेल्या प्रादेशिक मातृभाषा ही भारतीय लोकशाहीची एक मुख्य गरज आहे.

सामर्थ्यशाली एकराष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा उद्देश सफल करण्याकरिता प्रादेशिक मातृभाषांची वाढ करणारे साहित्य कसे निर्माण होईल, हा साहित्य संमेलनांच्या चिंतेचा व चिंतनाचा विषय होय. सरकार व लोक, साहित्यिक व पंडित, शिक्षणसंस्था आणि शिक्षक यांना यासंबंधी मार्गदर्शन करणे हे आपल्या वर्तमान साहित्य संमेलनांचे मुख्य प्रयोजन होय. परंतु हेही येथे प्रामुख्याने लक्षात ठेवले पाहिजे की, साहित्याच्या वाढीची व्यवस्थित योजना संमेलने जरी आखू शकतात तरी त्या योजना अमलात आणण्याची मुख्य जबाबदारी अखेरीस व्यक्तिश: साहित्यिक, प्राध्यापक व पंडित यांच्यावर पडत असते.

**वाङ्मय तप**

साहित्यिक, प्राध्यापक व पंडित यांना त्याकरिता सरस्वतीची आराधना व साधना करावी लागते. सुरसुंदरी सरस्वतीचे ध्यान रमणीय असते; परंतु तिची साधना सिद्ध होण्यास दीर्घ काल प्रखर तपश्चर्याच करावी लागते. प्रखर तपश्चर्येचे कष्ट सरस्वतीच्या सुंदर ध्यानामुळेच सुसह्य होऊन समाधान देत असतात. त्यामुळेच प्रज्ञामय सविकल्प समाधी साधून साहित्याची सरस फले सरस्वतीच्या प्रसादाने प्राप्त होतात. आदिपुरुषाने अभिध्यानरूप महातपातून हे विश्व निर्मिले, असे वेद वारंवार म्हणतात. हे वेदांचे म्हणणे मानवी विश्वाला म्हणजे संस्कृतीस अधिक समंजसपणे लागू पडते. अगणित युगांच्या चिरंतन महातपस्येतून माणसांनी संस्कृतीचे विश्व निर्माण केले आहे, असे इतिहासाचे सार आहे. साहित्य ही संस्कृती रचणारी एक महान शक्ती होय. विश्वाचे अर्थ मानवी जीवपिंडात भरले जात असतानाच, मानवी रचना होत असते. विश्वाच्या अर्थांची किंवा अभिप्रायांची सुंदर रचना म्हणजेच साहित्य व कला होय.

आपल्या वाङ्मय तपाचा क्रियाकलाप कोणता व त्यास साफल्य कसे प्राप्त होईल, याचे विवरण व या संबंधाचा मूलभूत दृष्टिकोन मला या अध्यक्षीय भाषणात सांगावयाचा आहे. इतिहासाचे तत्त्वज्ञान, हे या दृष्टिकोनाचे अधिष्ठान आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक पार्श्वभूमी गृहीत धरून संस्कृतीचा इतिहास व वाङ्मयेतिहास यांचा परस्पर संबंध दर्शित करणे, हा या दृष्टिकोनाचा गाभा आहे. हा दृष्टिकोन विशद करण्याकरिता तत्संबंधाने उपस्थित होणाऱ्या चार मुद्द्यांचा अत्यंत संक्षिप्त ऊहापोह

मी येथे करणार आहे. (१) संस्कृती व साहित्य यांचा संबंध (२) महाराष्ट्रातील भारतीय संस्कृतीचे ऐतिहासिक स्वरूप (३) मराठी वाङ्मयाचा इतिहास (४) राष्ट्रीय ऐक्यास पोषक असे मराठीचे व प्रादेशिक भाषांचे संवर्धन करण्याचा प्रश्न. आद्य व वंद्य असा मराठी साहित्याचा विजयस्तंभ म्हणजे 'ज्ञानेश्वरी' होय. मराठी वाङ्मयीन युगाची प्रारंभीची ती यशोध्वजा आहे. ज्ञानाच्या सर्व शाखांच्या पार्श्वभूमीवर वाङ्मयाचे पोषण व्हावे लागते, हे राजशेखराने सांगितलेले तत्त्व 'ज्ञानेश्वरी'च्या प्रस्तावनेमध्ये सूचित केलेले दिसते. भारतीय प्राचीन विद्यांच्या विस्ताराची गणेशाच्या रूपाने मूर्ती कल्पून तिचे 'वंदन मंगलाचरण' म्हणून ज्ञानेश्वरांनी केले आहे. आत्म्यातच विद्या आणि कला यांची निर्मिती व स्थिती असते. म्हणून त्या गणेशदेवतेला 'आत्मरूप' या शब्दाने निर्दिष्ट केले आहे. ही सर्व बौद्धिक संस्कृती म्हणजे साक्षात् शब्दब्रह्म होय, असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. शब्दाकार होणारे मानवी चैतन्य म्हणजेच 'शब्दब्रह्म' होय. 'शब्दब्रह्मा'ची कल्पना वस्तुतत्त्वाची दर्शक आहे. ग्रीक संस्कृतीतील Logus व 'शब्दब्रह्म' यांत अर्थसाम्य आहे. मनुष्याच्या बौद्धिक संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने या संज्ञेचा महिमा अगाध आहे. त्यातील अर्थ फार गंभीर आहे. शब्दाचा संकेत निर्माण करणारा मनुष्यच स्वत:चे नवे विश्व म्हणजे संस्कृती निर्माण करू शकला. वस्तुतत्त्वाला शब्दसंकेतात अंतर्भूत करण्याची प्रक्रिया ही संस्कृतीची प्रतिनिधिभूत क्रिया होय. मानवी मन प्रतिभेच्या द्वारा जेव्हा स्वतंत्रपणे निर्मिती करण्याचा प्रयत्न करते, तेव्हाच कला निर्माण होते. शब्दाचा उपयोग करून प्रतिभा जेव्हा निर्मिती करते, तेव्हा प्रतिभेचे स्वातंत्र्य पूर्णतेस पोहोचते. कारण शब्देतर माध्यमांचा उपयोग करीत असता प्रतिभेला बाह्य जगावर अधिक अवलंबून राहावे लागते. म्हणून हेगेल आपल्या सौंदर्यमीमांसेत काव्य हा सर्व कलांतील उच्चतम प्रकार होय असे सांगतो. तो म्हणतो की, ''ज्ञाता, ज्ञेय व माध्यम हे सर्व माणसांतच समाविष्ट झालेले काव्यात दिसत असते.'' शब्द व अर्थ मनाचेच घटक बनलेले असतात. इतर कलांच्यामध्ये बाह्य आणि आंतर हा भेद राहतो. मूर्ती, मंदिर, चित्र व संगीत यांची माध्यमे म्हणजे पाषाण, मृत्तिका, रंग व वाद्य किंवा ध्वनी यांचे कलाकाराच्या बाहेरच अस्तित्व असते. काव्याचे माध्यम शब्द होय. शब्द हा सुद्धा विचाररूप बनलेला असतो व विचार हा आत्म्यातच असतो. असे हे विशिष्ट अद्वैत ध्यानात धरून 'शब्दब्रह्म' ही संज्ञा वापरली आहे. माध्यम व अर्थ यांची एकरूपता साधणारी व वाङ्मयाच्या रूपाने प्रकट झालेली आत्मशक्ती अशा सूचक अर्थाने 'शब्दब्रह्म' ज्ञानेश्वराने निर्दिष्ट केले आहे. 'शब्दब्रह्म' मोठे स्फूर्तिदायक तत्त्व म्हणून

भारतीय कवींनी मानले आहे. उत्तररामचरिताच्या उपसंहारश्लोकात भवभूती स्वत:संबंधी निर्देश करताना म्हणतो की, ''शब्दब्रह्मवेत्त्या प्राज्ञ कवीची परिणतीस पोहोचलेली ही वाणी आहे, तिचे मनन करा!''

या शब्दब्रह्माचे व्यक्त रूप असलेल्या भारतीय सारस्वतास प्रणाम करून नंतर ज्ञानेश्वरांनी प्रतिभेस शारदेच्या रूपाने आवाहिले आहे. ''**आता अभिनववाग्विलासिनी। जे चातुर्यकलाकामिनी । ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ।।**'' अभिनववाग्विलासिनी या विशेषणाने शारदा म्हणजे प्रतिभा असे सूचित होते. कारण शारदा ही प्रतिभेची अधिष्ठात्री देवता भारतीय शास्त्रकारांनी मानिली आहे. ध्वन्यालोककार म्हणतात की, ''महाकवीची सरस्वती ही स्वादु अशा वस्तुतत्त्वाचा निष्यंद निर्माण करताना स्फुरण पावणाऱ्या अलौकिक अशा प्रतिभेला अभिव्यक्त करीत असते. म्हणूनच कवींच्या एवढ्या मोठ्या परंपरेने भरलेल्या संसारात दोन, तीन, चार किंवा पाचच महाकवी म्हणून गणले जातात.'' ध्वन्यालोकाचे विवेचनकार अभिनवगुप्त आपल्या 'लोचन' नामक टीकेत याच प्रतिभा शब्दाची व्याख्या अशी करतात : ''प्रतिभा म्हणजे अपूर्व वस्तू निर्माण करण्यास समर्थ अशी प्रज्ञा होय. हिचा विशेष म्हणजे रसात्मक व विशद असे काव्य निर्माण करण्याचे सामर्थ्य होय. हिलाच भरतमुनींनी कवींचा अंतर्गत भाव असे म्हटले आहे.''

**भारतीय संस्कृतीचे महाराष्ट्रातील रूप**

भारतातील प्राचीन काळातील सांस्कृतिक चळवळी व धार्मिक आणि तात्त्विक विचारांची परिवर्तने यांच्या बदलत्या ऐतिहासिक पार्श्वभूमीत भारतातील कला व साहित्य यांच्यातही वेळोवेळी बदल झाला व या बदलाचा आविष्कार करणारी कला व साहित्य निर्माण झाले. या ऐतिहासिक सिद्धांताच्या समर्थनार्थ महाराष्ट्रातील भारतीय संस्कृतीचे मनन फार उपयुक्त ठरते. वैदिक, पौराणिक व बौद्धकालाशी ज्याचा संबंध आहे, मध्ययुगीन प्रादेशिक भाषांच्या उदयाच्या कालाशी ज्याचा संबंध आहे, आणि ब्रिटिश राज्याच्या स्थापनेनंतरच्या नव्या परिस्थितीशी ज्याचा संबंध आहे, असा कलेतील व साहित्यातील परिवर्तनाचे अर्थ दर्शित करणारा इतिहास या सिद्धांताचे उत्कृष्ट समर्थन करतो. हाच या भाषणाचा मध्यवर्ती मुद्दा आहे.

महाराष्ट्रातील भारतीय संस्कृतीचा विकास फार दूरच्या भूतकाळाच्या काळोखात दडलेल्या युगापासून सुरू होतो. त्या इतिहासपूर्वकालातील भारतीय सांस्कृतिक आंदोलनाचे दोन महत्त्वाचे प्रवाह इतिहासाला अनुमानिता येतात. त्या प्रवाहांना मानवी जमातींची नावे पुरातत्त्वसंशोधकांनी अंदाजाने दिली आहेत. 'आर्येत्तर व

आर्य', किंवा 'द्रविड' आणि 'वैदिक' हे ते प्रवाह होत. अंधाऱ्या रात्री दूरवरचे आकाशगंगेचे प्रवाह जसे दिसावे, तसे ते इतिहासाला दिसतात. ते दोन सांस्कृतिक प्रवाह एकरूप होऊन भारतीय संस्कृती निर्माण झाली आहे. 'द्रविड' आणि 'वैदिक' संस्कृतींचा अवशिष्ट व स्पष्ट असा भौगोलिक सांधा म्हणजे 'महाराष्ट्र' होय. दक्षिण व उत्तर यांचे संधिस्थान 'महाराष्ट्र' आहे. महाराष्ट्राचे सीमाप्रदेश द्राविड भाषिकांच्या किंवा आंध्र आणि कर्नाटक यांच्या प्रदेशांशी मिसळले आहेत. आजकालच्या महाराष्ट्राचे सीमाप्रदेश व प्राचीन महाराष्ट्राचे सीमाप्रदेश एक नव्हेत, असे इतिहासज्ञ सांगतात. आज दिसणाऱ्या महाराष्ट्राच्या आत खोलपर्यंत 'द्रविड भाषा' पसरल्या होत्या, असे पूर्वेतिहास सांगतो. मराठी भाषेतील द्रविड शब्दांची समृद्धी हे याचे एक गमक आहे. 'द्रविड' भाषकांची येथे राज्येही होती, असे म्हणतात. द्राविडांच्या मातृप्रधान कुटुंबसंस्थेचे परिणामदर्शक अंशही महाराष्ट्रातील कुटुंबसंस्थेत दाखविले जातात.

उत्तरेकडील कुटुंबसंस्थेशी तुलना करता, महाराष्ट्रातील स्त्री-वर्ग अधिक मोकळेपणाने वावरताना दिसतो. इकडे गोषा किंवा बुरखा नाही व तो कधीही माहीत नव्हता. परंतु हा द्राविड कुटुंबसंस्थेच्या परंपरेचा अंश आहे, असे निश्चित करणेही कठीण आहे. वैदिक वा आर्य यांच्या परंपरेतील स्त्रीला बौद्धिक दर्जा प्राप्त झालेला, इतिहासाच्या साधनांमध्ये नोंदलेला सापडतो. ग्रीक संस्कृतीपेक्षा प्राचीन आर्यांच्या संस्कृतीत स्त्रियांचे बौद्धिक महत्त्व अधिक मानले गेले होते. वैदिक सूक्तद्रष्ट्यांच्या यादीत विसापेक्षा अधिक स्त्रियांची नावे गोवलेली आढळतात. बृहदारण्यक उपनिषदात वर्णिलेल्या तत्त्ववेत्त्यांच्या राजसभेत स्त्री तात्त्विक चर्चेत भाग घेताना दिसते. तत्त्वज्ञानी पतीशी तात्त्विक संवाद करीत असलेली स्त्रीही याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवादात मिळते. पौराणिक कथा व बौद्धवाङ्मय यांत स्त्रियांचा भागही महत्त्वाचा दिसून येतो. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या संतवाङ्मयातही मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांची भक्तिगीते त्या वाङ्मयाला भूषवीत आहेत. आधुनिक महाराष्ट्रातही साहित्य, काव्य व सार्वजनिक कार्ये यांत स्त्रियांचा लहानसा परंतु मनात भरणारा असा भाग दिसतो.

इतिहासपूर्वयुगातील भारतीय संस्कृतीची काही गमके महत्त्वाची आहेत. विदर्भातील नल-दमयंतीस्वयंवर व अज-इंदुमतीविवाह ही महत्त्वाची गमके होत. इतिहासपूर्वकालातील मानववंशांच्या हालचालींच्या चित्रपटांतही महाराष्ट्राचे दर्शन घडते. पुराण-पंडित पार्जिटरच्या मताने सहस्रार्जुनाच्या हैहयनामक क्षात्रगणाची वा यादवगणाची महाराष्ट्र ही प्राचीन वसाहत होय. पृथ्वीवरील आदिराजा म्हणून ज्याचे वर्णन पुराणे करतात, त्या पृथुवैन्याच्या वेनवंशाची वेल महाराष्ट्रभूमीवरही विस्तार

पावली, याची काही भाषिक प्रमाणे सापडतात. महाराष्ट्राचा विद्यमान प्रादेशिक विस्तार, उत्तरेकडून दक्षिणेकडे पाहिला असता, वेनगंगेपासून कृष्णवेणेपर्यंत दिसतो. महाभारतात कृष्णा नदीचे नाव 'कृष्णवेणा' असेच दिले आहे व इतर अनेक पुराणांतही ही संज्ञा आढळते: वेनगंगेतील 'वेन' व कृष्णवेणेतील 'वेण' हा शब्द त्या नद्यांच्या काठी वसाहत करणाऱ्या कृषिगणाचा दर्शक असू शकेल. उत्तरेकडील गंगाकाठचे लोक प्रथम गोदावरीच्या तीरी वसाहत करून राहू लागले, तेव्हा प्रयागचे नाव 'प्रतिष्ठान' हे त्यांनी गोदातीरावरील प्राचीन नगराला दिले. 'पैठण' हा शब्द 'प्रतिष्ठान' शब्दाचा अपभ्रंश होय, असे व्युत्पत्तिशास्त्राने सांगता येते.

आपण इतिहासपूर्वकालातून प्राचीन इतिहासाच्या अंधुक प्रकाशात शिरतो तेव्हा इ.स.पूर्वच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकात वैदिक धर्माचे पुरस्कर्ते सातवाहन राजे महाराष्ट्रात प्रथम राज्य स्थापून अश्वमेधादि अनेक यज्ञ करीत राज्यविस्तार करताना दिसू लागले. त्याच सुमारास झालेल्या मौर्यसम्राट अशोकवर्धनाचे संबंधही महाराष्ट्रात पोहोचलेले आपण पाहतो. परंतु महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक इतिहासात मौर्यांचा महत्त्वाचा हात होता, असे म्हणता येत नाही. सातवाहनांच्या पुराणप्रसिद्ध राजवंशाच्या राजकीय कारकीर्दीचा प्रारंभ महाराष्ट्रात झाला, याची साक्ष सह्याद्रीतील नाणेघाटात तपशीलवार मिळते. सातवाहनांनी वैदिक संस्कृतीचे पोषण महाराष्ट्रात केले. त्यानंतर वाकाटक व गुप्त यांच्या प्रभावाखाली महाराष्ट्रातील वैदिक संस्कृतीचे पोषण झाले.

नंतर बौद्ध व जैन, शैव व वैष्णव यांचाही खोल प्रभाव महाराष्ट्रातील संस्कृतीवर पडला, तरी वैदिक संस्कृती टिकून राहिली. महाराष्ट्र हा कायमचा वेदस्थानच बनून राहिला. गृहस्थाश्रमी परंतु अल्पसंतुष्ट पुरोहितवर्ग महाराष्ट्रातील नद्यांच्या तीरांवर वेदपारायण करीत शब्दब्रह्माच्या गंभीर नादात तल्लीन होऊन आतापर्यंत कायम राहिला. महाराष्ट्रात जितक्या वैदिक शाखांचे ब्राह्मण आजपर्यंतही टिकाव धरून राहिलेले आढळतात, तितक्या वैदिक शाखांचे ब्राह्मण दुसऱ्या कोणत्याही भाषिक प्रदेशांत सापडत नाहीत. संपूर्ण वेद कंठस्थ करून वेदपारायण करणाऱ्या, षडंगे जिव्हाग्री नाचविणाऱ्या व गरिबीतही समाधान मानणाऱ्या वैदिक गृहस्थांची परंपरा हजारो वर्षे येथे आजपर्यंत टिकून राहिली. यापुढे काय होणार हे मात्र सांगणे कठीण आहे.

बौद्ध, जैन, शैव व वैष्णव या धर्मांनी धार्मिकदृष्ट्या सर्व वर्णांना समान मानून येथील माणसांच्यामधील कलेची सर्जनशक्ती अधिक जागृत केली. त्या जागृतीने उद्बोधन पावलेली मानवी सामर्थ्ये स्थापत्यकलेची चिरस्थायी स्मारके निर्माण करून

विराम पावली. ती सामर्थ्ये येथील सामान्य माणसांच्यामध्ये समाजातील खालच्या वर्गापर्यंत संचरली होती. येथील पाथरवटांनी पर्वतांचे कडे व प्रचंड खडक फोडून त्यांच्या अंतरंगात चिरस्थायी सुंदर मंदिरे उभारली. भागवतधर्मी व बौद्धधर्मी राजांच्या लक्ष्मीने वरदहस्त त्यांच्यावर ठेवला होता, म्हणूनच ही विशाल स्थापत्यकला जन्मली, हे खरे आहे. परंतु लक्ष्मीच्या केवळ वरदहस्ताने कलेचा जन्म होत नाही. त्याकरिता नैतिक भावनांची व स्फूर्तींची भांडारे खोलावी लागतात. बुद्धाच्या संदेशाने आणि शैव व वैष्णव धर्मांच्या आदेशांनी विश्वव्यापी अनुकंपा व शांती अनुभवणारी कलाकारांची हृदये या स्फूर्तींची भांडारे बनली होती. अजंठा, वेरूळ, कार्ला, भाजे, जुन्नर, मुंबईची हस्तिगुंफा येथील विहार ही अशा विश्वव्यापी नैतिक अनुभवाने भरलेल्या मुनींच्या व भक्तांच्या हृदयांची प्रतीके होत. अनंत विश्वाच्या चैतन्याशी तन्मय झालेल्या अंत:करणाचे गाभार म्हणजेच वेरूळ, कार्ला, अजंठा व हस्तिगुंफा येथील शैव व बौद्ध मंदिरे होत. उत्पत्ती, स्थिती व लय या विश्वचैतन्याच्या तीन बाजू हस्तिगुंफेतील त्रिमूर्तीत दिसतात. विश्वाची धारणा करणारे स्थिर नियम म्हणजेच हस्तिगुंफेतील दृढ व स्थिर स्तंभ होत. सामाजिक शक्ती विध्वंसक न होता रचनात्मक कार्यात परिणत झाल्याची ही चिरस्मारके होत.

प्राचीन महाराष्ट्रात संस्कृतच्या प्रौढ वाङ्मयकालात संस्कृत व प्राकृत भाषांना महाराष्ट्रातील साहित्यकारांनी एक स्वतंत्र सुंदर शैली प्राप्त करून दिली. ती शैली 'वैदर्भी रीती' म्हणून संस्कृत साहित्यशास्त्रात निर्दिष्ट केली आहे. भर्तृहरीने वैदर्भी रीतीत काव्य रचणाऱ्या कवींचा महिमा एका श्लोकात सूचित केला आहे; तो असा : ''समोर गायन गायले जात आहे, बाजूला दाक्षिणात्य सरस कवी आहेत, पाठीशी चवऱ्या ढाळणाऱ्या रमणींच्या कंकणांचे नाद होत आहेत, असे असेल तरच संसाररसाच्या आस्वादावर लंपट हो! नाहीतर, हे मना! मोठ्या साहसाने निर्विकल्प समाधीत दडी मार.'' गुणाढ्याची बृहत्कथा इसवी सनाच्या पूर्वीच पैठण येथे तयार झाली होती. त्या बृहत्कथेची कथा फारच मनोवेधक व सूचक आहे. तुकारामाची गाथा पाण्यात तरल्याची कथा जशी वाङ्मयमूल्याचा महिमा सूचित करते, तशीच गुणाढ्याचीही कथा आहे.

बृहत्कथा गुणाढ्याने पैशाची भाषेत रचली. पैशाची भाषा म्हणजे हिंदुस्थानच्या वायव्यप्रांताची प्राचीन प्राकृत भाषा होय. ही पैठण येथे गोदावरीच्या तीरी गुणाढ्याने रचली. त्यावेळी पैठण सातवाहनकुलाची राजधानी होती. सिंहासनस्थ राजाने या कवीची व कथाग्रंथाची उपेक्षा केली. त्यामुळे कवी वैतागला. आपल्या गुणाला

किंमत नाही असे गुणाढ्याला वाटले. या ग्रंथाचे सात लाख श्लोक होते. तो कवी ही कथेची पोथी घेऊन जंगलात गेला. विमनस्क होऊन निराशेने या पोथीचे एकेक पत्र काढून अग्नीत टाकू लागला. धूर व जाळ होऊ लागला. एकेक पान जळत असता त्याच्या डोळ्यांतून अश्रू गळू लागले. त्या वनातील मुके पशू व पक्षीदेखील हे पाहून गहिवरून गेले. त्यांनाही अन्नपाणी गोड लागेनासे झाले. रोज गुणाढ्य आपल्या पोथीची पाने जाळीत व रडत बसे. तो सुकत चालला. त्याच्याबरोबर वनातील प्राणीही सहानुभूतीने शोकाविष्ट होऊन सुकू लागले. त्या प्राण्यांची शिकार राजाच्या नित्य भोजनात असे. राजाला ते भोजन नीरस वाटू लागले. त्याने चौकशी केली. तेव्हा कळले की, वनातील प्राणीच सुकून चालले आहेत. राजाने कारणाचा तपास लावला. त्याला पश्चात्ताप झाला. गुणाढ्याला परत बोलाविले. परंतु तोपर्यंत सहा लक्ष श्लोक जळून एक लक्षच शिल्लक राहिले होते.

यानंतरचा काळ भारतीय प्रादेशिक भाषांच्या प्रगल्भदशेच्या आरंभाचा काळ होय. बंगाली, हिंदी, गुजराती, मराठी इत्यादी भाषा लेखनिविष्ट व ग्रंथनिबद्ध होण्याचा हा प्रारंभकाल होय. उत्तरेकडून व दक्षिणेकडून दोन्ही बाजूंनी भक्तिधर्माचे प्रवाह महाराष्ट्रात येऊन यावेळी एकत्र मिसळले. पंढरपूरचा विठ्ठल या दोन प्रवाहांचे संगमस्थान बनला. मराठी भाषेची वेल या भक्तिधर्माच्या रसाने पोषण पावू लागली. या वेलीवर प्रथमच काव्यवाङ्मयाची पुष्पे बहरून डोलू लागली. विवेकसिन्धु व अनुभवामृत यांच्या सिंचनाने भक्तिपुष्पांना अधिकच बहर आला. तत्त्वज्ञानाची बौद्धिक प्रमेये ज्ञानेश्वरमहाराजांच्या योगाने काव्यात्मक बनली. महाराष्ट्रात भक्तिधर्माचे मुख्य अधिष्ठान भगवद्गीता बनली. हे महाराष्ट्राचे इतर प्रांतांच्यापेक्षा वेगळे असलेले वैशिष्ट्य होय. गेल्या ६०० वर्षांत भगवद्गीतेची भाष्ये व टीका मराठीत जितक्या झाल्या, तितक्या इतर कोणत्याही प्रांतांच्या भाषांत झाल्या नाहीत. त्यामुळे येथील भक्तिधर्म व भक्तिभाव दैवी शृंगाररसापासून अलिप्त राहिला. द्रविडपरंपरेतील भक्तिधर्माचाही अप्रत्यक्ष प्रभाव यास कारणीभूत झाला असावा. उत्तरप्रदेशात, बंगालात व गुजरातेतही या भक्तिधर्माचा उदय त्याचवेळी झाला होता. परंतु महाराष्ट्राने त्याचा अंगीकार फार सावधपणाने व विवेकपूर्ण रीतीने केला. उत्तरप्रदेश, बंगाल व गुजरात येथील वैष्णवधर्माचा भक्तिरस राधामाधवांच्या विलासात समरस झाला आहे. तेथील यतीदेखील राधारमणगोविंदात रत झाले. परंतु महाराष्ट्रातील गृहस्थाश्रमी संतांसाठी द्वारकेचा राणा झालेला गोपाल राधेला बाजूस सोडूनच महाराष्ट्रात आला आणि पंढरपुरात भीमेच्या तीरावर एकटा भक्तांची वाट पाहात उभा राहिला.

इंद्रियलालसेचा लेश अप्रत्यक्षही सहन न करणाऱ्या भागवतधर्माची पताका महाराष्ट्राने उभारली. या भागवतधर्माने कौटुंबिक जीवनास शुद्ध बनविले. या भागवतधर्माने देवभक्तीच्या मिषात मिरवणाऱ्या जार– शृंगाराची प्रतिष्ठा मानली नाही. ''छातीमध्ये छिनाल गाणे'' छाती काढून नाचू नये म्हणून ते आतल्या आत जिरवून टाकणाऱ्या जिवंत धर्माची निष्ठा भगवद्गीतेच्या अधिष्ठानावर वाढल्यामुळे मध्ययुगीन महाराष्ट्राचे नैतिक पुनरुज्जीवन झाले.

ज्ञानेश्वरांपासून टिळकांपर्यंत मराठीवाङ्मय भगवद्‌गीतेच्या चिंतनात वाढले. श्रीमद्‌भागवतालाही महत्त्व पूर्वी आले होते, परंतु त्यातील कृष्णचरित्र सांगणारा दशमस्कंध गौण ठरला. एकादशस्कंधावरच एकनाथी भागवत उभे राहिले. भगवद्गीतेच्या खालोखाल रामायणाचा महिमा मराठी भाषेत गाजला. मराठीत छंदोबद्ध रामायणे अनेक आहेत, परंतु तुलसीदासांच्या 'रामचरितमानसा'ची बरोबरी करणारे रामायण मात्र मराठीत होऊ शकले नाही. भगवद्गीता व महाभारत यांनीच महाराष्ट्र –मनावर चिरंतन विजय मिळविला. ''**दिनानाथ हा राम कोंदडधारी । पुढें देखतां काळ पोटीं थरारी । जनां वाक्य नेमस्त हें सत्य मानी।**'' अशी नैतिक शौर्याला आव्हान देणारी रामोपासना रामदासस्वामींनी देशात फैलावून दिली, हे जरी खरे असले तरी रामदासस्वामींचा दासबोध महाभारताच्याच प्रभावाने प्रभावित झाला आहे. त्यांतील राजकारण म्हणजे शांतिपर्वातील राजनीतिपर्व होय. त्यात इह आणि परत्र किंवा प्रपंच आणि परमार्थ या दोहोंनाही महत्त्व देण्याची कल्पना महाभारतावरून आलेली आहे. विदुरनीतीच्या छटा दासबोधावर स्पष्ट उमटल्या आहेत. त्यांतील उत्तमपुरुषाची लक्षणे चांगल्या सद्‌गृहस्थांचा आदर्श दाखवितात.

**आधुनिक मराठी वाङ्मयाची पार्श्वभूमी**

भारतीय संस्कृतीने मध्ययुगातून नवयुगात प्रवेश ब्रिटिशांच्या राज्यस्थापनेनंतर केला. ब्रिटिश राज्याच्या स्थापनेनंतर लगेच पाश्चात्त्य विद्येचेही शिक्षण सुरू झाले. बंगालमध्ये व मुंबई शहरात ब्रिटिशांचे राज्य अठराव्या शतकाच्या अखेरीस स्थिर झाले. त्यामुळे तेथे पाश्चात्त्य विद्याविभूषितांची पिढी प्रथम निर्माण झाली. मराठी राज्याचा अंत एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी इ. स. १८१८ मध्ये झाला. मराठी राज्य अस्ताला गेल्यावर १८५७च्या बंडापूर्वीच पाश्चात्त्य बौद्धिक शिक्षणाचा प्रभाव महाराष्ट्राला जाणवू लागला. पाश्चात्त्य विद्यांचे शिक्षण घेतलेल्या माणसांची महाराष्ट्रातील पहिलीच पिढी, अनेक युगांच्या दीर्घकालीन निद्रेतून जागृती यावी त्याप्रमाणे, चकित होऊन भोवताली पाहू लागली. अनेकांनी प्राप्त परिस्थितीचे धैर्याने स्वागतच केले.

तळमळीने व आतुर जिज्ञासेने स्वत:च्या सांस्कृतिक जीवनाच्या दु:स्थितीवर, राजकीय पतनावर व विजयीं पाश्चात्त्य संस्कृतीवर नवशिक्षितांची दृष्टी फिरू लागली.

लोकहितवादी देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर, ज्योतिराव फुले, न्या. रानडे, न्या. तेलंग, डॉ. भांडारकर इत्यादी मंडळी क्रमाने उदयाला आली. भारतीय धार्मिक संस्कृती व समाजव्यवस्था जीर्णावस्थेला पोहोचली आहे. तिच्यातील चैतन्य मंदावले आहे. असा प्रत्यय या समालोचकांना आला. सगळेच तपासले पाहिजे व सगळेच बदलले पाहिजे अशी भावना झालेले अनेक विचारवंत, सामाजिक व धार्मिक सुधारक महाराष्ट्रात पुढे आले. पाश्चात्त्य शिक्षणामुळे व पाश्चात्त्य संस्कृतीच्या संघर्षामुळे समीक्षापर दृष्टिकोन लाभला. परंपरा, रूढी व धर्मग्रंथ यांचे दैवी प्रामाण्य स्वीकारणाऱ्या श्रद्धायुगाचा अंत त्यामुळे समीप आला. समीक्षाप्रधान युग अवतरले. हे नवयुग प्रथम बंगालमध्ये प्रभावी होऊ लागले. नंतर बंगालमधील नवयुगाने महाराष्ट्रातील नवचेतनेला साथ दिली.

महाराष्ट्रातील नवचेतनेला एका बलवत्तर व हृदयविदारक ऐतिहासिक घटनेमुळे एक अधिक विशिष्ट अर्थ आला. ही घटना कट्यारीप्रमाणे हृदयात सलू लागली. ज्यांचे मन सामर्थ्यशाली होते त्यांच्या हृदयात या सलणाऱ्या कट्यारीमुळे उद्‌भूत झालेली वेदना विचारशक्तीचा पुरवठा करू लागली. पहिल्या पिढीचा अभिमान हृदयात भरलेल्या या वेदनेने खंडित झाला होता. कारण मराठी राज्याचा पराभव झाल्यामुळेच ब्रिटिश राज्य भारतात स्थिरावू लागले होते. या पराभवाच्या जाणिवेची व्यथा समालोचनास प्रवृत्त करती झाली. भारतीय जीवनाचा व इतिहासाचा अभ्यास करून काय निष्कर्ष निघतो, हे ही पिढी पाहू लागली. मोठीच प्रतिक्रिया निर्माण झाली. भूतकाळाचा अर्थ लावून आता पुढे गेले पाहिजे, सर्वच सुधारले पाहिजे, पाश्चात्त्यांचे अनुकरण केले पाहिजे, अशी एक प्रतिक्रिया होती. दुसरी भूतकाळाचे समर्थन करणारी प्रतिक्रिया होती.

या नव्या प्रतिक्रियेतून आधुनिक महाराष्ट्र तयार झाला. मती व कृती किंवा मनन व आचरण यांना नवेच रूप आले. नव्या प्रकारच्या मननाने आधुनिक वाङ्मयाची चळवळ निर्माण झाली व नव्या प्रकारच्या आचरणाने धार्मिक, राजकीय व सामाजिक चळवळ निर्माण झाली. विचार व क्रिया यांचा या चळवळीत घनिष्ठ संबंध राहिला. याचा अर्थ असा नव्हे की, नुसती नवी कृती करणारी माणसे व केवळ नवे वाङ्मय निर्माण करणारी माणसे त्यात नव्हती. केवळ कृतीपर आणि केवळ वाङ्मयपर अशी माणसे समाजात पुष्कळ असतात. मती व कृती यांचा ज्यांनी उत्कृष्ट मिलाफ

साधला आहे, अशी माणसे अत्यंत थोडी व निवडकच असतात. हेच नव्या युगाचे बलशाली प्रवर्तक होत. इतिहास कित्येकवेळा असेही दाखवितो की, त्या त्या युगाचा किंवा कालखंडाचा प्रतिनिधिभूत द्रष्टा, कवी, वाङ्मयकार, तत्त्ववेत्ता, कलाकार, लोकनेता वा क्रांतिकारक एकच असतो. तसे अनेक असले तरी त्यांच्यात तरतमभाव पुष्कळच असतो. ते युग किंवा कालखंड विशिष्ट प्रकारच्या शक्तीचे निदर्शक असले तरी काही थोड्या व्यक्तींतच त्या सामाजिक शक्तीचा प्रभाव उन्नत स्वरूपात प्रकट झालेला असतो. म्हणून व्यक्तिनामांनी विशिष्ट कालखंडाचा किंवा विशिष्ट युगाचा केलेला निर्देश शास्त्रदृष्ट्या युक्त ठरतो.

महाराष्ट्रातील वाङ्मयीन चळवळ आणि राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळ या एकरूप झालेल्या किंवा एकमेकांत गुंतलेल्या अशाच दिसतात. त्यांच्या एकमेकांच्यावर क्रिया-प्रतिक्रिया सतत होत असलेल्या दृग्गोचर होतात. कित्येक वेळा राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळीचे स्वरूप वैचारिक अतएव वाङ्मयीनच प्रामुख्याने दिसते. निदान विचार हा त्याचा महत्त्वाचा भाग दिसतो व विचाराचा प्रसार करण्याचेच पर्यवसान आचार असे दिसते.

लोकहितवादी गोपाळराव देशमुख व ज्योतिराव फुले हे दोघे धार्मिक व सामाजिक सुधारणेचा विचार प्रवृत्त करणारे ह्या नवयुगाचे पहिले पुरुष होत. लोकहितवादींचा विचार व फुले यांचा आचार सामर्थ्यशाली होता. अवनत व दलितवर्गाची प्रक्षुब्ध जाणीव व मूलगामी सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा यांचे भारतातील पहिले प्रतीक फुले होत. मध्यमवर्गीय सुधारणेची चळवळ लोकहितवादींच्या वैचारिक लेखनापासून सुरू झाली. धार्मिक व सामाजिक सुधारणांच्या विचारांचा विकास ब्रह्मसमाजाच्या महाराष्ट्रातील शाखेने केला. न्या. रानडे, डॉ. भांडारकर इत्यादिकांच्या प्रयत्नांनी या चळवळीला रूप आले. या चळवळीमुळे ज्या क्रिया व प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या, त्यातच महाराष्ट्रातील आधुनिक वाङ्मयाची चळवळ वाढीस लागली.

नवे राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार व नवी वाङ्मयीन चळवळ यांना निर्णायक रूप येण्यास महाराष्ट्रात चिपळूणकर, आगरकर व टिळक या तीन व्यक्ती सर्वांत अधिक कारणीभूत झाल्या. महाराष्ट्रातील वैचारिक व वाङ्मयीन चळवळींची दिशा या तीन व्यक्तींच्या मुळेच निश्चित झाली. लो. टिळकांच्या योगाने तर सर्व भारतातील गेल्या शतकातील राजकीय चळवळीला एक विशिष्ट वळण लागले व तेच शेवटपर्यंत टिकले. म्हणून चिपळूणकरांचे, आगरकरांचे व टिळकांचे पृथक्

वैशिष्ट्य काय होते हे संक्षेपाने दिग्दर्शित करणे, वाङ्मयीन इतिहासाचा अर्थ ठरविण्यास अत्यंत उपयुक्त होईल.

आधुनिक मराठीचा गद्याचा आकार चिपळूणकरांनी निर्माण केला. विचारभाषेचे अभिजात गद्य मराठीत पूर्वी नव्हते. नव्या प्रकारच्या विचाराला नव्या प्रकारची भाषा लागते. ब्रिटिश राजवटीच्या पूर्वी मराठीला जे वळण होते ते पद्य व काव्य यांनाच उपयुक्त होते. त्यातील शैली, वाक्प्रचार व आविष्करणाच्या तऱ्हा वैचारिक गद्याला अनुकूल नव्हत्या. तेव्हा गद्य बाल्यावस्थेत होते. घरगुती व सार्वजनिक व्यवहाराची व देवघेवीची भाषा एवढेच गद्याचे स्वरूप होते. ते तुटपुंजे गद्य शुद्ध विचार व्यक्त करण्यास समर्थ नव्हते. विविध, तारतम्ययुक्त व गुंतागुंतीच्या कल्पनांचे तार्किक सांधे जुळविणारे गद्य विचारभाषेत लागते, तसे ते नव्हते. विचार व्यक्त करणारे विद्येचे गद्य मराठीत व इतर प्रादेशिक भाषांमध्ये ब्रिटिश अमदानीपर्यंत लिहिले गेले नव्हते. संस्कृत हीच तोपर्यंत विद्यांची विचारभाषा होती. वेदान्त आणि पौराणिक कथा यांच्या भोवती लोकभाषांचे भ्रमर भ्रमत होते. आणि हे भ्रमर पारलौकिक कथांच्या व पारमार्थिक भावनांच्या मधुपानातच गुंगले होते. त्यामुळे विचारभाषा ही पदवी भारतीयांच्या लोकभाषांना लाभू शकली नाही. बौद्धिक व वैज्ञानिक विचारांचा पुरवठा करणारे विषय, म्हणजे तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, साहित्यशास्त्र, वैद्यक, अर्थशास्त्र, गणित, ज्योतिष इत्यादी विषय, संस्कृतमधून लोकभाषांच्यामध्ये कधी चांगले अवतरले नाहीत व तसा विशेष प्रयत्नही कधी झाला नाही. त्या दरिद्री राहिल्या.

लोकभाषांना विचारभाषा ही पदवी ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यानंतर यावयास लागली. गद्य हाच आकार विचारभाषेला अत्यंत अनुरूप असतो. पद्याची किंवा छंदांची बंधने विचाराच्या अनिरुद्ध संचाराला व सर्वांगीण आविष्काराला पदोपदी अडथळा आणीत असतात. पद्य हे भावूकतेचे एक अंग आहे. भावूक आकर्षणाची फिकीर शुद्ध विचाराला नसते. पद्यात्मकता विचाराच्या वास्तविक कार्याच्या दृष्टीने वाह्यात बाब ठरते. बौद्धिक संगती साधण्याच्या उद्देशाने शब्द, वाक्यखंड, वाक्य आणि वाक्यमालिका यांचा विस्तार करणारी भाषा म्हणजे गद्य होय. गद्य हे विद्यांचे आकलन करून देण्याचे मुख्य साधन होय. पद्यापेक्षा गद्याचे कार्य विविध व विस्तृत असते. मननपरतेशी व मानवी सफल कृतीशी गद्य अत्यंत निगडित असते.

चर्चा करण्यास पद्य असमर्थ असते. मनाला रंजनापेक्षा विवेकतेची अधिक गरज आहे. पद्याच्या योगाने साधकबाधक विवेचन व प्रमाणांची योग्य छाननी करण्यास अडचणी येतात. पद्य हे विवेचनात अडखळते व कोलमडून पडते. विवेचनाची

ताकद न सांभाळता आल्यामुळे ते क्षीण व निस्तेजही बनते. बौद्धिक विचारांच्या उत्तुंग शिखरावर चढत असता ते दमते. तसे गद्याचे नाही. ते कोठेही अनिर्बंध विहार करू शकते. हेगेल म्हणतो की, गद्य हे पद्यापेक्षा उच्चतर अवस्थेस पोहोचलेले भाषेचे रूप होय. बौद्धिक संस्कृतीची सफल साधना गद्यामुळेच घडू शकते.

विचारसंपन्न अशा पाश्चात्त्य गद्याचा आदर्श पुढे ठेवून मराठी गद्याचा अवतार होऊ लागला. निबंध हा गद्याचा एक सुंदर प्रकार होय. निबंधांत विचारांच्या गुणोत्कर्षाबरोबरच कवितेचेही काही सौंदर्यगुण उतरू शकतात. नियतकालिके, मासिके व इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद अशा रूपाने मराठीतले पहिले आधुनिक गद्य निर्माण होऊ लागले. इंग्रजीमधील निबंधवाङ्मयातील सुप्रसिद्ध निबंधांच्या तोडीचे निबंध निर्माण होण्यास पन्नास वर्षे उलटून जावी लागली.

इ. स. १८७४ साली महाराष्ट्रात कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे पहिले थोर निबंधकार झळकू लागले. तोपर्यंत मराठी भाषा परप्रत्ययी होती. मराठी भाषेचे निजरूप विचारसमर्थ आहे, अशी ग्वाही तत्पूर्वीचे वाङ्मय देऊ शकत नव्हते. मराठी सरस्वती आरोग्यसंपन्न, तरतरीत, मदनमञ्जरी, सुंदर चिरीदार कुंकुमाने शोभणारी, महाराष्ट्राच्या नव्या प्रपंचास उचलून धरण्यास समर्थ व दक्ष युवती आहे, असे निबंधमालाकारांच्या लेखणीनेच प्रथम दाखवून दिले. त्यांनी इंग्रजी भाषेची चांगली सेवा केली होती. मराठीस अनुरूप अशी नवी घडण कोणती हे त्यांना नीट दिसले.

इंग्रजी भाषेची वाक्यरचना विचारक्रमाला धरून, वैचारिक तत्त्वांना अनुसरून विकास पावलेली आहे. तिचे स्वत:चे एक वेगळे तर्कशास्त्र आहे. तो रचनाक्रम जसाच्या तसा मराठीशी आत्मसात करणे असंभवनीय होते. मराठीचे व्याकरण व तिचा स्वभावधर्म न बिघडविता इंग्रजी रचना अंगीकारणे जरूर होते, तरी अशक्य होते. इंग्रजी रचना अंगीकारण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला, त्यांना पूर्ण अपयश आले. कारण त्यामुळे वाक्य बोजड व हेंगाडे बनते.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी भाषेच्या स्वभावास अनुरूप अशीच मोठी वाक्यरचना शोधून काढली. गुंतागुंतीची वाक्यरचना हे प्रगल्भ, संपन्न व सूक्ष्म विचारांचे एक महत्त्वाचे साधन आहे. अशा वाक्यरचनेबद्दल अनादर असणे हे बुद्धिदौर्बल्याचे लक्षण आहे. भाषेत मोठा विचार निर्माण व्हावा, अशी आशा अशा दुर्बळांच्या योगाने दुरावते. निबंधमालाकारांनी मोठ्या वाक्यांची रचना करण्यात यश मिळविल्यामुळे मराठीला स्वत:चे वैचारिक राज्य निर्माण करण्याची योग्यता आली. म्हणूनच 'मराठी भाषेचे शिवाजी' ही पदवी त्यांनी स्वत:च स्वीकारली. त्यांचा हा

अभिमान यथार्थ ठरला. अशा मराठी भाषेच्या साधनांमुळेच पाश्चात्त्य विद्येचे वज्र हस्तगत करता येईल, अशी आशा आता सफल होणे शक्य आहे. ज्ञानाचे असे मोठे साधन निर्माण झाल्यामुळेच राष्ट्र निर्माण करता आले.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी विचारसाधन बनेल, अशी मराठी भाषा निर्माण केली; मराठी भाषा सकस परंतु पडिक भूमीप्रमाणे आहे, ती कसली तर फलसमृद्ध होईल असा विश्वास निर्माण केला. त्यांनी विचारभाषा निर्माण केली खरी, परंतु तेवढ्याने समृद्ध विचार उत्पन्न होत नसतो. समृद्ध विचाराचे जीवित विचारस्वातंत्र्याच्याच वातावरणात राहू शकते. विचारस्वातंत्र्याला अनुकूल असलेली अशी समाजसंस्था उत्पन्न झाल्याशिवाय विचारस्वातंत्र्याचे वातावरण खेळत नसते. रूढिनिष्ठ समाजसंस्था विचारस्वातंत्र्यास मारून टाकते. अशा प्रकारची दृढ भावना मालाकारांच्या ठिकाणी नव्हती. अशा प्रकारची भावना हेच बुद्धिवादाचे मूळ होय. बुद्धिवादाचा पुरस्कार करणारी निराळी व्यक्ती महाराष्ट्रात यानंतर पुढे आली. नुसते भाषेचे शरीर काय उपयोगी? विचारस्वातंत्र्य हा तिचा आत्मा होय. मराठी भाषेत विचारस्वातंत्र्याचे तत्त्व प्रिन्सिपॉल कै. गो. ग. आगरकर यांनी ओतले. सामाजिक परिवर्तनाच्या व सुधारणेच्या उत्कंठेने प्रेरित होऊन त्यांनी अंधश्रद्धेवर, विषम व अन्यायी रूढींवर, वैचारिक आघात सुरू केले. आगरकर हे पाश्चात्त्य उदारमतवादाचे पहिले मोठे भारतीय प्रतिनिधी होत. समाज बदलण्याची वासना क्षुब्ध करणारे, व्यापक मानवी सहानुभूतीने तळमळणारे आणि समतापूर्ण व रम्योदात्त ध्येयसृष्टीकडे आशापूर्ण नेत्राने पाहणारे मराठी वाङ्मय निर्माण होण्याची वैचारिक पार्श्वभूमी आगरकरांनी रचली. या पार्श्वभूमीवर प्रखर वैचारिक तेजाने तळपणारी आगरकरांची व्यक्ती उभी राहिलेली दिसते. जीवननिष्ठ नवे साहित्य निर्माण करण्याचा काळ आगरकरांच्या नंतर आला. त्या काळाचे कर्तृत्व आगरकरांकडे जाते. दारिद्र्य, धिक्कार व सामाजिक बहिष्कार यांच्या योगाने त्यांच्या आयुष्याचा उन्हाळा झाला होता. त्यातच शांत राहून आपले सर्व आयुष्य आगरकरांनी समाप्त केले. या जीवनयज्ञातून जे स्फूर्तीचे तेज निर्माण झाले त्यामुळे मराठी सारस्वताच्या वृक्षास आधुनिक वाङ्मयाच्या टवटवीत शाखा फुटल्या.

सामाजिक विषमतेवरही आगरकरांनी जोराचे प्रहार केले आहेत, ''ज्या देशात ही असमता वाढत जाऊ लागेल... त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला असे समजावे'', असा सिद्धांत सांगून पुढे ते समतेची व्याख्या सांगतात : ''विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळी प्रत्येक देशात तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात ते कायमचे नव्हेत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार,

उपभोग आणि काम ही सम प्रमाणाने करावी लागून साऱ्यांच्या सुखोपभोगाची इयत्ता सारखी होत जाणार आहे व जो जो ती तशी होत जाईल तो तो खरी उन्नती होऊ लागली,'' असे म्हणता येऊ लागेल.

कै. आगरकरांनी पाश्चात्त्य देशातील मानवतावादाचे विचार प्रथम मराठी भाषेत व्यक्त केले. समाजसुधारणेच्या चळवळीला आवश्यक असलेला ध्येयवाद त्यांनी दिला. त्यामुळे वर्णभेद व जातिभेद हिंदुसमाज संस्थेतून नष्ट करण्याच्या विचाराला तात्त्विक उपपत्तीचा आधार मिळाला व स्त्रियांचे समाजातील अधिकार वाढविले पाहिजेत याला तात्त्विक पाठबळ निर्माण केले. या सर्व व्यापक विचारांच्या मुळाशी भारत राष्ट्राबद्दलची भावना हा स्थायी भाव होता, असे अत्यंत जवळून पृथक्करण केल्यास कळून येते. राष्ट्र व धर्म यांच्या मर्यादेत न मावणारा त्यावेळचा सर्व पुरोगामी विचार जरी होता तरी त्याच्या मुळाशी सूक्ष्म निरीक्षणांती हाच स्थायी भाव सापडतो. राजा राममोहन रॉय यांच्या आत्म्याचे पोषण करणाऱ्या विचारांच्या अंतर्भागी औपनिषद् ब्रह्मविचाराची बैठक होती. न्या. रानडे यांच्या अंत:करणाच्या तळाशी संतवाङ्मय बसले होते. चिपळूणकर तर उघड उघड सनातनी राष्ट्रवादाचे पहिले उपासक होते. आगरकरांच्याही बाबतीत यासंबंधी शंका घेतल्यास निर्णायक प्रमाण सापडू शकते. आगरकर सुधारक काढण्याचा हेतू या निबंधात म्हणतात.

''येथे एवढेच सांगितले पाहिजे की, मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडता या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे.'' ''भारतीय आर्यत्वाच्या वृक्षाला खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे. असे केले तरच त्याचे पूर्व स्वरूप नष्ट न होता त्यापासून नूतनशाखावृत वृक्ष अस्तित्वात येईल.'' ''इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार'' या प्रसिद्ध निबंधांत आगरकर म्हणतात की, ''हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढे काही खरोखर निर्दोष व हितावह आहे, त्याला कशाचीही भीती नाही. मनु आणि पराशर यांच्या आधाराशिवाय हे अढळ राहणार आहे. पण जे काही सदोष व अहितकारक आहे, निदान सध्याचे स्थितीत ज्याच्या अपकारिकत्वाबद्दल संशय नाही ते सारे पाश्चात्त्य ज्ञानकुंडात जळून खाक होणार!'' हे त्यांचे उद्गार त्यांच्या अंतर्मनातील राष्ट्रीय परंपरेने निर्माण केलेल्या उन्नत अहंकाराची खूण आहे. ज्योतिबा फुले विश्वव्यापी मानवतावादाचे महाराष्ट्रातील अग्रदूत होत. त्यांच्यासुद्धा अंतर्मनातून या उन्नत अहंकाराने पुरा पाय काढला नव्हता. त्यांच्या

सत्यशोधक समाजाच्या चळवळीत वेदोक्त संस्कारांचे कर्मकांड चालविणारे पुरोहित त्यांनी तयार केले होते.

राष्ट्रीयत्वाची जोपासना व वाढ करण्याचा हेतू यामुळे बळावला. फुले, रानडे, भांडारकर व आगरकर यांच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेचे जबरदस्त प्रतिकार करणारे नेतृत्व राजकीय व राष्ट्रवादी विचारांच्या नेत्यांना यामुळेच प्राप्त झाले. चिपळूणकर व टिळक हे या विरोधक प्रवृत्तीचे अध्वर्यू होत. फारच मोठा वैचारिक संग्राम यांच्या योगाने निर्माण झाला. भूतकाळाचे व परंपरेचे समर्थन करणाऱ्या चळवळीचे स्फुरण वा उत्तेजन यांच्यापासून प्राप्त झाले. याचा अर्थ असा नव्हे की, हे विचारनेते सामाजिक व धार्मिक परंपरागत अंधश्रद्धेचे कट्टर समर्थक होते. चिपळूणकरांनी पाश्चात्त्य विद्यांची भांडारे मोकळी करावी व लोकभ्रमांचा उच्छेद करावा, असे मोठ्या पल्लेदार व ओजस्वी भाषेने प्रतिपादिले. टिळकांनी समाजसुधारणेच्या चळवळीला पुढे ढकला एवढेच सांगितले. त्यांच्या समाजसुधारणाविषयक विचारांचा योग्य तपशील मात्र कोठेच सापडत नाही. चातुर्वर्ण्याची टिळकांनीच तरफदारी केली आहे; जातिभेदाचाही क्वचित् पाठपुरावा केला आहे. परंतु भारतीय अध्यात्मवादाला त्यांनी नवे वळण दिले; आधुनिक व्यापक मानवधर्म गीतारहस्याच्या योगाने भारतीय अध्यात्माच्या गाभ्यात थोर विचारकौशलाने व गंभीर पांडित्याने समाविष्ट केला. आजच्या मानवी संस्कृतीची दृष्टी परलोकाकडून वळली असून हेच जग सुधारून मानवी वस्ती बिनधोक बनावी अशा भावनेने भरली आहे. टिळकांच्या गीतारहस्याने कर्मयोगाचे प्रतिपादन करून या भावनेला पाठबळ दिले आहे. टिळकांनी केलेल्या संन्यासयोगाच्या निषेधात याच जगात माणसाने नैतिक जीवन जगण्यात साफल्य मानावे, ही मनीषा दडलेली दिसते.

पहिल्या तीन पिढींतील सामाजिक समता स्थापन करण्याच्या ध्येयाची धार्मिक व सामाजिक सुधारणेची चळवळ अधिक तपशिलांत शिरून रुजवण्याचे कार्य चालू परिस्थितीत महाराष्ट्रातील तीन मोठ्या संस्कृत पंडितांनी केले. ते म्हणजे गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती, श्रेष्ठ धर्मशास्त्रेतिहासकार डॉ. पांडुरंग वामन काणे व भारतीय ज्योतिषशास्त्राचे महापंडित डॉ. के. ल. दप्तरी हे होत. अव्वल दर्जाची भारतीय धार्मिक व सामाजिक संस्थांची व विचारांची मीमांसा, हिंदुधर्माच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे विवरण आणि मूलभूत तत्त्वांचा बुद्धिवादी परामर्श डॉ. दप्तरी यांनी आपल्या 'धर्मरहस्य', 'धर्मविवादस्वरूप' व 'उपनिषदांचे भाष्य' या पुस्तकात घेतला आहे. परलोकवाद व हिंदुधर्मग्रंथांचे शब्दप्रामाण्य यांस अमान्य करून केवळ

समाजसुधारणेचे तत्त्व म्हणूनच त्यांनी धर्मकल्पनेचा स्वीकार केला आहे. ही चळवळ महाराष्ट्रात सर्वसामान्यजनतेत प्रत्यक्ष फैलावलेली नसली तरी तिचे वैचारिक मूल्य व बुद्धिवादी दृष्टिकोन अत्यंत मोलाचा आहे. या मंडळींनी 'धर्मनिर्णयमंडळ' नावाची संस्थाही सुधारणेच्या चळवळीकरिता स्थापिली आहे. हिंदूंचे लहानसहान धार्मिक विधी व सामाजिक चालीरीती यांनाही अधिक सुटसुटीत व नव्या जमान्यास अनुकूल असे वळण लावण्याचा ही संस्था प्रयत्न करीत आहे. न्या. रानडे यांनी निर्माण केलेल्या सामाजिक परिषदेचाही पुनरुद्धार करण्यास ही संस्था मदत करीत आहे.

भारतातील नवयुगाचे जन्मदाते राजा राममोहन रॉय, भारताच्या आधुनिक युगाचे मतप्रदर्शक व नव्या उदारमतवादी राजकीय चळवळीचे उत्पादक न्या. रानडे, राष्ट्रीय अभिमानाचे मंत्रद्रष्टे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, बुद्धिवादी आणि सामाजिक स्वातंत्र्याचा ध्येयवाद निर्माण करणारे आगरकर किंवा परकीय राज्याच्या विरोधी असंतोष पेटविणारे लो. टिळक या सर्वांच्या अंतर्मनात आणि जाणिवेत ओतप्रोत भरलेला मूलभूत भाव म्हणजे पाश्चात्त्य समाजाने येथे स्थापन केलेल्या वर्चस्वाची दुःखद चिंता होय. ही मने सामर्थ्यशाली होती. हे सामर्थ्य राजकारणाकडे अधिक वळले.

भारतीय राष्ट्रीयत्वाचा जन्म सांस्कृतिक पूर्वपरंपरेच्या अधिष्ठानावर झाला; आधुनिक भारताचे हे पहिले व मुख्य लक्षण होय. भारतीय राष्ट्रीयत्वाची मनोभूमिका पुष्ट करावयाची आणि राष्ट्रीय राजकारणाच्या चळवळीचा उठाव करावयाचा या मुख्य उद्दिष्टाने प्रेरित होऊन इ. स. १८८१ मध्ये चिपळूणकरांनी टिळक-आगरकरांच्या सहकार्याने 'केसरी' वृत्तपत्र सुरू केले. 'केसरी' हे प्रतीक उन्नत अहंकाराने अभिनिविष्ट अशा राष्ट्रीय राजकारणाचे उत्कृष्ट द्योतक आहे. भारताच्या राजकीय चळवळीच्या प्रारंभी हे प्रतीक मोठ्या दीर्घदर्शी प्रज्ञाशाली प्रतिभेतून प्रकट झाले. आता हाच केसरी भारतीय संघराज्याच्या अधिकृत मुद्रेवर चतुर्मुख असा आरूढ होऊन आपणास भारतीय राष्ट्रीयत्वाच्या सामर्थ्याचे दर्शन देऊ लागला आहे. हा योगायोग नाही. हे अंतर्मनाचे तर्कशास्त्र कळत वा नकळत सुसंगतपणे माणसाच्या हातून कृती घडवीत असते. आता हा केसरी जागृत होऊन चारी दिशांवर दृष्टिक्षेप करीत भारताच्या सर्वांगीण रक्षणाकरिता सिद्ध झाला आहे. शास्त्रीबुवांच्या मुखाने हा निद्रित असतानाच सांगत आहे : ''मी निजलेला आहे, हे पाहून माझ्या संस्कृतीचा, परंपरेचा व अभिमानाचा कोणी वैरी तर आजूबाजूस फिरकत नाही ना, असला तर एका गर्जनेसरिसा त्यास गर्भगळीत करीन.''

आगरकरांनी सात वर्षांतच ‘केसरी’ सोडला. कारण समाजकारणाला डावलून राजकारणाला पट्टाभिषेक करण्याचा ‘केसरी’च्या संपादक मंडळाचा आग्रह त्यांना मानवेना. आगरकर ‘केसरी’तून निघाले व त्यांनी समाजसुधारणेला प्राथम्य देऊन आपले ‘सुधारक’ साप्ताहिक (इ. स. १८८८) सुरू केले. आगरकर ‘केसरी’तून निघाले, ही घटना वरवर दिसण्यात वैयक्तिक व साधी दिसत असली तरी भारताच्या ऐतिहासिक परिणतीचा फार मोठा अर्थ तिच्यात भरलेला होता. भारतातील स्वराज्यप्राप्तीपर्यंतच्या समग्र सामाजिक चळवळीची दिशा व स्वभाव काय राहणार याची ही घटना सूचक आहे.

टिळकानंतर गांधीयुग अवतरले. त्याचा भारतावर व विशेषत: महाराष्ट्रावर खोल प्रभाव पडला. टिळकांचे राजकीय अनुयायी व गांधींची राजकीय पद्धती यांचा काही काळ संघर्ष झाला. त्यांत मराठीचे वाङ्मयसम्राट कै. न. चिं. केळकर यांचे वाङ्मययश विकास पावले. गांधींची राजकीय पद्धतीच अखेर यशस्वी ठरली, याबद्दल प्रामाणिक इतिहासकारांत मतभेद होणार नाही. कारण ते एक प्रत्यक्ष सत्य आहे. या प्रमेयाची ऐतिहासिक मीमांसा करताना त्या प्रमेयाला गांधींच्या राजकीय पद्धतीच्या बाहेरच्या अनेक पूरक किंवा बलवत्तर कारणांचाही विचार करावा लागेल, हे खरे आहे. परंतु येथे एक महत्त्वाची गोष्ट नजरेआड होता कामा नये. ती अशी : गांधी हे ब्रिटिशविरोधी अहिंसक सत्याग्रही राजकारणाचे एकमेवाद्वितीय नेते बनले. त्यांनी भारतीय राजकारणात प्रथम प्रवेश केला तेव्हा त्यांचा मुख्य हेतू, त्यागी व रचनात्मक कार्य करणारे कार्यकर्ते तयार करणे, हा होता. त्यांनी साबरमतीस आश्रम स्थापला. पाश्चात्त्य संस्कृतीच्या संसर्गाने झालेल्या नैतिक अध:पतनापासून भारताचा पुनरुद्धार करण्याचा हेतू धरून तो आश्रम त्यांनी स्थापला. भारतीय ग्रामसंस्थेची प्राचीन आदर्शाप्रमाणे पुनर्घटना करणे हे त्यांचे अंतिम लक्ष्य होते. अस्पृश्यता- निवारण व स्त्रीजीवनाचा विकास ही त्यांची सामाजिक सुधारणेची ध्येये होती. हिंदू-मुसलमानांमध्ये जिवंत बंधुत्व निर्माण करणे, हा त्यांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या पूर्वतयारीच्या कार्यक्रमाचा मूलभूत भाग व मुख्य अट होती. ब्रिटिश सत्ता निर्मूलनाच्या राजकारणाची चळवळ जसजशी फोफावत चालली, तसतसे हे सर्व दुय्यम ठरत चालले व मागे पडले. समाजसेवेचे अखंड व्रत घेतलेल्या कार्यकर्त्यांचे आश्रम देशव्यापी करण्याची आकांक्षा राजकारणाच्या व्यापाखाली बुडून गेली. हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचा उद्देश स्वप्नवत् ठरला. याचे मुख्य कारण टिळकांनी निर्माण केलेले भारतीय मनावरील राष्ट्रीय राजकारणाचे वर्चस्व होय.

आता स्वराज्यस्थापनेनंतर गांधींच्या ध्येयवादाचा प्रभाव पुन: निराळ्या स्वरूपात प्रकट झाला आहे. या काळाचे शुभ वर्तमान आधुनिक संत विनोबा यांच्याद्वारे भारतात पसरत आहे. शांतिमय सामाजिक क्रांतीला ते आवाहन देत आहेत. क्रांतीची शक्ती सामाजिक उत्पाताच्या अवस्थांमधून जाण्याची गरज नाही असा या शुभ वर्तमानाचा अभिप्राय आहे. हे वर्तमान ज्या वाणीतून प्रसरण पावत आहे, ती वाणी संतवाङ्मयाच्या उपासनेने पावन, प्रसन्न व शांतिमय झाली आहे. या शुभ वर्तमानातून निर्माण झालेली भूदानयज्ञाची चळवळ सामान्य जनतेला विशेषत: भूमिहीन शेतकामगारांना चेतवीत आहे. भूमींच्या स्वामींचे हृदयपरिवर्तन करून भारतातील भूमीवरील मालकी हक्काचा त्याग करावयास लावण्याची प्रतिज्ञा या चळवळीच्या नेत्यांनी केली आहे. निर्वाणीचे साधन कोणते, यासंबंधी निर्णयही त्या नेत्यांनी केला आहे. ते म्हणजे सत्याग्रहाचे साधन होय. सामुदायिक सत्याग्रह, हे सत्याग्रहाचे परिणत रूप होय. सत्याग्रह सामुदायिक रूप जेव्हा घेतो तेव्हा त्यास नि:शस्त्र प्रतिकाराचे रूप येते. नि:शस्त्र प्रतिकार ही एक प्रकारची जबरदस्तीच होय. ती एक प्रकारची राजकीय शक्ती असून इंद्रजिताच्या पुराणप्रसिद्ध शक्तीप्रमाणे ती प्रचंड आघात करू शकते. नेत्याच्या कह्याबाहेर गेली तर ती प्रस्थापित राजसत्तेला न जुमानण्याइतकी प्रभावी होते. मग तेथे हृदयपरिवर्तनाचा प्रश्नच शिल्लक राहात नसतो. भूदानयज्ञाची सार्वजनिक सत्याग्रहात परिणती झाली तर त्याचे भवितव्य असेच ठरेल. याचा अर्थ असाच होईल की, टिळकांनी निर्माण केलेला राजकीय ध्येयवाद गांधींना पचवून विनोबांनाही पचविण्यास समर्थ झाला.

परंतु हा राजकीय ध्येयवादाचा सर्वश्रेष्ठ प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नाही. हा विश्वव्यापी आहे. सगळी राष्ट्रे त्याने व्यापिली आहेत. हा राजकीय ध्येयवाद सत्तेच्या राजकारणात सर्वत्र पर्यवसित झाला आहे. समताप्रधान व स्वातंत्र्यपूर्ण मानवी समाजाची रचना हा सर्वांत वरिष्ठ असा आजच्या माणसाचा ध्येयवाद आहे. परंतु त्याकरिता सत्तेच्या राजकारणाशिवाय दुसरा मार्गच आजच्या माणसांना सापडत नाही. दुसरा मार्ग दिसतो पण सापडत नाही. सेवा आणि रचनात्मक कार्यक्रम हाच एक वस्तुत: शांतिमय क्रांतीचा रुंद, दूरगामी आणि आत्यंतिक हिताला पोहोचविणारा मार्ग आहे. त्याची साधना कष्टाची आहे व सद्य:फलदायी नाही म्हणून महत्त्वाची ध्येयवादी माणसे त्याचे अनुकरण करीत नाहीत. रचनात्मक कार्यक्रमाची परिणामकारकता सर्वात अधिक आहे.

**वाङ्मयेतिहास**

सांस्कृतिक जीवनाच्या इतिहासाची वाङ्मयेतिहास ही एक बाजू आहे. सांस्कृतिक जीवनातील जाणिवांचे उच्चतम रूप म्हणजे वाङ्मय किंवा कला होय. वाङ्मयात किंवा कलेत समाजाची प्रज्ञा प्रकट होते. वाङ्मयेतिहास म्हणजे समाजाच्या प्रज्ञेचा इतिहास होय. जीवनाचा आणि वाङ्मयाचा हा संबंध लक्षात घेतल्याशिवाय वाङ्मयेतिहास लिहिणे म्हणजे ग्रंथवर्णनांची जंत्री लिहिणे होय. अशा इतिहासात वाङ्मयशरीराच्या हाडांचा सापळाच सापडतो. असा सापळा सुद्धा उपयुक्त असतोच. परंतु खरा वाङ्मयेतिहासकार हा वाङ्मयाचा थोर टीकाकार असावयास पाहिजे. तो विशाल वाङ्मयमूर्ती निर्माण करणारा शिल्पकार असतो. अशा टीकाकारांच्या योगाने वाङ्मयाला वेगळे वळण मिळून ते अधिक उच्चतर पातळीवर जाते. सेंट ब्यू (Sainte-Beuve) या कवयित्रीच्या काव्यसमीक्षेने फ्रेंच कवितेला नवा नूर आला. इंग्लिश वाङ्मयाचा तात्त्विक टीकाकार टेन (Taine) याच्या इंग्लिश वाङ्मयेतिहासाने इंग्लिश वाङ्मय अधिक संपन्न होऊ लागले. लेसिंग (Lessing) आणि हर्डर (Herder) ह्यांच्या ऐतिहासिक समीक्षेने जर्मन वाङ्मयाच्या वाढीवर मोठेच उपकार केले. मॅडम डी स्टील (Madame De Stael) हिने ही गोष्ट आपल्या ‘वाङ्मयाशी सामाजिक संस्थांचा संबंध’ (Literature in Relation to Social Institutions) या पुस्तकात चांगली विशद करून दाखविली आहे. वाङ्मय व जीवनाचे आकलन यांचा संबंध मेरी एम. कोलम् (Mary M. Coluni) हिने थोडक्यात असा व्यक्त केला आहे. ‘‘गंभीर, चौकस व परिवर्तनकारक असे जे वाङ्मयासंबंधी व जीवनासंबंधी विचार असतात, त्यांचे फलित म्हणजे उच्चतम वाङ्मयसमीक्षा होय. वाङ्मयाचा विषय जीवन होय. जीवनाचे समाकलन केल्याशिवाय वाङ्मयाची समीक्षा कोणालाही करता येणार नाही. म्हणूनच मोठ्या समीक्षाकारांनी केवळ वाङ्मयाच्या समीक्षेवरच छाप टाकली नाही. त्यांचा प्रभाव वाङ्मयनिर्मितीवरही निरंतर राहिला.’’

इतिहाससंशोधनाची व लेखनाची महत्त्वाची चळवळ महाराष्ट्रात आधुनिक काळात सुरू झाली. इतिहास हा कालविभाग किंवा युगविभाग निर्दिष्ट करून तदनुसाराने लिहावयाचा असतो. भारताचा इतिहास याप्रमाणे कालविभाग पाडून प्राचीनयुग, मध्ययुग व अर्वाचीनयुग असे युगभेद कल्पून अनेक भारतीय व पाश्चात्त्य इतिहासकारांनी लिहिला आहे. याचा अर्थ असा होतो की, युरोपियन इतिहासातील युगत्रयाची व्यवस्था भारतेतिहासालाही त्यांनी लागू केली आहे. युरोपियन इतिहासातील युगभेदाची लक्षणे व युगमर्यादा स्पष्ट व निर्विवाद आहेत. तसा प्रकार भारतेतिहासाचा नाही.

याचे प्रत्यंतर आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या भारतेतिहासात प्राचीन युग इ. स. पूर्व २००० ते इ. स. १००० पर्यंत आणि केंब्रिज इतिहासात प्राचीनयुग वैदिक कालापासून इ. स. २०० पर्यंत आहे. इतिहासकार कै. चिं. वि. वैद्य यांनी मध्ययुगीन भारत इ. स. ६०० पासून इ. स. १२०० पर्यंत धरला आहे. विद्यानिधी चित्रावशास्त्री यांनी लिहिलेल्या चरित्रकोशात मौर्य चंद्रगुप्तापासून म्हणजे इ. स. पूर्व ३२१ ते इ. स. १८१८ पर्यंत मध्ययुगीन भारत धरला आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. युरोपच्या इतिहासात असा घोटाळा नाही. युरोपच्या इतिहासातील मध्ययुग इ. स. ४०० ते इ. स. १४०० हे साधारणपणे निर्विवाद ठरले असून संघटित ख्रिश्चन धर्मसंस्थेची समाजावरील सार्वत्रिक प्रभुता हे मध्ययुगाचे लक्षण निश्चितपणे मान्य आहे. तसे भारताच्या मध्ययुगाचे लक्षण निश्चित करता येणे शक्य नाही. भारतेतिहासात वापरला जाणारा 'मध्ययुग' हा शब्द संदिग्ध अर्थाचा व युरोपियन इतिहासाशी अस्पष्टपणे जमणाऱ्या सादृश्याचा दर्शक आहे, असेच मानले पाहिजे.

हे युग-मर्यादेचे विवेचन लक्षात घेऊनच भारतीय वाङ्मयाच्या व समाजाच्या इतिहासकारांनी 'मध्ययुग' ही संज्ञा वापरली पाहिजे. कालखंडांचे किंवा युगभेदांचे अर्थ वाङ्मयेतिहासकारांनीही केलेच पाहिजेत. त्याशिवाय वाङ्मयाचा इतिहासाशी असलेला सांधा दाखविता येणार नाही. जर युगत्रयी किंवा मध्ययुग ही संज्ञा जमण्यासारखी नसली, तर ती सोडून देणेच योग्य होय. कालखंडाची विभागणी वाङ्मयेतिहासात अनेक प्रकारांनी दर्शित करता येते. त्या त्या कालखंडातील श्रेष्ठ वाङ्मयकार आणि व्यक्ती ही सुद्धा कालखंडाचे प्रतीक होऊ शकते. त्यामुळे विभूतिपूजक वृत्ती बळावते, असे म्हणता येईल; परंतु या गोष्टीस बुद्धिवादी इतिहासकाराने भिण्याचे कारण नाही. भौतिकवादी किंवा मार्क्सवादी इतिहासकारालाही अशा व्यक्तिविषयक इतिहासाला भ्यायचे कारण नाही. मनुष्य ही भौतिक विकासक्रमातली उच्चतम परिणती आहे, हा भौतिकशास्त्राचा निर्णय त्याने ध्यानात घ्यावा. ''माणसे इतिहास घडवितात'' किंवा ''माणूस मानवजातीचे मूळ होय'', ही मार्क्सची उक्ती मानवतावादी इतिहासाची मूळ कल्पना देते.

मराठी राज्याचा उदयास्त समजून घेण्याची उत्कट प्रवृत्ती, ही एक महाराष्ट्रातील सुशिक्षित समाजाच्या बौद्धिक प्रवृत्तीतील महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे इतिहाससंशोधन, इतिहासाची मीमांसा व इतिहासलेखन करण्याची कल्पना महाराष्ट्रीय शिक्षित मनात दृढमूल झाली आहे. मराठी राज्याच्या उदयास्ताचा अर्थ समजून घेण्याने भारताच्या पूर्वेतिहासातील राज्यांच्या उदयास्ताचा व उन्नती-अवनतीचा

अर्थ ठरविण्यास मदत मिळते. मराठी राज्याची गोष्ट अलीकडची असल्यामुळे अगदी ताजी आहे. त्यामुळे तिच्या अभ्यासाचा सर्वांगीण निष्कर्ष काढणे सुलभ आहे. हा निष्कर्ष भारतीय इतिहासाच्या निष्कर्षाचा छोटा परंतु मार्गदर्शक असा स्पष्ट नमुनाच ठरतो.

मराठ्यांचा इतिहास विभूतिपूजेच्या व आत्मप्रशंसेच्या भूमिकेवरून पाहणारे लेखक जसे उदयास आले त्याचप्रमाणे त्याचे नि:पक्षपाती मूल्यमापन करून शास्त्रीय कार्यकारणभाव सांगणारेही वस्तुवादी इतिहासलेखक महाराष्ट्रात झाले आहेत.

आपल्या इतिहासज्ञ अभ्यासकांच्या दोन पद्धती आहेत. पहिली पद्धती आत्मसमर्थनाची व भूतकाळाचा महिमा वाढविण्याची. राष्ट्रीय अहंतेचे पोषण करणे हा आंतरिक हेतू या पद्धतीचा प्रेरक असतो. त्यामुळे अर्धसत्याचे आविष्करण करण्याकडेच या प्रवृत्तींचा कल असतो. दुसरी वैज्ञानिक पद्धती होय. साधकबाधक बाजूंचा परामर्ष घेऊन गुणदोषांचे यथार्थ दर्शन घेणारी व यथार्थ मूल्यमापन करणारी ही दुसरी पद्धती होय. ही दुसरी पद्धती अजून पूर्णपणे यशस्वी झालेली नाही. परंतु त्यात प्रगती नि:संशयपणे होत आहे. या दोन्ही पद्धतींचे संमिश्रण करण्याची प्रवृत्तीसुद्धा अनेकांनी अंगीकारलेली दिसते.

भूतकाळचा सश्रद्ध इतिहासकार स्थानपूजक किंवा राष्ट्रवादी असतो. तो पराभवाची व पतनाची मीमांसा उथळपणे करितो. विजयांचे स्तोम माजवितो. त्यामुळे अवनतीच्या कारणांचेही नकळत समर्थन करितो. अशा इतिहासकारांमुळेच प्रादेशिक व राष्ट्रीय अहंकाराची पुष्टी होते व सत्याची दृष्टी क्षीण होते. त्यामुळे संस्कृतीच्या भावी विकासाचे मार्ग बंद होतात. भारतात व महाराष्ट्रात असे रूढीनिष्ठ इतिहासकार कमी नाहीत. तेच जास्त लोकप्रिय असतात. परंतु व्यापक दृष्टीचा वैज्ञानिक इतिहास लिहिण्याचीही प्रवृत्ती भारतात व महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्रातील अनेक वाङ्मयकार व इतिहासकार विवेचक, मूर्तिभंजक व बुद्धिवादी आहेत.

**यशापयशाचे मूल्यमापन**

भूतयुगात भारतीय संस्कृतीचे महाराष्ट्रात एक निराळे वैशिष्ट्य संवर्धित झाले, तसेच वर्तमानकालातही झाले. प्राचीनकाळी संस्कृतच्या प्रौढ कालखंडात महाराष्ट्रात वैदर्भी रीती निर्माण झाली. भागवत धर्मांतील इंद्रियभोगाचा रंग धुऊन टाकून पावित्र्याच्या तेजाने संपन्न असा भक्तिमार्ग संतांनी उजळून टाकला. निवृत्तिप्रधान बौद्ध व जैन धर्माच्या उपासनेचाही अंगीकार करून अंतर्मुख झालेल्या महाराष्ट्रातील मानवी शक्तींनी टणक खडक फोडून टाकीच्या घावांनी घन, दृढ, चिरस्थायी व विशाल सुंदर मंदिरे

गिरींच्या अंतरंगात उभारली आणि विरक्त साधूंच्या ध्यानस्थ वसाहतींकरिता स्थिर स्थापत्ये उभारली. वर्तमानकालातही भारतीय संस्कृतीच्या शरीराला, मनाला व बुद्धीला पुनर्नवता येण्याकरिता पश्चिमेकडील नव्या जोमाच्या बौद्धिक संस्कृतीची निवडक जीवनसत्त्वे आणि तत्त्वे आत्मसात करण्यात पुढाकार घेतला. राष्ट्रीय जीवनाच्या एकतेची भावना रुजविण्याकरिता आवश्यक असलेल्या आत्यंतिक यज्ञाची दीक्षा घेतलेली, 'केसरी'ची हृदये असलेली माणसे भूतकालाचे यशोगान करीत नव्या राजकीय संग्रामात पुढे आली. उदारमतवादाचे पश्चिमेकडील वारे फिरविणारे विचारवंत पुढे सरसावले. भारतीय नव्या चळवळीचे जरूर तेथे नायकत्वही पत्करले व शालीनपणे विनयशील बनून अनुयायित्वही वरिले. महाराष्ट्रीयत्व याचा संकुचित अर्थ टाकून राष्ट्रीयत्व हा अर्थ, महाराष्ट्रीयत्व = भारतीयत्व असा अर्थ हृदयात भरला. म्हणूनच हे घडू शकले. महाराष्ट्राने भारताशी एकात्मकता अनुभवली, तेव्हाच हे घडले. जेव्हा जेव्हा महाराष्ट्रातील माणसांत संकुचित भाव राहिला तेव्हा तेव्हा प्रतिभा व बुद्धी संकोच पावून विचारांची गती कुंठित झाली. अनुयायित्व पत्करण्यात धन्यता मानली म्हणून नायकत्वही आपोआप आले. राजा राममोहन रॉय यांच्या उदात्त विश्वधर्मापुढे मान लवविली म्हणून मान उंचावली व मान वाढला. म. गांधींचे पावन सेवकत्व स्वीकारून श्रद्धामय अंत:करणाने देशसेवेचे व्रत घेण्यास महाराष्ट्रीय पुढे आले, म्हणूनच विश्वशांतीची प्रतिष्ठा करण्यास प्रवृत्त झालेले विनोबा त्यांच्यात निघाले व अग्रणीपदावर शोभू लागले. संकुचित अहंतेचे खंडन केल्याशिवाय मानवतेचे मंडन होऊ शकत नाही; असा या वर्तमान कालखंडाचा अभिप्राय आहे.

**प्रादेशिक भाषांच्या वाढीचा कठीण प्रश्न**

देश्य भाषांची किंवा मराठी भाषेची योग्यता अद्ययावत् उच्चशिक्षणाचे प्रभावी साधन म्हणून अजून वाढावयाची आहे. मराठी किंवा देश्य भाषा असे साधन बनावे अशी बळकट उत्कंठा कोठे आहे? मराठीत किंवा देश्य भाषेतच परिश्रमपूर्वक मोठमोठे ग्रंथ रचीन, अशी भीष्मप्रतिज्ञा केलेला प्राध्यापकांचा व पंडितांचा वर्गच आज दिसत नाही व तसा आग्रहही कोठे दिसत नाही. असे थोडेच सुशिक्षित व पंडित गेल्या शतकात झाले. जे काही पाश्चात्त्यविद्याविभूषित व्यासंगी पंडित झाले त्यांनी आतापर्यंत या गेल्या शतकात इंग्रजीचीच वाढ केली. समुद्रास एखादी नदी मिळाली म्हणून समुद्राची मर्यादा वाढलेली दिसत नसते. इंग्रजी भाषेच्या समुद्रात भारतीय आधुनिक शिक्षितांनी आपल्या वाङ्मयाचा छोटासा पाट नेऊन मिळवला आहे. त्यामुळे प्रादेशिक भाषानदी कोरडीच राहिली. भिन्नभिन्न विषयांत प्रवीण

असलेल्या प्राध्यापकांची आजपर्यंतची संख्या मोजली तर फार मोठी भरेल. परंतु त्यांनी प्रादेशिक भाषांची अक्षम्य उपेक्षाच केली आहे. परकीय सरकारने व त्या सरकारच्या स्थापलेल्या शैक्षणिक संस्थांनी उपेक्षावृत्तीने प्रादेशिक भाषांची दीर्घकाल उपासमार केली आहे. हा मोठा गुन्हा घडला आहे. ह्या गुन्ह्याचे परिमार्जन करण्याची जबाबदारी आता आपल्या विश्वविद्यालयीन प्राध्यापकांनी व इतर आंग्लविद्याविभूषितांनी आपल्यावर घेतली पाहिजे. सध्याच्या लोकशाही सरकारने प्रादेशिक भाषांची व नव्या विद्यांची मोठमोठी ग्रंथभांडारे उभारली जावी म्हणून अशा प्रयत्नांना संघटित व व्यवस्थित मूर्तिमंत रूप देण्याकरता नव्या संस्थांची साधने उपलब्ध करून द्यावीत.

प्रादेशिक भाषांच्यामध्ये आधुनिक विद्याविषयक ग्रंथविस्तार होण्यास आवश्यक असलेल्या सामान्य शब्दांची, पारिभाषिक पदांची व वाक्प्रचारांची बरीच वाण आहे. ही वाण भरून काढण्यास तीन प्रकारचे प्रयत्न एकसमयावच्छेदेकरून चालले पाहिजेत. पहिला प्रयत्न म्हणजे पारिभाषिक पदे आणि वाक्प्रचार यांचा सरसहा उपयोग करून मातृभाषांच्यामध्ये शिक्षणसंस्थांचा व सरकारचा व्यवहार चालू करावा व तो वेगाने वाढवावा. दुसरा प्रयत्न म्हणजे या व्यवहाराचा वेग वाढण्याकरता नवे शब्द, परिभाषा व वाक्प्रचार यांचा उपयोग करून लेखकवर्गाने सामाजिक व भौतिक शास्त्रे प्रादेशिक भाषांच्यामध्ये आणण्याकरिता प्राथमिक, माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षणास उपयुक्त वा वैचारिक सर्जनाचे दर्शक वा वाचकवर्गाच्या ज्ञानसाधनेस उपकारक असे ग्रंथ लिहावे. तिसरा प्रयत्न म्हणजे त्या त्या प्रादेशिक भाषांच्या स्वभावास अनुसरून आणि त्या सर्व भाषांच्यामध्ये पूर्वीच असलेली भारतीय संस्कृतिमूलक एक प्रकारची साम्ये व संवादित्वे पोषण पावतील, अशा जुन्या व प्रचलित शब्दसमृद्धीचा संग्रह करून व नव्या अधिक शब्दसमृद्धीची निर्मिती करून कोश तयार करावे.

आता असे कोश तयार होऊ लागले आहेत. या कोशांना अखेरचे प्रामाण्य मानण्यात मात्र अर्थ नाही; त्यात धोका आहे. प्रादेशिक भाषांचा स्वभाव व परंपरा जे शब्द पचवू शकतील तेच अखेर प्रमाण ठरतील. धोका असा आहे की, अर्थपूर्ण असलेल्या शब्दांची उपेक्षा करून लादलेले नवे कृत्रिम शब्द वैचारिक अस्पष्टता, विसंगती व गोंधळ उत्पन्न होण्यास कारण होतील. शब्दसमृद्धीच्या वाढीचा वेग वाढला पाहिजे; परंतु गोंधळ टाळला पाहिजे. म्हणून पूर्वीच रूढ व प्रसिद्ध असलेल्या अर्थपूर्ण शब्दांच्याद्वारे व्यवहार व ग्रंथनिर्मिती करण्याच्या क्रमातच व त्याच्या प्रभावाखालीच कोशनिर्मिती होणे जरूर आहे. नवे कृत्रिम शब्द फाजील प्रमाणात वापरल्यास सामाजिक शास्त्रांचे ग्रंथ अर्थसंपन्न व प्रसन्न असे तयार होणार नाहीत.

नव्या कृत्रिम शब्दांच्या योगाने शब्दांचा भरणा केलेले नवे भौतिक शास्त्रांचे ग्रंथ मात्र सामाजिक शास्त्रांच्या पेक्षा सुसह्य होऊ शकतील. म्हणून विश्वविद्यालयांनी व खाजगी संस्थांनी आणि व्यक्तींनी असे भौतिक शास्त्रांचे ग्रंथ त्वरित निर्माण करण्याचे कारखाने स्थापन करण्याच्या उद्योगास अगोदर लागावे. त्यात यश अधिक चांगले येईल.

**हिंदी व प्रादेशिक इतर भाषा**

संघराज्याची भाषा म्हणून हिंदीला मान्यता मिळाली आहे. भारतीय संस्कृती एकाकार बनण्याच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा भाग घेण्याची संधी हिंदीला मिळणार आहे. प्रादेशिक भाषांची वाढ करण्याचे एकमुखी धोरण व तंत्र दृढमूल होत गेले तर एक नव्या प्रकारची उच्चतर हिंदी भाषा तयार होईल. हिंदी व हिंदुस्थानी हा भेद लहानशा तपशिलाचा अतएव गौण आहे. हिंदी ही संघराज्याची भाषा म्हणून स्वीकार करण्याला अनुकूल असे वातावरण स्वराज्यापूर्वीच निर्माण झाले आहे. स्वराज्याची चळवळ, भारत हे एकराष्ट्र आहे, ह्या खोल भावनेने प्रेरित झालेली होती. याच भावनेला अनुसरून हिंदीचाही पुरस्कार या चळवळीचे अंग या नात्याने होत होता. महाराष्ट्रात तर अलीकडे हिंदी भाषा शिकण्याची स्वयंप्रेरित अशी चळवळच उभी राहिली आहे. त्यात महाराष्ट्रीय समाजात उत्साहाने प्रत्येक वर्षी शेकडो आणि हजारो पदवीधरही निर्माण होत आहेत. या उत्साहाची उपेक्षा मुळीच करून चालणार नाही. महाराष्ट्रातील सुशिक्षित स्त्री-पुरुषांनी हिंदी भाषा शिकलीच पाहिजे हे गृहीत कृत्य झाले आहे.

महाराष्ट्रात इतक्या लवकर हिंदी भाषेचे हे इतके उत्साहपूर्ण स्वागत होण्याचे कारण राष्ट्रीय भावनेची पार्श्वभूमी. ती संघराज्याची भाषा आहे हे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच राष्ट्रीय ऐक्य, भारतीय संस्कृतीची प्राचीन काळापासूनची एकता व मराठी भाषेशी असलेले हिंदी भाषेचे निकट साम्य हेही महत्त्वाचे आहे. भारतातील द्रविड भाषाकुल सोडल्यास बाकीच्या मराठी, गुजराती, बंगाली इत्यादी भाषा हिंदी भाषेच्या भगिनी भाषा आहेत. त्यांचा स्वभाव व तोंडावळा सारखा आहे. हिंदीबद्दलचे मराठी साहित्यिकांचे प्रेम पुरातन आहे. मराठी साहित्याचा पाया जेव्हा संतमंडळी घालू लागली, मराठीत सुंदर व प्रसन्न काव्यरचना करू लागली, तेव्हाच ती संतमंडळी हिंदीमध्येही पद्यरचना करण्यात स्वत:स कृतार्थ मानू लागली. मराठी संतांनी केलेले हिंदी काव्य अजून शिल्लक आहे. नामदेव महाराजांपासून तुकारामांपर्यंत ही हिंदी पद्यरचना करण्याची पद्धती चालू होती. मराठी माणसाच्या हिंदीविषयक प्रेमाचा हा सहाशे वर्षांचा इतिहास आहे, हे आम्ही हिंदी भाषिक बंधूंना नम्रतेने सुचवू इच्छितो.

राज्यांच्या भाषावार प्रादेशिक रचनेचा प्रश्न पूर्ण समाधानकारक रीतीने सोडविला गेल्यास मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा हिंदी भाषा शिकण्याचा उत्साह तुफानी वेगाने वाढेल. हिंदी भाषा लादण्याचा प्रश्नच उत्पन्न होऊ शकत नाही. हिंदी भाषेचा स्वीकार हा क्रमप्राप्त असून काही वेळाचे अंतरच मध्ये आहे. महाराष्ट्रातील सगळी सुशिक्षित जनता एकदोन पिढ्यांमध्ये दुभाषी बनणार आहे. संघराज्याची भाषा म्हणून हिंदीची असलेली प्रतिष्ठा, तिचे मराठी भाषेशी असलेले सांस्कृतिक नाते व तिच्यातील वाक्यरचना व शब्दसमृद्धी आणि वाक्प्रचार यांचे मराठीशी असलेले साम्य यांमुळे सुशिक्षित महाराष्ट्रीय, मराठी व हिंदी या दोन्ही भाषा जवळजवळ सारख्या सहजतेने जवळच्या भविष्यकाळात बोलू लागेल. मात्र हिंदी भाषेच्या आक्रमणाची शंका येईल असले कोणत्याही प्रकारचे वर्तन प्रादेशिक किंवा मध्यवर्ती सरकारांनी संपूर्णपणे निषिद्ध मानले पाहिजे. लोकमानसशास्त्राचे गंभीर भावार्थ जाणूनच आपल्या सरकारांनी आपले धोरण आखून पावले टाकिली पाहिजेत. देशप्रेमाइतकेच किंबहुना त्यापेक्षाही अधिक खोल मातृभाषेचे प्रेम असते. ही गोष्ट सरकारने विसरल्यास देशाच्या एकतेस, राष्ट्रीय ऐक्यास, अनिवार्य धोका उत्पन्न होईल.

प्रादेशिक राज्यांची भाषावार रचना प्रादेशिक भाषा बोलणाऱ्या लोकांचे पूर्ण समाधान होईल, अशा रीतीने करणे हेच एकमेव कृत्य राष्ट्रीय ऐक्याचा पाया दृढ व खोल करण्याचा नजीकचा उपाय आहे. इतर देशांच्या फुटीचे दाखले गृहीत धरून भाषावार प्रादेशिक राज्यांची रचना करण्यात साशंक असणारे शहाणे लोक मूर्खांच्या स्वर्गात आहेत, हे प्रादेशिक भाषांची रचना करण्यास जबाबदार होऊ पाहणाऱ्या शहाण्या मंडळींनी विसरता कामा नये. राज्यकर्त्यांनी जे जे पाऊल टाकावयाचे असते ते प्रामाणिक, विचारपूर्ण व निश्चित धोरणानेच न डगमगता टाकावे लागते. धरसोडीचे अर्धवट व संदिग्ध उपाय योजणाऱ्यांना भविष्यकाळ क्षमा करीत नाही.

**उपसंहार**

वर्तमान युगातील भारताच्या सांस्कृतिक व राजकीय प्रेरणा व आकांक्षा आणि महाराष्ट्राच्या प्रेरणा व आकांक्षा एकच आहेत. भारतीय व महाराष्ट्रीय यांची वरिष्ठ उद्देशांची साधना व साधनेचे मार्ग एकच आहेत. एकाच समान सांस्कृतिक परंपरेचा वारसा महाराष्ट्राने आत्मसात केला आहे. तिचे रक्षण केले आहे व महत्त्वाची भरही घातली आहे. ही भर घालीत असताना एक मनोज्ञ वैशिष्ट्यही प्रकट केले आहे. यासच महाराष्ट्र संस्कृती म्हणतात. हे वैशिष्ट्य प्रकट करीत असताना महाराष्ट्रातील माणसांचे नेतृत्वही जीवनाच्या त्या त्या क्षेत्रात उजळून बाहेर आले आहे.

हे नेतृत्व जेव्हा जेव्हा व ज्या ज्या क्षेत्रात आपले स्वतंत्र गुण प्रकट करताना दिसते, तेव्हा तेव्हा ते समग्र भारताच्या ध्येयाशी समरस झालेले असते. व्यापक मानवी सद्गुणांचा फुलोरा त्याला आलेला असतो. जीवनाची कला तेथे आकारास आलेली असते. देशकालाच्या बंधनात हे नेतृत्व जरी त्या त्या प्रसंगी कार्य करीत असले तरी त्याची आध्यात्मिकता देशकालातीत शाश्वत मानवी मूल्यांकडे अभिमुख झालेली असते, त्या मूल्यांच्या संवेदनांनी उजळलेली असते.

परंतु जेव्हा जेव्हा महाराष्ट्राचे अंत:करण संकुचित बनते, हेवा आणि मत्सर यांची त्याला बाधा होऊ लागते, तेव्हा तेव्हा पापिणी अहंता जीवन खुंटवून टाकते व त्यामुळे उतरती कळा लागते; प्रगतीचे मार्ग रुद्ध होऊन दुर्गतीच्या वेढ्यात महाराष्ट्रसमाज रुतून पडतो. सांस्कृतिक विजयाच्या घटना आणि पराभवाच्या व पतनाच्याही घटना यांची कथा म्हणजे महाराष्ट्रातील संस्कृतीचा इतिहास आहे. या इतिहासातील पराजय अहंतेचे खंडन करून विवेक व विवेचक बुद्धी प्रदीप्त करतो आणि या इतिहासातील विजय आत्मविश्वास उत्पन्न करून कर्तव्यास प्रवृत्त करतो.

*(**संदर्भ :** साहित्याचे तर्कशास्त्र : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची साहित्यविषयक अध्यक्षीय भाषणे : संपादक सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, पृ. क्र. १३२-१८७)*


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
(The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
(in English and Marathi),
by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
(To Searches is Education), (in Marathi),
by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh,
Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणाऱ्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८) नुसार फॉर्म ४

| | | |
|---|---|---|
| (१) | नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) | प्रकाशन स्थळ : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (३) | नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) | प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (५) | मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (६) | संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| | राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| | पत्ता : | 'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |
| (७) | मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट,<br>२०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०. |
| (८) | नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भागभांडवला पैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'<br>(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी)<br>'अर्थबोध', ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६. |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०२५ (प्रकाशकाची सही)

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**